
संतोष जल योगदानाचा



लेखक : विजयकुमार मोरे

मा. इंजि. संतोष तिरमनवार (कार्यकारी संचालक) सेवापूर्ती गौरव ग्रंथ (२०२६)

संतोष जल योगदानाचा..

संपादक : विजयकुमार मोरे

विश्लेषा प्रिंटर्स अँड पब्लिशर्स प्रा.लि. पुणे

संपादक
विजयकुमार रामचंद्र मोरे
आय/४४, इलाईट ग्रीन एकर्स, महिंद्रा कंपनीसमोर,
टाकवे रोड, जांभूळ, ता.मावळ, जि. पुणे - ४१२१०६

प्रकाशक
मा.इंजि. संतोष तिरमनवार(कार्यकारी संचालक)
सेवापर्ती गौरव ग्रंथ समिती
छत्रपती संभाजी नगर, जि. छत्रपती संभाजीनगर.

मुद्रक
विश्लेषा प्रिंटर्स अँड पब्लिशर्स प्रा.लि.
गट नं. ४४५, शनि मंदिराजवळ, कान्हे,
ता.मावळ, जि.पुणे - ४१२१०६

टाईपसेटिंग/ डिझाइन
सक्षम ग्राफिक्स
गट नं. ४४५, शनैनगर, कान्हे,
ता.मावळ, जि. पुणे ४१२१०६

किंमत २०० रु.

(**द्वितीय आवृती २०२६**)

संतोष जल योगदानाचा...



मा.इंजि.श्री संतोष तिरमनवार : एक कुशल प्रशासक

अनुक्रमणिका

मा.इंजि. संतोष तिरमनवार, कार्यकारी संचालक

अल्प परिचय

संपुर्ण नांव :- श्री संतोष रामकिशन तिरमनवार
जन्मदिनांक :- २५/०४/१९६८
मूळ गांव पत्ता :- मु.पो.ता.किनवट, जि.नांदेड
शिक्षण :- एम.ई. (सिव्हिल)
तांत्रिक शिक्षण :- एम.ई. (सिव्हिल) VJTI, MUMBAI
एम.पी.एस्सी वर्ष :- १९९२
सेवेत रूजू झाल्याचे वर्ष :- ०३.०१.१९९४

पदनाम	**ठिकाण**	**कालावधी**
सहाय्यक कार्यकारी अभियंता	मेटा,नाशिक	१९९४-९५
	जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र १५, तीर्थपुरी,जालना	१९९५-९६
	उर्ध्व पैनगंगा प्रकल्प उप विभाग क्र.३७, हदगांव	१९९६ - ९७
कार्यकारी अभियंता	पाटबंधारे प्रकल्प विभाग,यवतमाळ	१९९७-९९
कार्यकारी अभियंता	मध्यम प्रकल्प विभाग,नांदेड	१९९९-२०००
कार्यकारी अभियंता,	उपसा सिंचन विभाग,उस्मानाबाद	२०००-२००३
कार्यकारी अभियंता,	उर्ध्व पैनगंगा प्रकल्प विभाग,नांदेड	२००३-०४
कार्यकारी अभियंता,	नांदेड पाटबंधारे विभाग,नांदेड	२००४-०७
कार्यकारीअभियंता	निम्न दुधना प्रकल्प विभाग,सेलू	२००७-०८
कार्यकारी अभियंता,	प्रकल्प संकल्पचित्र कालवे विभाग क्र.१, पुणे	२००८ - ०९

कार्यकारी अभियंता म.कृ.खो.वि. महामंडळ पुणे २००९ - १३
अधीक्षक अभियंता बीड पा. प्र.मंडळ,परळी वैजनाथ. २०१३ -१६
अधीक्षक अभियंता/उपसचिव मंत्रालय,मुंबई २०१६-१९
मुख्य अभियंता कोकण प्रदेश, जलसंपदा विभाग, मुंबई २०१९-२१
मुख्य अभियंता (स्था.) जलविद्युत प्रकल्प व गुणनियंत्रण,पुणे २०२१-२२
कार्यकारी संचालक गो.पा.वि.महामंडळ, छ. संभाजीनगर २०२२-२६

विशेष उल्लेखनीय कामगिरी

१)नांदेड येथे म.प्र.विभागात कार्यकारी अभियंता असताना १९९९-२००० मध्ये १९७२ पासून रखडलेले प्रकल्प तळणी, चांडोळ आणि जामखेड या तिन्ही प्रकल्पांची घळभरणी एकदाच पुर्ण केली. तसेच पलाईगुडा,मांडवी आणि शिरपूर हे किनवट तालुक्यातील प्रकल्प एकाच वर्षात पुर्ण केले.

२) निम्न तेरणा उपसा सिंचन योजना उस्मानाबाद येथील प्रलंबित कामे पुर्ण करुन दुष्काळी भागात शेतीसाठी पाणी दिले.(२०००-२००३)

३) निम्न मानार प्रकल्पाचे उंची वाढीचे १९७० पासूनचे प्रलंबित असलेले स्वयंचलित दरवाजेयुक्त काम सन २००५ मध्ये पुर्ण केले. यामुळे कुठलेही अतिरिक्त भूसंपादन न करता एक टीएमसी पाणीसाठा अत्यल्प म्हणजे अवघ्या १० कोटीमध्ये पुर्ण केला.

४) सन २००५-०६ आणि २००६-०७ या वर्षीच्या महापुरात सर्व शासकीय यंत्रणांना पुर्व कल्पना देऊन समन्वय साधून व कुठलीही जीवितहानी न होऊ देता यशस्वीरित्या पूर परिस्थिती नियंत्रणात ठेवली. तसेच २०२५ -२६ यावर्षी देखील पूरस्थितीची पुर्वकल्पना सर्व संबंधिताना दिल्याने परिस्थिती नियंत्रणात राहिली.

५) सन २००६-०७ मध्ये नांदेड येथील गुरु ता गद्दी या कार्यक्रमांतर्गत शहरात गोदावरी नदीवर घाट बांधण्याचे नाविन्यपूर्ण काम केले.

६) सन २००८ मध्ये रखडलेला निम्न दुधना या प्रकल्पाची घळभरणी व २२ गावांचे पुनर्वसन पुर्ण करुन २० वक्राकार दरवाजासहित एकाच वर्षात काम पुर्ण केले.

७) जायकवाडी उजव्या कालव्याचे दोन वर्षात अस्तरीकरण पुर्ण करुन वहनक्षमता ११००क्युसेस वरुन संकल्पित २२०० क्युसेस केली.

८) उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प ता.वडवणी जि.बीड येथील घळभरणीचे काम पुर्ण करुन दुष्काळी भागासाठी पाणीसाठा निर्माण केला.

९) लातूर जिल्ह्यातील मांजरा व तेरणा नदीवरील सर्व उच्च पातळी बंधाऱ्याचे काम पुर्णत्वास नेले.

१०) उर्ध्व पैनगंगा प्रकल्पावरील तूट भरुन काढण्यासाठी कयाधु पैनगंगा नदीजोड प्रकल्प व पैनगंगा नदीवर सात उच्च पातळी बंधाऱ्याचे काम मार्गी लावले. तसेच हिंगोली जिल्ह्यातील सिंचन अनुशेष पुर्ण करणेकामी पुर्णा नदीवर ४ उच्च पातळी बंधारे व ४ ल.पा. प्रकल्पाची कामे पुर्ण केली.

११) लेंडी या मोठ्या प्रकल्पाचे मागील ४० वर्षापासून रखडलेले काम सुरु करुन जून २०२५ मध्ये घळभरणीचे काम पुर्ण केले.

१२) केंद्र शासनाधिन बळीराजा जलसंजीवनी योजनेंतर्गत जालना जिल्ह्यात सोनखडे,खोराड सांगवी,पळसखेडा,पाटोदा हे चार तर संभाजीनगरमधील टिटवी,देवगाव रंगारी आणि बनोटी हे रखडलेले चार प्रकल्प पुर्ण केले.

१३)सहस्त्रकुंड या प्रकल्पास सन २००१ मध्ये प्रशासकीय मान्यता मिळाली परंतु प्रकल्पाच्या व्याप्तीत झालेल्या बदलास सक्षमस्तरावर मान्यता नसल्याने काम सुरु होऊ शकले नाही. आता प्रकल्पाच्या व्याप्तीतील बदलासह सु.प्र. मान्यतेचा प्रस्ताव मंत्रीमंडळ मान्यतेसाठी सादर असून त्यास लवकरच मान्यता प्राप्त होणार आहे.यामुळे पैनगंगा खोऱ्यातील नऊ टीएमसी पाणी अडवून

त्याचा लाभ मराठवाड्यातील नांदेड व विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यास सुमारे ३१००० हेक्टर क्षेत्रास होणार आहे.

१४) नदीजोड प्रकल्प पश्चिम वाहिनी नद्यांचे समुद्राला वाहून जाणारे पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळविण्याच्या अनुषंगाने दोन नदीजोड प्रकल्पांना ऑक्टोबर २०२४ मध्ये प्र.मा. प्राप्त झाल्या आहेत. या योजनांद्वारे एकूण ७.६८ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यात येणार आहे. तसेच सुमारे ७८ टीएमसी इतके पाणी वळविण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला.

१५) जायकवाडी टप्पा-२ सदर प्रकल्पाच्या रु.६४७७.८८ कोटी किंमतीचा पंचम सु.प्र.मा. प्रस्ताव शासनास सादर असून मंजूरी स्तरावर आहे. सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यावर माजलगाव उजवा कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे पुर्ण करुन वहनातील पाणी नाश कमी होणार आहे. तसेच माजलगाव उजव्या कालव्याची किमी १३५ च्या पुढील कामे हाती घेणे शक्य होईल. याचा लाभ नांदेड, बीड व परभणी या जिल्ह्याला होणार आहे.



मा. इंजि.संतोष तिरमनवार

कार्यकारी संचालक

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ

छत्रपती संभाजीनगर

सत्यमेव जयते

डॉ.राधाकृष्ण सिंधुताई एकनाथराव विखे पाटील
मंत्री
जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ)
महाराष्ट्र राज्य

जा.क्र. :

दिनांक :

शुभेच्छा

महाराष्ट्र राज्याच्या जलसंपदा विभागातील एक अभ्यासू आणि अनुभवी असे प्रशासकीय अधिकारी म्हणून श्री.संतोष तिरमनवार यांच्या सेवानिवृतीप्रित्यर्थ स्मरणिकेचे प्रकाशन होत असल्याचा मनस्वी आनंद आहे.

गेली अनेक वर्षापासून श्री.संतोष तिरमनवार आणि माझी व्यक्तिगत मैत्री आहे. अनेकदा पाण्याच्या संदर्भात प्रशासकीय स्तरावर टोकाचे निर्णय झाल्याने कदाचित मतभेद झाले असतील पण मनभेद होवू न देता आमची मैत्री कायम राहीली आहे. माझ्याकडे जलसंपदा विभागाची जबाबदारी आल्यानंतर श्री.संतोष तिरमनवार यांच्याशी अधिक जवळकीचा संपर्क आला.

गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक म्हणून धुरा सांभाळताना त्यांनी आपल्या प्रशासकीय कौशल्याने आणि तांत्रिक ज्ञानाने क्लिष्ट प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पुढाकार घेतला. प्रशासनात काम करताना एक टिम वर्क म्हणून त्यांनी बजावलेली भूमिका खूप महत्वपूर्ण राहीली.

केवळ मराठवाडाच नाही, तर गोदावरी लाभक्षेत्रातील सिंचन सुधारणा कार्यक्रम किंवा सिंचन व्यवस्थापनातील कार्यात श्री संतोष तिरमनवार यांनी दिलेल्या योगदानामूळे गंभीर समस्या सुटण्यास मदत झाल्याचे समाधान आहे.

जलसंपदा विभागातील कार्यकाळाचा त्यांचा प्रदिर्घ अनुभव विभागाकरीता मार्गदर्शक ठरणार आहे. राज्यातील महायुती सरकारने मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र दुष्काळमुक्त करण्याच्या संकल्पात प्रशासनाचे योगदान महत्वपूर्ण ठरणार आहे. यामध्ये श्री संतोष तिरमनवार यांच्या अभ्यासू सूचना मार्गदर्शक ठरल्या.

प्रशासनातील निवृत्ती म्हणजे आपल्या कार्याची समाप्ती नसते. एका नव्या प्रवासाची सुरुवात असते. यानिमित्ताने प्रशासकीय सेवेतील अनुभवाची शब्दबध्द शिदोरी भविष्यातील वाटचालीला एक उर्जा ठरेल.

या स्मरणिकेस आणि श्री.संतोष तिरमनवार यांच्या पुढील वाटचालीस माझ्या मनपुर्वक शुभेच्छा!

(डॉ.राधाकृष्ण विखे पाटील)

कार्यालय : दालन क्र. ५०६ (विस्तार) मंत्रालय, मुंबई – ३२ ☎ ०२२-२२०२५८५०, ०२२-२२०२५२४७ E-mail - minister.waterresources@gmail.com
निवास : रॉयल स्टोन, एम.एल.डहानुकर मार्ग, जपान दुतावास समोर, मुंबई – २६ ☎ ०२२-२३५१५८८९, ०२२-२३५२४६६५

डॉ.संजय बेलसरे
सचिव (लाक्षेवि)

संकीर्ण-२०२६/०५/शुभसंदेश/सचिव
जलसंपदा विभाग, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड
मुंबई-४०००३२.
दिनांक : १३ एप्रिल, २०२६.

:: शुभसंदेश ::

इंजि. श्री. संतोष तिरमनवार, कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर हे नियत वयोमानानुसार दिनांक ३० एप्रिल, २०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्ताने त्यांचे सहकारी, मित्र आणि विश्लेषा प्रकाशन यांच्यावतीने एक गौरव ग्रंथ प्रकाशित करण्यात येत असल्याचे वाचून आनंद झाला. श्री. तिरमनवार यांनी त्यांच्या सेवाकाळात गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ आणि मंत्रालय या ठिकाणी विविध पदांवर कार्य केले आहे. मराठवाडयातील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले प्रकल्प त्यांनी मार्गी लावले. अनेक नव्या प्रकल्पांची कामे सुरु केली. नांदेड जिल्हयातील निम्न मानार, दुधना प्रकल्प, लेंडी प्रकल्प, बीड जिल्हयातील उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प असे अनेक रखडलेले प्रकल्प त्यांनी त्यातील अडचणी सोडवून मार्गी लावले व पुर्णत्वास नेले.

त्याचबरोबर कोकणातील रखडलेल्या प्रकल्पांना गती देण्यासाठी त्यांनी मोलाचे प्रयत्न केले. पश्चिम वाहिनी नद्यांचे शिल्लक पाणी नदीजोड प्रकल्पांतर्गत मराठवाडयाला नेण्यासाठी योजना तयार करतांना त्यांनी केलेले प्रयत्न प्रशंसनीय आहेत. त्याचप्रमाणे महामंडळांतर्गत सिंचनाचा वापर वाढविण्यासाठी विशेष दुरुस्ती, कालवा स्वच्छता अभियान तसेच पाणी वापर संस्थांना सक्षम करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. सन २०२५-२६ मध्ये महामंडळाच्या इतिहासात ५२० कोटी इतकी विक्रमी पाणीपट्टी वसुल केली.

इंजि. श्री. संतोष तिरमनवार, कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांनी महाराष्ट्राच्या जल संवर्धनामध्ये दिलेले योगदान अतिशय महत्वपुर्ण आहे. आपल्या प्रदीर्घ शासन सेवेनंतर ते आता सेवानिवृत्त होत आहेत. त्यानिमित्त त्यांना मन:पूर्वक शुभेच्छा देतो आणि निरामय आरोग्य चिंतितो

डॉ.संजय बेलसरे
सचिव, जलसंपदा (लाभक्षेत्र विकास प्राधिकरण),
मंत्रालय, मुंबई - ३२



विजयकुमार मोरे
लेखक - संपादक

संपादकीय

संतोष जल योगदानाचा...

भारताला सन १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले असले तरी महाराष्ट्रातील मराठवाडा या भागाला वर्षभर उशिरानेच स्वातंत्र्य मिळाले. कारण तिथे निजामाची राजवट होती. पुढे देशाचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांनी पोलिसी कारवाई करून हे निजामी संस्थान खालसा केले. मराठवाड्याला सन १९४८ मध्ये खरे स्वातंत्र्य मिळाले. तत्पूर्वी मराठवाड्यावर निजामाचे साम्राज्य असल्याने या भागाचा म्हणावा तितका विकास झाला नाही. पुढे स्वातंत्र्यानंतर देखील मराठवाड्याच्या वाट्याला उपेक्षाच आली. कायम दुष्काळग्रस्त म्हणून अवहेलना सहन करावी लागली. निसर्गानेच मराठवाड्याला जरा हात आखडता ठेवून वरदान दिले आहे. मराठवाड्यात पाऊस देखील इतर भागांच्या मानाने खूपच कमी पडतो. मराठवाड्यात मोठमोठी जंगले नसल्यामुळे पावसाचे प्रमाण कमीच असते. पाऊस नसल्यामुळे

मराठवाड्यात उगम पावणाऱ्या नद्या देखील फारशा नाहीत. या भागात फारशा नद्या नसल्यामुळे कायम इतर भागात उगम पावणाऱ्या नद्यांवर अवलंबून राहत राहावे लागते. त्यामुळे दुष्काळ हा कायम मराठवाड्याच्या पाचवीलाच पुजलेला असतो. निसर्गाचा दुसरा एक नियम असा आहे की जिथे अशी कायम दुष्काळी परिस्थिती असते, तिथे जन्मणारी मुले मात्र अतिशय काटक, मेहनती आणि सतत प्रयत्नशील असतात. जे आपल्याजवळ नाही ते मिळवण्यासाठी सतत प्रयत्नशील असतात.

मराठवाड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. शेती शिवाय दुसरे उत्पन्नाचे साधन नव्हते. आजच्यासारखी औद्योगिक भरभराट त्यावेळी नव्हती. त्यामुळे कमी पावसाची जिरायती शेती करूनच आपला उदर निर्वाह लोकांना करावा लागायचा. त्यातल्या त्यात मराठवाड्याच्या नांदेड जिल्ह्यातील सीमावर्ती भागातील तालुके तर अतिशय मागासलेले आणि विकासापासून मैलो दूर होते. आदिवासी बहुल असलेल्या किनवट तालुक्याला तर कायमच सापत्नपणाची वागणूक दिली गेली आहे. या भागातून जी मुले आली आहेत ती प्रचंड मेहनती आणि जिद्दीच्या जोरावर पुढे आली आहेत. अतिशय बिकट परिस्थितीत त्यांनी आपल्या जीवनाचा मार्ग स्वतः शोधून काढला आहे. कठीण परिस्थितीतून त्यांनी आपले आयुष्य उभारले आहे. कोणाला तरी प्रथम काट्याकुट्यातून मार्गक्रमण करून एक पाऊलवाट तयार करावी लागते. मग त्या पाऊलवाटेवरून बाकीचे सगळे लोक मार्गक्रमण करीत असतात. हळूहळू ती पाऊलवाट रस्त्यात रूपांतरित होते आणि तो रस्ताच लोकांना विकासाच्या दिशेने घेऊन जात असतो.

नांदेड जिल्ह्यातील किनवट सारख्या अविकसित तालुक्याच्या गावी रामकिशन नारायण तिरमनवार यांचा जन्म एका शेतकरी कुटुंबात झाला. शेती शिवाय दुसरे उत्पन्नाचे साधन नाही आणि शेती हा व्यवसाय देखील बे भरोशाचा होता. त्यातच अफाट काबाडकष्ट करूनही पोटापुरते पिकत नव्हते. त्यात होती ती जमीन देखील शासनाने लोकांना रोजगार मिळावा म्हणून सुरू केलेल्या नागझरी या मध्यम प्रकल्पात गेली. त्यामुळे शेतीचे उत्पन्न घटले. अर्थात शिकून कुठे तरी नोकरी करावी या उद्देशाने रामकिशन यांनी अतिशय चिवटपणे आपले शिक्षण पूर्ण केले. गरज ही शोधाची जननी आहे असे म्हटले जाते. आर्थिक दुर्बलता दूर करण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे लक्षात आल्यानंतर रामकिशन तिरमनवार यांनी पोटाला चिमटा काढून कठीण परिस्थितीत संकटाचा सामना करीत आपले शिक्षण पूर्ण केले. राज्याच्या गृह विभागात अर्थात पोलीस खात्यात नोकरी मिळवली. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे

एके नापि सुपुत्रेन भूषितेन सुविधया
विराजती कुल सर्व चंद्रेन रजनी यथा

एखाद्या गरीब कुटुंबातला एखादा मुलगा शिकून सवरुन मोठा झाला की तो आपल्या संपूर्ण कुटुंबाचे नाव उज्वल करतो. जसे की एका चंद्रामुळे संपूर्ण पृथ्वी उजळून निघते आणि शोभून दिसते. त्याप्रमाणे रामकिशन तिरमनवार यांनी आपल्या आयुष्याचा मार्ग स्वतः निवडला. शिक्षणाच्या माध्यमातून नोकरी मिळवली आणि त्यांच्या संसाराचा गाडा दररोजच्या अडचणीच्या वाटेवरून सरकून तो स्थिरतेच्या दिशेने निघाला. पुन्हा त्यांच्या आयुष्यातील स्थित्यंतरे सुरू झाली. लग्न, मुले आणि संसार या स्थित्यंतरातून अतिशय संयमाने आणि धाडसाने

त्यांनी आपल्या आयुष्यातील महत्त्वाच्या वळणावर पावले उचलली. त्यामुळे त्यांची चारही मुले शिकून सुखी जीवनाच्या मार्गावरून चालू लागली. दोन नंबरचा मुलगा संजय हा शासनाच्या संरक्षण विभागात सेवेत रूजू झाला. छोटा प्रशांत ग्रामसेवक म्हणून गाव पातळीवर शासनाच्या सेवेत कायरर्त झाला तर पहिला आणि मोठा मुलगा संतोष हा अभियंता बनून शासनाच्या तात्कालीन पाटबंधारे खात्यात अभियंता म्हणून नोकरीस लागला. ज्या कुटुंबाला शेतीच्या तुटपुंज्या उत्पन्नावर आपली गुजराण करावी लागत होती, त्या कुटुंबाच्या प्रमुखाने शिक्षणाची वाट दाखवल्यामुळे पुढची आख्खी पिढी प्रगतीच्या रस्त्यावरून चालायला शिकली.

रामकिशन तिरमनवार यांचा संतोष हा सुपुत्र इतर मुलांपेक्षा जरा वेगळा आहे. अभ्यासात कायम हुशार. परिस्थितीची सतत जाणीव असलेला आणि कर्तव्य तत्पर आहे. वडील पोलीस खात्यात सेवेत असल्यामुळे वारंवार या गावाहून त्या गावाला बदल्या होत असत. त्या बदल्यांबरोबर कुटुंबाचेही सारखे स्थलांतर होत असे. त्यामुळे मुलांच्या शिक्षणाची देखील हेळसांड होत असे. परंतु तिरमनवारांची तिन्ही मुले अतिशय कष्टाळू आणि शिस्तप्रिय होती. त्यामुळे वडिलांच्या अनेकदा बदल्या झाल्या तरी त्यांनी आपले शिक्षणावरील लक्ष विचलित होऊ दिले नाही. दरवर्षी शाळेत आपल्या वर्गात पहिला किंवा दुसरा नंबर त्यांनी कधीही सोडला नाही. एकदा का शिक्षणाची गोडी लागली की ती सुटत नाही. ती ध्येयापर्यंत पोहोचेस्तोवर कायम टिकते. पूर्वी सरकारी कर्मचाऱ्यांची मुले आणि तीही पोलीस खात्यातील असतील तर त्या सर्वांचे शिक्षण जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये होत असे. त्यावेळी महागड्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा मराठवाड्यात फारशा नव्हत्या आणि असल्या तरी देखील पोलीस खात्यातील

कर्मचाऱ्यांना परवडणाऱ्या नव्हत्या. त्यामुळे रामकिशन तिरमनवार यांची चारही मुले जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळांतून शिकली आहेत. त्यामुळे त्यांच्या शिक्षणातील गुणवत्तेत काहीही फरक पडलेला नाही. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी आपले शिक्षण चालू ठेवले. संतोष तिरमनवार यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण नांदेड, यवतमाळ, जालना, धुळे या ठिकाणी पार पडले आहे. शिक्षणातील चिकाटी आणि अध्ययन प्रियतेच्या जोरावर त्यांनी दहावीच्या परीक्षेत चांगले गुण मिळवले. दहावीला जर चांगले गुण मिळाले तर तेथून पुढचा करिअरचा मार्ग ठरायचा. त्याप्रमाणे संतोष तिरमनवार यांनी अभियांत्रिकीचा मार्ग निवडला. मिळालेले गुण आणि इंजिनियर व्हायची इच्छा यामुळे त्यांनी यवतमाळ येथील शासकीय पॉलिटेक्निकमध्ये सिव्हिल इंजिनिअरच्या डिप्लोमा साठी प्रवेश घेतला. त्यावेळी अधिकारी होणे वगैरे काही गोष्टी डोक्यात नसायच्या. इंजिनिअरिंगचा डिप्लोमा कोर्स पुर्ण करायचा आणि पटकन कुठेतरी नोकरी धरायची असा तो काळ होता. त्याप्रमाणे त्यांनी मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर १९८६ मध्ये यवतमाळच्या शासकीय पॉलिटेक्निक मधून सिव्हिल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा पूर्ण केला. डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर नोकरीची चौकशी सुरू झाली.

हिमालयात आपण एखाद्या पर्यटन स्थळाला भेट दिली असेल तर एक गोष्ट आपल्या लक्षात येते, एक डोंगर चढून गेले की तिथे त्याच्यावर आणखी एक डोंगर आपल्याला दिसतो. तिथे पोचले की पुढे वर आणखी एक शिखर दिसते. तसे ध्येयाने पछाडलेल्या मुलांने एखादे ध्येय साध्य केले की त्याला पुढे नवे ध्येय दिसायला लागते. तिथे पोचले की आणखी पुढे नवे ध्येय सापडते. अशा प्रकारे ध्येयाची नवनवीन शिखरे खुणावू लागतात आणि यशाचा मार्ग दिसू लागतो.

संतोष तिरमनवार यांनी सिव्हिल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा पूर्ण केल्यावर नोकरीच्या मागे न लागता सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी घेण्याचा ध्यास धरला. यवतमाळ येथील शासकीय पॉलीटेक्नीकमध्ये गुणवत्ता यादीत आल्याने थेट त्यांना अभियांत्रिकीच्या पदवीच्या दुसऱ्या वर्षाला प्रवेश मिळाला. मुंबईतील प्रसिध्द असलेल्या व्हीजेटीआय या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये सिव्हील अभियांत्रिकीच्या थेट दुसऱ्या वर्षाला प्रवेश मिळाला. किनवट सारख्या आदिवासीबहुल गावातून सुरू झालेला संतोष तिरमनवार यांचा शिक्षणाचा प्रवास नांदेड, धुळे मार्गे यवतमाळला येऊन पोहोचला आणि तेथून उच्च शिक्षणाच्या दिशेने मुंबईपर्यंत गेला. मुंबई हे असे ठिकाण आहे की तिथे पोहोचलेल्या माणसाला जीवनातील अनेक मार्ग उपलब्ध असतात. फक्त प्रचंड आवड, इच्छाशक्ती आणि कष्ट करण्याची तयारी हवी असते. या मायानगरीत कार्यरत असताना स्पर्धेची देखील जाणीव होते आणि सवय देखील होते. इथे प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा असते याची प्रत्येकाला जाणीव होत असते. या स्पर्धेत टिकायचे म्हटले की उच्च शिक्षणाशिवाय पर्याय नाही. उच्च शिक्षण घेऊन तेवढ्यावरच भागत नाही तर लाखो विद्यार्थ्यांसोबत स्पर्धा परीक्षा द्यावी लागते. त्यासाठी प्रचंड मेहनत घेऊन अभ्यास करावा लागतो. लाखो विद्यार्थ्यांमधून गुणवत्तेने उत्तीर्ण व्हावे लागते. तेव्हा कुठे अधिकारी होता येते. याची जाणीव असल्यामुळे संतोष तिरमनवार यांनी अथक मेहनत घेऊन मुंबईसारख्या मायानगरीत राहून स्वतः ला चंगळवादापासून दूर ठेवून मुंबईच्या व्हीजेटीआय इंजिनिअरिंग कॉलेजमधून सिव्हिल इंजीनियरिंगची पदवी संपादन केली.

दरम्यानच्या काळात महाराष्ट्र सरकारचे त्यावेळी झिरो बजेट

सुरू असल्याने नवीन नोकर भरती बंद झाली होती. हजारो विद्यार्थी इंजिनियरिंगची परीक्षा देऊन बाहेर पडले होते, परंतु नोकऱ्या नव्हत्या. अशा वेळी हातावर हात बांधून ठेवून बसण्याऐवजी पुढील उच्च शिक्षणाचा मार्ग श्री संतोष तिरमनवार यांनी निवडला. त्याच वेळी इंजिनियरींगच्या पदवीनंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन वर्ग एकचे अधिकारी होता येते याची जाणीव देखील त्यांना झाली होती. त्यामुळे त्यांनी पुढे गुणवत्तेनुसार एन्व्हायरमेंटल इंजिनियरिंगमधील पदव्युत्तर पदवीसाठी त्याच कॉलेजमध्ये प्रवेश घेतला आणि सोबतच राज्य लोकसेवा आयोगाच्या अर्थात एमपीएससी परीक्षेचा अभ्यास सुरू केला.

राज्यातील सर्वात अवघड असणारी एमपीएससीची परीक्षा त्यांनी उत्तीर्ण केली. याचा प्रचंड आनंद तिरमनवार कुटुंबाला झाला. यासाठी संतोष तिरमनवार यांना तब्बल दोन वर्षे वाट बघावी लागली. सन १९९२ मध्ये त्यांनी एमपीएससीची परीक्षा दिली आणि उत्तीर्ण झाले. मात्र त्यांना पदस्थापना १९९४ मध्ये मिळाली. तेव्हाच्या औरंगाबाद जिल्ह्यातील जायकवाडी विभागांतर्गत तीर्थपुरी उपविभागात सहाय्यक कार्यकारी अभियंता म्हणून त्यांची प्रथम नियुक्ती झाली. शासकीय सेवेत अधिकारी म्हणून नेमणूक झाल्यानंतर संपूर्ण तिरमनवार परिवाराला आकाश ठेंगणे वाटू लागले. केलेल्या कष्टाचे चीज झाल्याचे पाहून सर्वांना आनंद झाला. कामात नवनवीन क्षितिजे, धाडस आणि उर्मी यातून काही नवीन शिकायला मिळत आहे याचा आनंद संतोष तिरमनवार यांना झाला. त्यानी पहिल्याच वेळी प्रचंड मेहनत घेतली . त्यावेळी त्यांचे वरिष्ठ अधिकारी आणि कार्यकारी अभियंता श्री राम घोटे यांनी त्यांच्या कामाचा झटका

आणि आवाका बघून सांगितले की या तरुण अभियंत्याच्या हातून काहीतरी भरीव कार्य घडेल. असे वक्तव्य श्री घोटे यांनी त्यावेळी केले होते. पुढे ते अगदी कृत्य खरे ठरल्याचे दिसून आले आहे.

जायकवाडीच्या तीर्थपुरी उपविभागामध्ये कार्यरत असताना त्यांच्याकडे सिंचन व्यवस्थापन हा विषय होता. त्यांच्या सुरुवातीच्या काळातच त्यांच्या कार्य पध्दतीची चुणूक लक्षात आली होती. जे काम आपण हाती घेतलेले असते, त्यावर लक्ष केंद्रित करून ते काम जास्तीत जास्त चांगले कसे होईल असा प्रयत्न ते करीत असत. एखादी गोष्ट कळाली नसेल किंवा समजत नसेल तर ते शिकून किंवा समजून घेऊन करण्याचा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे पुढे या गुणांचा त्यांना प्रशासक म्हणून काम करताना खूप उपयोग झाला. सुरुवातीचे एक दीड वर्ष सिंचन व्यवस्थापनांमध्ये काम केल्यानंतर त्यांची विनंतीवरुन बदली उर्ध्व पैनगंगा बांधकाम विभाग नांडेड येथे झाली. या ठिकाणी देखील त्यांनी नव्या दमाने काम केले. त्यांच्या कामाचे वैशिष्ट्य सुरुवातीपासून असे होते की एखादे काम हाती घेतले की ते विक्रमी वेळेत आणि गुणवत्ता पूर्ण रीतीने पूर्ण केल्याशिवाय त्यांना चैनच पडत नसे. जलसेतू, कालव्यांचे अस्तरीकरण अशा वेगवेगळ्या प्रकारच्या बांधकामाचा अनुभव त्यांना या ठिकाणी मिळाला. त्यांचा कामातील प्रामाणिकपणा आणि चिकाटी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मनात भरण्यासारखी होती. त्यांच्या कामाच्या बाबतीत आजही त्यांचे तात्कालीन वरिष्ठ अधिकारी त्यांचे कौतुक करत असतात.

उर्ध्व पैनगंगा प्रकल्पानंतर त्यांची पदोन्नती झाली आणि ते कार्यकारी अभियंता झाले. त्यांची पहिली पोस्टिंग पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग यवतमाळ या ठिकाणी झाली. त्यांच्या काळात निम्न पैनगंगा मोठा प्रकल्प महादापूर, पाच पहूर प्रकल्पाचा अहवाल तयार

झाला. या ठिकाणी दीड वर्षे काम केल्यानंतर संतोष तिरमनवार यांची बदली पुन्हा मध्यम प्रकल्प विभाग नांदेड येथे झाली. त्या ठिकाणी रुजू झाल्यानंतर त्यांच्या कारकिर्दीला खरी चमक प्राप्त झाली. नांदेडचे सुपुत्र आणि राज्याचे तात्कालीन मुख्यमंत्री स्वर्गीय शंकरराव चव्हाण साहेब यांनी मराठवाड्यातील पाण्याचे दुर्भिक्ष्य लक्षात घेता अनेक पाटबंधारे प्रकल्पांच्या कामांना मंजुरी दिली होती. परंतु पुढे भूसंपादनाचे प्रश्न, आर्थिक तरतुदीचे प्रश्न यामुळे अनेक प्रकल्प रखडले होते. सन १९७२ च्या दुष्काळात सुरू झालेले प्रकल्प वर्षानुवर्षे प्रलंबित राहिले होते. त्या सर्व प्रकल्पाच्या मूलभूत समस्यांचा अभ्यास संतोष तिरमनवार यांनी केला आणि त्याच्या मुळाशी ते गेले. चांडोळा, जामखेड आणि तळणी या प्रकल्पांची २०-२५ वर्षापासून रखडलेली कामे तडीस नेऊन प्रकल्प पूर्णत्वास नेले. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास मोठ्या प्रमाणावर वाढला. अडचणी किती असल्या तरी त्यातून मार्ग कसा काढायचा याचे कौशल्य त्यांनी आत्मसात केले होते. संतोष तिरमनवार यांची मातृभूमी असलेल्या किनवट तालुक्यातील रखडलेल्या प्रकल्पांना पूर्ण करण्याची संधी त्यांच्याकडे चालून आली होती. त्या संधीचे त्यांनी सोने केले. किनवट तालुक्यातील मांडवी, शिरपूर आणि पलाईगुडा या रखडलेल्या प्रकल्पाचे काम त्यांनी अतिशय मन लावून पूर्णत्वास नेले. त्यामुळे या भागातील पाण्याचा प्रश्न धसास लागला. त्यांच्या कामाचा धडाका बघून वरिष्ठ अधिकारीही त्यांच्यावर खूश होते. एकदम डॅशिंग अधिकारी म्हणून त्यांचे काम सुरू होते. कधी कधी निधीची कमतरता असायची. त्यावेळी ते आपले कौशल्य पणाला लावून निधीची उपलब्धता करून घ्यायचे आणि कामातील अखंडता कायम ठेवायचे. अनेकदा प्रकल्पग्रस्त लोक किंवा शेतकरी प्रकल्पाच्या कामाला विरोध करून कामात व्यत्यय आणत असत.

परंतु श्री तिरमनवार अतिशय निडरपणे काम करत असत. दोन–तीन वेळा तर त्यांनी पोलिसांचा फौज फाटा तैनात करून काम सुरू ठेवले होते. त्यामुळे या डॅशिंग अधिकाऱ्याची चर्चा गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळापासून ते अगदी मंत्रालयापर्यंत सुरू झाली होती. ऐन उमेदीच्या काळात त्यांनी कार्यकारी अभियंता म्हणून एखाद्या यंग्री यंग मॅन सारखे काम सुरू केले होते. कोणतेही संकट आले किंवा काम बंद पडले की ते एखाद्या हिरो प्रमाणे कामातील अडचणी व्यक्तिशः लक्ष घालून प्रकल्प पूर्ण करत असत. त्यामुळे त्यांची प्रतिमा यंग्री यंग मॅन अशी झाली होती. त्याचा परिणाम असा झाला की नांदेड जिल्ह्यात जिथे जिथे प्रकल्प विविध कारणांनी बंद पडले होते, ते पूर्ण करण्याची जबाबदारी श्री तिरमनवार यांच्याकडे सोपविण्यात आली. त्यांनी ती अगदी आत्मविश्वासाने पूर्ण देखील केली.

त्यानंतर त्यांच्या कामाची ख्याती मंत्रालयापर्यंत पोचली. त्या वेळचे पाटबंधारे मंत्री डॉ.पद्मसिंह पाटील यांनी दुष्काळग्रस्त तात्कालिन उस्मानाबाद आणि आत्ताचा धाराशिव जिल्ह्यात पाटबंधारे प्रकल्प मोठ्या प्रमाणात सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी त्यांना चांगल्या कार्यक्षम आणि धाडसी अधिकाऱ्यांची एक टीम तयार करायची होती. त्यासाठी टीम लीडर म्हणून डॉक्टरांनी मराठवाड्यातील भूमिपुत्र आणि पाटबंधारे खात्यातील तेव्हाचे अधीक्षक अभियंता श्री बाबूराव कंदरफळे यांची निवड केली होती. श्री कंदरफळे यांनी मंत्री महोदयाच्या सूचनेनुसार मराठवाड्यातील भूमिपुत्र असलेले कार्यक्षम अधिकारी अचूक हेरून त्यांची बदली उस्मानाबाद जिल्ह्यात करून त्यांची एक सक्षम टीम बनवली होती. त्यामध्ये इंजि. अतुल कपोले, इंजि. संतोष तिरमनवार, इंजि. अजय कोहिरकर, इंजि. हनुमंत गुणाले, इंजि. आशिष देवगडे यासारख्या कार्यक्षम अधिकाऱ्यांचा

त्यात समावेश होता. त्या काळात या टीमने न भूतो न भविष्यती अशा प्रकारे अक्षरशः झपाटल्यासारखे काम केले आहे. पाटबंधारे मंत्री डॉ. पद्मश्री पाटील साहेब यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेला निम्न तेरणा उपसा सिंचन योजना पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांनी तिरमनवार यांच्यावर सोपवली होती. या प्रकल्पाच्या टप्पा क्रमांक १ ते ५ ची उर्वरित कामे त्यांनी अतिशय व्यवस्थितरीत्या पूर्ण केली. त्यावेळी उस्मानाबाद जिल्ह्यात अनेक कामांची उद्घघाटने, भूमिपूजने झाली होती. परंतु काही ना काही कारणामुळे अनेक प्रकल्प अर्धवट अवस्थेत राहिले होते. ते श्री तिरमनवारांनी पूर्ण केले. तसेच वडाळा कालव्याचे काम अर्धवट राहिले होते. ते वीस किमीपर्यंत पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांनी पार पाडली. अनेक मोठी कामे देखील त्यांनी पूर्णत्वास नेली. त्यामुळे पुन्हा त्यांच्या कामाची चर्चा अधिकाऱ्यांमध्ये सुरू झाली.

संतोष तिरमनवार यांच्या कामाच्या पद्धतीवर अधीक्षक अभियंता राम घोटे अतिशय संतुष्ट होते. ते जेव्हा अधीक्षक अभियंता म्हणून नांदेड येथे आले, तेव्हा अनेक रखडलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्यांना श्री तिरमनवार यांची आठवण झाली. सन २००३ मध्ये नांदेड पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता असताना राम घोटे यांनी कार्यकारी अभियंता संतोष तिरमनवार यांची खास विनंती करून बदली नांदेड पाटबंधारे विभाग येथे करून घेतली. त्यावेळी संपूर्ण नांदेड जिल्ह्याचे सिंचन व्यवस्थापन त्यांच्याकडे देण्यात आले होते. अतिशय महत्त्वपूर्ण असलेल्या विष्णुपुरी प्रकल्पाचे सिंचन व्यवस्थापन सलग पाच वर्षे अतिशय सुरळीतपणे राबविण्याचा विक्रम त्यांच्याच नावे आहे. त्यांचा दुसरा विक्रम म्हणजे निम्न मानार प्रकल्पाचे उंची वाढवण्याचे कामकाज अनेक कारणांनी वर्षानुवर्षी रखडलेले होते. कोणी अधिकारी या प्रकल्पावर काम करण्यास जाण्यास इच्छुक

नसायचा. परंतु तिरमनवार यांनी हे काम एक आव्हान म्हणून स्वीकारले. हे काम पूर्ण करण्यासाठी त्यांना तीन वर्षाचा कालावधी देण्यात आला होता. परंतु योग्य नियोजन आणि कार्य तत्परता यामुळे त्यांनी हे काम अवघ्या एका वर्षात पूर्ण केले. आठवड्यातून साईट व्हिजिट आणि टेस्टिंग अशी नियोजनबद्ध कार्यपद्धती अवलंबल्यामुळे या प्रकल्पाचे १८१ गेट बसून प्रकल्प एक वर्षाच्या आत पूर्ण केला. हा प्रकल्प त्यांच्या सेवा काळातील एक माईलस्टोनच ठरला आहे.

संतोष तिरमनवार यांच्या कारकिर्दीतील आणखी एक अनोखी आणि महत्त्वपूर्ण घटना म्हणजे सन २००५ साली गोदावरी नदीला आलेला महापूर होय! त्यावर्षी मराठवाड्यात आणि नाशिक भागात इतक्या मोठ्या प्रमाणावर पाऊस झाला की जायकवाडी, पूर्णा आणि माजलगाव या धरणातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करावा लागला. त्यामुळे गोदावरी महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी, खात्याचे सचिव आणि खात्याचे मंत्री यांची चिंता वाढली. या तिन्ही धरणातून पाणी सोडले गेले तर गोदावरी तीरावरील गावे आणि नांदेड शहराचे काय होणार याची चिंता त्यांना लागून राहिली. त्यावेळी तिरमनवार यांनी केलेले पुराच्या पाण्याचे नियोजन आणि व्यवस्थापन बघून वरिष्ठांनी सुटकेचा नि:श्वास टाकला आणि महाभयंकर अशा पुरापासून हजारो लोकांचे प्राण वाचले आणि मोठ्या प्रमाणावर होणारी वित्त हानी देखील टळली. श्री तिरमनवार यांनी पुराचे नियोजन करताना जायकवाडी, पूर्णा आणि माजलगावचे पाणी एकत्र येऊ न देता ठराविक काळानंतर सोडल्यामुळे महापूर टळला. जायकवाडी धरणाचे विसर्गाचे पाणी नांदेड येथे पोहोचण्यास ७२ तास लागतात. तसेच पुर्णाचे पाणी नांदेडला पोहोचण्यासाठी १२ तास लागतात तर माजलगावचे पाणी नांदेडला पोहोचण्यासाठी २४ तास लागतात. या तिन्ही धरणातून

सोडण्यात आलेले पाणी नांदेडपर्यंत पोहचण्यासाठी लागणाऱ्या या वेळांचे योग्य नियोजन करून त्या तिन्ही ठिकाणाहून सोडलेले पाणी एकत्र येणार नाही अशा प्रकारे नियोजन करून महापुराचे नियंत्रण अतिशय चांगल्या पद्धतीने केले. ही अतिशय महत्त्वाची काळजी त्यांनी त्यावेळी घेतली आणि अनेक वरिष्ठांच्या कौतुकास ते पात्र ठरले. त्यावेळी नांदेडचे जिल्हाधिकारी घन:श्याम मोपलवार हे होते. त्यांच्याशी योग्य तो समन्वय साधून व जनतेशी संपर्क करून हा महापूर हाताळता गेला. या महापूर नियंत्रणाचे सर्वत्र कौतुक झाले.

याच कालखंडात झालेले महत्त्वाचे काम म्हणजे गुरु ता गद्दीच्या वेळी झालेली अतुलनीय अशी बांधकामे. विशेष म्हणजे या काळात तिरमनवार यांच्याकडे संपूर्ण नांदेड जिल्ह्याचे सिंचन व्यवस्थापन होते. त्यांच्याकडे बांधकामाची कामे नव्हती. परंतु वरिष्ठांना त्यांच्या कार्यशैलीची कल्पना होती. विशेष म्हणजे जलसंपदा खात्याचे तात्कालिन सचिव श्री व्यंकटराव गायकवाड यांचा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शीख धर्मीयांचे गुरु गोविंद सिंग यांनी गुरुग्रंथ साहेब यांना शाश्वत गुरुच्या रूपामध्ये नांदेड येथे स्थापित केले होते. या गोष्टीला ३ नोव्हेंबर २००८ रोजी ३०० वर्षे पूर्ण झाली होती. त्या निमित्ताने नांदेडमध्ये खूप मोठा उत्सव होणार होता आणि त्या निमित्ताने शहरात देशभरातून नव्हे तर जगभरातून लाखो लोक येणार होते. त्यामुळे लोकांच्या सोयी सुविधांसाठी नाविन्यपूर्ण बांधकामे करायची होती. त्यासाठी एका सक्षम अधिकाऱ्याकडेच ही जबाबदारी सोपविणे गरजेचे होते. त्यामुळे तात्कालीन सचिव श्री गायकवाड यांनी तिरमनवार यांच्याकडे ही जबाबदारी सोपविली. गुरु ता गद्दीच्या निमित्ताने नांदेड शहरात गोदावरीच्या तीरावर नाविन्यपूर्ण असा घाट बांधण्याचे ऐतिहासिक काम तिरमनवारांनी यशस्वीपणे पूर्ण

करून दाखवले आहे. या कामाचे आजही कौतुक होत आहे.

त्यानंतर नोव्हेंबर २००७ मध्ये निम्न दुधना प्रकल्पाचा वाद चिघळला होता. लोक काम करू देत नव्हते. चांगले अधिकारी देखील या ठिकाणी काम करायला तयार होत नव्हते. अधिकाऱ्यांचा असा ठाम समज होता की जो अधिकारी या ठिकाणी कामावर रुजू होतो, त्याच्यामागे चौकशीचा ससेमिरा लागतो. त्यामुळे कोणीही अधिकारी या ठिकाणी यायला तयार नव्हते. जरी असे असले तरी वाटेल ते करून लवकरात लवकर हा प्रकल्प पुर्ण करणे गरजेचे होते. अशा वेळी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यामध्ये सचिव श्री व्यंकटराव गायकवाड, गोदावरी महामंडळाचे तात्कालिन कार्यकारी संचालक पी.सी. झपके, अधीक्षक अभियंता राम घोटे आणि मुख्य अभियंता संपूतवाड या अधिकाऱ्यांनी मिळून ही जबाबदारी संतोष तिरमनवार यांच्यावर सोपविली. एवढ्या मोठ्या अधिकाऱ्यांनी अतिशय विश्वासाने त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविल्याने त्यांनी ती जबाबदारी आव्हान म्हणून स्वीकारली. या प्रकल्पावर नवीन अधिकारी आला की लोक त्याला भंडावून सोडत असत. कामच करू देत नसत. श्री तिरमनवार यांनी अगदी पहिल्या दिवसापासून पोलीस बंदोबस्त घेऊन कामाला सुरुवात केली. मराठवाड्यातील महत्त्वाच्या मोठ्या प्रकल्पापैकी हा एक होता. त्यामुळे या प्रकल्पाची घळभरणी होणे अतिशय गरजेचे होते. तिरमनवार यांनी आपले कौशल्य पणाला लावून प्रकल्पग्रस्ताच्या समस्या त्यांना भेटून समजावून घेतल्या आणि त्या लवकरात लवकर सोडविण्याचे आश्वासन दिले. त्यांच्या बोलण्यातील आश्वासकता आणि त्वरित निर्णय घेण्याची क्षमता बघून प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि वर्षानुवर्षी रखडलेल्या या प्रकल्पाची घळभरणी अवघ्या सहा महिन्यातच पूर्ण झाली. या

प्रकल्पामुळे जवळपास २२ गावे विस्थापित होणार होती. त्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न लोंबकळत पडल्यामुळे लोक काम करून देत नव्हते. त्यावेळी तिरमनवार यांनी या गावातील प्रतिष्ठित लोकांना आणि पुनर्वसन समितीला विश्वासात घेऊन विभागीय आयुक्ताकडे बैठक घेतली. त्यावेळी निधीची उपलब्धता झाली नसली तरी विभागीय आयुक्तांनी २२ गावांच्या पुनर्वसनाच्या जागेवर सोयी सुविधा उपलब्ध करण्यासाठी पाण्याची सोय म्हणून एकाच वेळी २२ गावांसाठी प्रत्येकी चार अशा ८८ बोरवेल करण्यासाठी मंजूरी दिली. त्यावेळी श्री तिरमनवार यांनी पुढाकार घेऊन त्वरित त्याची अंमलबजावणी करून जवळपास ८० बोरवेल एकाच वेळी सुरू केल्या. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये एकदम आनंदाची लाट पसरली. ज्या जागेवर स्थलांतर होणार होते तेथे पाण्याची मूलभूत सुविधा उपलब्ध झाल्याने लोक राजीखुशीने स्थलांतरास तयार झाले. त्यानंतर तिरमनवार यांना घळभरणीचे काम करण्यास मोकळीक मिळाली. त्यामुळे जे काम कधी होणार की नाही अशी शंका व्यक्त केली जात होती ते काम अवघ्या सहा महिन्यात त्यांनी पुर्ण केले. मराठवाड्यात एक आनंदाची लाट पसरली. मराठवाड्यातला एक मोठा प्रकल्प पुर्ण झाला त्याचे श्रेय तिरमनवार यांनाच दिले गेले पाहिजे.

सन २००८ मध्ये संतोष तिरमनवार यांची बदली महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळात संकल्पचित्र विभागात झाली. या ठिकाणी काम करीत असताना अनेक पत्रांचा मसुदा किंवा काही दिवस लिखाण करावे लागत असे. ते लिखाण आणि त्यातील भाषा इतकी चांगल्या प्रकारे लिहिलेली असायची की खुद महामंडळाचे तात्कालिन कार्यकारी संचालक श्री कोळवले यांना ते खूप आवडले. त्यानंतर त्यांनी चौकशी केल्यानंतर त्यांना कळले की ते तिरमनवार

यांचे ड्राफ्टिंग आहे. त्यानंतर कोळवले यांनी खास आग्रह करून त्यांना महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कार्यालयात नियुक्ती दिली. या ठिकाणी कार्यरत असताना त्यांनी चांगल्या पद्धतीने काम केले. त्यांच्याकडे अधीक्षक अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभारदेखील देण्यात आला. या ठिकाणी तब्बल चार वर्षे त्यांनी काम केले. त्यानंतर ऑगस्ट २०१३ मध्ये तिरमनवार यांची अधीक्षक अभियंता म्हणून पदोन्नती झाली आणि बीड पाटबंधारे मंडळ परळी येथे त्यांची पदोन्नतीने नियुक्ती झाली. पदोन्नतीचे वेळी तात्कालीन सचिव श्री एकनाथ पाटील यांनी त्यांना अनेक वर्षापासून रखडलेल्या उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याचे उदिष्ट दिले. पुन्हा तिरमनवार यांनी जोमाने कामाला सुरुवात केली. सुरुवातीलाच त्यांनी अनेक वर्षांपासून रखडलेला हा उर्ध्व कुंडलिका प्रकल्प हाती घेतला. यात रुई या एका गावाचे पुनर्वसन करायचे बाकी होते. त्यासाठी केंद्र शासनाचा निधी उपलब्ध करून तो प्रकल्प त्यांनी मार्गी लावला. हा प्रकल्प वडवणी तालुक्यात असून तो तिरमनवार यांनी दोन वर्षात पूर्ण केला आणि त्या रुई गावाचे पुनर्वसन देखील पुर्ण केले.

दरम्यानच्या काळात लातूर जिल्ह्यातील मांजरा आणि तेरणा नदीवर बॅरेजेसचे काम सुरू होते. तेथेही निधी आणि अन्य कारणामुळे ते प्रकल्प अपूर्ण अवस्थेत होते. त्यामुळे तिरमनवार यांना या बॅरेजेसचे काम पूर्ण करण्याची जबाबदारी सोपविली गेली. त्यावेळी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे महामंडळाचे कार्यकारी संचालक श्री बिराजदार होते. मांजरावरील शेवटचा बॅरेज होसूर हा होता. त्यासाठी निधी मोठ्या प्रमाणावर लागणार होता. निधी अभावी प्रकल्प रखडला होता. शेवटी तिरमनवार यांनी कार्यकारी संचालक श्री बिराजदार

यांची प्रत्यक्ष भेट घेऊन हा प्रकल्प पूर्ण होणे किती गरजेचे आहे हे पटवून दिले. त्यानंतर त्यांनी त्या बॅरेजसाठी निधी उपलब्ध करून दिला. तो बॅरेज देखील तिरमनवार यांनी वेळेत पूर्ण केला. पुढील एक ताबडतोब पूर्ण करण्यात आलेला आणखी एक रखडलेला प्रकल्प म्हणजे बोळेगाव ल.पा. तलाव! आसपासच्या लोकांच्या पिण्याच्या आणि शेतीच्या पाण्याच्या दृष्टिकोनातून तो महत्त्वाचा होता. त्यावर तिरमनवार यांची दृष्टी पडली तेव्हा त्यातील अडचणी लक्षात आल्या. त्यांनी थेट मंत्रालय गाठले आणि आपले पूर्ण कसब पणाला लावून प्रयत्न सुरू केले. त्यावेळी तेथे व्ही. एम. कुलकर्णी हे सहसचिव होते. त्यांनी तिरमनवार यांचा पत्र व्यवहार आणि प्रयत्नांची पराकाष्टा स्वतः बघितली होती. श्री कुलकर्णी यांना त्याचे अप्रूप वाटले. त्यांच्या कामाचा झपाटा बघून त्यांना बोळेगाव प्रकल्प प्रकरणी सहकार्य तर केलेच याशिवाय मंत्रालयात बदली करून या आणि येथेच काम करा असा सल्ला देखील दिला.

इंजि.संतोष तिरमनवार यांची बदली सन २०१६ मध्ये मंत्रालयात उपसचिव म्हणून झाली. त्यावेळी त्यांच्याकडे खात्यातील कृष्णा,तापी व कोकण खोऱ्यातील मोठ्या प्रकल्पांची जबाबदारी देण्यात आली. तिथे त्यांच्या कार्यक्षमतेचा कस लागला आणि त्यांना उर्वरित राज्यातील मोठ्या प्रकल्पाची धोरणे आखण्याची जबाबदारी पार पाडता आली. महाराष्ट्र कृष्णा खोरे, तापी खोरे महामंडळ आणि कोकण महामंडळातील अनेक मोठ्या प्रकल्पांना चालना देण्यासाठी त्यांनी मनापासून प्रयत्न केले. त्यावेळी इक्बाल सिंग चहल हे जलसंपदा खात्याचे सचिव होते. त्यांचा दृष्टिकोन अतिशय सकारात्मक होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रकल्पाची धोरणे ठरवून ती मार्गी लावता आले. बंद पडायच्या मार्गावर

असलेल्या यांत्रिकी विभागास पुन्हा सक्रिय करण्यात आले. त्यामुळे मंत्रालयात उपसचिव म्हणून कार्यरत असताना त्यांनी आपल्या वेगळ्या कार्यशैलीचा प्रत्यय दाखवून दिला.

पुढे सन २०१९ ते २०२१ या तीन वर्षाच्या कालावधीत ते कोकण पाटबंधारे विकास महामंडळात मुख्य अभियंता म्हणून कार्यरत राहिले. परंतु तो काळ देशभरात कोरोनाचे थैमान पसरलेला होता. तरी देखील त्यांनी रखडलेल्या प्रकल्पाची कामे पुढे सरकवण्याचा प्रयत्न केला. तेथे त्यांनी अरुणा प्रकल्पाची उर्वरित कामे पुर्ण केली. सुर्या प्रकल्प व मुमरी प्रकल्पांाला गती दिली.

त्यानंतर पुन्हा तिरमनवार यांची बदली पुणे येथे गुण नियंत्रण व जलविद्युत मुख्य अभियंता पदी झाली. त्या ठिकाणी त्यांनी जवळपास एक वर्षभर काम केले. १ डिसेंबर २०२२ रोजी इंजि. संतोष तिरमनवार यांची पदोन्नती होऊन ते छत्रपती संभाजीनगर येथे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक म्हणून रुजू झाले. आपल्या शासकीय सेवेतील शेवटच्या टप्प्यात खात्याच्या सर्वोच्च पदावर काम करण्याची संधी त्यांना मिळाली. त्यामुळे आपल्या मातृभूमीतील जे प्रकल्प वर्षानुवर्षे अपूर्ण अवस्थेत राहिले आहेत, परंतु मराठवाड्याच्या प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहेत त्या प्रकल्पांकडे त्यांनी लक्ष वळविले. अनेक प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याचे काम बाकी होते. महामंडळात खर्च न केल्यामुळे पैसे परत जाण्याची वेळ आली होती. त्यावेळी तिरमनवार हे संधीचा लाभ उठण्यासाठी संधी शोधत होते. ती संधी त्यांना मिळाली सन २०२३ मध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने. मराठवाड्याच्या विकासाचा विचार करण्यासाठी मंत्रिमंडळाची बैठक संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत

मराठवाड्यासाठी काय काय मागणी करता येईल याची पूर्ण तयारी तिरमनवार यांनी सहा महिने आधीच करून ठेवली होती. त्यामध्ये अनेक प्रकारची अंदाजपत्रके, त्यांना एसएलटीसी मान्यता घेणे, नियामक मंडळाची मान्यता घेणे, जलसंपदा विभागाची मान्यता घेणे आणि शेवटी कॅबिनेटची मान्यता घेणे या सर्व बाबी या मंत्रिमंडळाच्या मराठवाडा बैठकीत घेण्यासाठी त्यांनी कसून पूर्वतयारी केली होती. त्यामध्ये काही मोठे प्रकल्प होते. उर्ध्व पैनगंगा, निम्न दुधना, नदीजोड प्रकल्पामध्ये दमनगंगा नदीजोड प्रकल्प, पार गोदावरी, एकदरे गोदावरी प्रकल्प अशा प्रकल्पांना तत्वता मान्यता घेण्याची मोठी कामगिरी त्यांनी या बैठकी दरम्यान केली. कोट्यवधी रुपयांच्या कामासाठी मंजुरी घेतली. ते तेवढ्यावरच थांबले नाहीत तर ताबडतोब त्यांनी मंजुरी घेतलेली कामे सुरू देखील केली. सलग कामाचा धडाकाच लावला. गेल्या अनेक वर्षापासून रखडलेले प्रकल्प त्यातील अडचणी सोडवून ते मार्गी लावले. उनकेश्वर ल.पा. तलाव १४ वर्षे बंद पडलेल्या अवस्थेत होता. त्याची सुप्रमा घेऊन त्याच्या कामाला गती दिली. श्री तिरमनवार यांचे वैशिष्ट्य असे आहे की त्यांनी एखादे काम हाती घेतले की ते पूर्ण केल्याशिवाय सोडत नाहीत.

मराठवाड्याच्या ग्रामीण भागातील जिल्हा नांदेड मुखेड तालुका येथील लेंडी हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा आणि तेथील जनतेच्या अस्थेचा प्रश्न होता. गेल्या ४० वर्षापासून हा रखडलेला प्रकल्प होता. या प्रकल्पाचे उद्घघाटन १९८५ मध्ये झाले होते. परंतु प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे तो रखडला होता. मिळणारा मोबदला वाढवून द्यावा यासाठी लोक आक्रमक होते. हा प्रश्न आता यापुढे कधी सुटणारच नाही अशी परिस्थिती निर्माण झाली होती. किचकट झालेल्या परिस्थितीमुळे अधिकारी देखील हा प्रकल्प हाती घेण्याची

इच्छुक नव्हते. परंतु संतोष तिरमनवार हे मराठवाड्याचे भूमिपुत्र असल्याने त्यांची या मातीशी नाळ जुळली गेली आहे. त्यामुळे लेंडी हा प्रकल्प देखील तेच मार्गी लावू शकतील असे मत अनेक वरिष्ठ अधिकारी यांनी व्यक्त केले होते. हे तिरमनवार यांनी एक आव्हान म्हणून या प्रकल्पाकडे पाहून कामाला सुरुवात केली. या प्रकल्पाच्या सुप्रमा घेऊन काम सुरू केले. आपले कौशल्य वापरून निधी उपलब्ध करून प्रकल्पाच्या समस्या सोडवल्या. अवघ्या एका वर्षाच्या आत या लेंडी प्रकल्पाची घळभरणी करून हा प्रकल्प तब्बल ४० वर्षानंतर पूर्ण झाला आहे. लेंडी हा प्रकल्प नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात सीमा वरती भागात असून हा प्रकल्प पूर्ण झाल्यामुळे मुखेड आणि देगलूर या दोन दुष्काळी तालुक्यातील जवळपास २६००० हेक्टर क्षेत्राला सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे. पिण्यासाठी देखील पाणी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे या भागातील लोक श्री तिरमनवार यांना शतशः धन्यवाद देत आहेत.

संतोष तिरमनवार यांनी त्यांच्या कार्यकाळात राज्याच्या वेगवेगळ्या प्रदेशात जलसंपदा विभागांतर्गत सेवा केली. सिंचन व्यवस्थापन, बांधकाम, सर्वेक्षण, संकल्पन, रेडियल गेट इरेंक्शन, उपसा सिंचन योजना, , पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण आणि प्रशासन अशा वेगवेगळ्या प्रकल्पाचे काम त्यांनी करून आपल्या कामाचा ठसा उमटविला आहे. इंजिनियर कसा असावा तर असा संतोष तिरमनवार यांच्यासारखा असावा असे त्यांचे वरिष्ठ अधिकारी राहिलेले अभियंते आजही अभिमानाने सांगतात. प्रामाणिकपणाने काम करत राहणे, प्रचंड कष्ट करण्याची तयारी, लोकांच्या समस्येच्या मुळाशी जाणे आणि सातत्य या त्यांच्या गुणामुळे ते इतक्या यशस्वीपणे रखडलेले प्रकल्प पूर्ण करू शकले. त्यांनी

केलेल्या कामाबद्दल त्यांचे म्हणणे असे असते की कुठलेही काम करताना आपला हेतू शुद्ध असायला हवा. मग कोणत्याही अडचणीवर मात करता येते. त्याचबरोबर अधिकाऱ्यांनी नियमांचा विनाकारण बाऊ करून टाळाटाळ करू नये. प्रामाणिक प्रयत्न आणि शुद्ध हेतू असलेल्या अधिकाऱ्याला समाज लगेच ओळखतो आणि त्याच्या पाठीशी उभा राहतो. राजकारणी मंडळी देखील अशा अधिकाऱ्यांच्या मागे उभे राहतात. त्यामुळे नव्या पिढीतील अधिकाऱ्यांनी शासकीय सेवेत आल्यानंतर आपला प्राधान्यक्रम बदलला पाहिजे. कामाला जास्त प्राधान्य दिले तर यश मिळायला कोणतीही अडचण येत नाही असा त्यांचा नव्या पिढीला सल्ला असतो.

माणसाच्या आयुष्यात आपण किती कष्ट करतो ? किती मेहनत करतो? किती संपत्ती मिळवतो? कसे यश मिळवतो? कसा लोकप्रिय होतो? यापेक्षा खरे यशस्वी आयुष्य कशाला म्हणतात याबाबत ज्येष्ठ जलतज्ञ माधवराव चितळे यांचे एक तत्व आहे. ते म्हणतात एखाद्या अधिकाऱ्याची पुढची पिढी म्हणजे मुले काय करतात ? ती कोणत्या मार्गावर चालत आहेत यावर त्या व्यक्तीचे यशस्वीपण अवलंबून असते. त्यानुसार व्यक्तीचे मूल्यमापन केले गेले पाहिजे. त्या निकषानुसार इंजि. संतोष तिरमनवार हे आपल्या आयुष्यात यशस्वी झाले असल्याचे दिसून येते. कारण त्यांची पुढची पिढी आपल्या आयुष्यात उच्च शिक्षण घेऊन पुढील मार्गक्रमण करीत आहे. संतोष तिरमनवार यांना दोन मुले असून मोठी मुलगी स्नेहल हिने इलेक्ट्रॉनिक आणि टेली कम्युनिकेशनमध्ये बी.टेक. केले आहे. अमेरिकेतील डलास, टेक्स्टास येथे नेटवर्किंग टेलेकम्युनिकेशन मध्ये एम. एस. केल्यानंतर तेथील ॲमेझॉन वेब सर्व्हिसेसमध्ये पाच वर्षे नोकरी करुन ती आता भारतात परतली आहे. सद्या हैदराबाद येथे नोकरी करीत

आहे. तिचे पती प्रशांत यांनी देखील एम.बी.ए. केले असून तेही खाजगी सेवेत कार्यरत आहेत. तिरमनवार यांचा मुलगा अमोद यांने देखील बी.टेक. (मेकॅनिकल) मणिपूर येथून केले असून अमेरिकेचे चार्टर्ड फायनान्सीयल ॲनालिस्ट पुर्ण करुन त्याचे स्वतःचे पुणे येथे स्टार्टअप आहे. तो सेबी रजिस्टर्ड रिसर्च ॲनालिस्ट देखील आहे. एकंदर त्यांची दोन्ही मुले आयुष्याच्या वाटेवर स्वावलंबी आणि आनंदी आहेत. त्यांना आयुष्यभराची साथ देणाऱ्या त्यांच्या अर्धांगिनी सौ लीना संतोष तिरमनवार या गृहिणी असून त्या बी.ए. झालेल्या आहेत. मुलांना सुसंस्कारित करण्याचे काम त्यांनी केले आहे. त्याचप्रमाणे तिरमनवार यांना शासन सेवेसाठी काम करताना पुरेसा वेळ दिला आहे आणि घरातल्या जबाबदाऱ्या पार पडलेल्या आहेत. घर एक मंदिर ही संकल्पना त्यांनी साक्षात मांडली आहे. आयुष्यभर जगाचा, समाजाचा संसार करणाऱ्या संतोष तिरमनवार यांचा संसार मात्र लीनाताई यांनी मोठ्या कष्टाने आणि आनंदाने फुलविला आहे. जगणं सुंदर करणाऱ्या या दांपत्यास पुढील जीवन आनंदी सुखी आणि आरोग्यदायी जावो यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा!

संतोष जल योगदानाचा...



मा. इंजि. संतोष तिरमनवार

कार्यकारी संचालक : गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर



श्री संतोष तिरमनवार पत्नी सौ लीनासोबत...(२०२६)



श्री.संतोष तिरमनवार यांचे चौकोनी सुखी समाधानी कुटुंब पत्नी लीना, कन्या स्नेहल ंआणि पूत्र अमोदसह स्वत: संतोष तिरमनवार (२००१)



श्री तिरमनवार कुटूंब (सन २०१६)



कन्या स्नेहलच्या पदवीदान समारंभ प्रसंगी आईवडील श्री व सौ. तिरमनवार (डलास,टेक्सास, अमेरिका २०१९)



पुत्र आमोद यांच्या स्टार्टअप कार्यालयाचे उद्घघाटनप्रसंगी आई वडील श्री व सौ. तिरमनवार



श्री. संतोष तिरमनवार यांचे मातापिता
श्री रामकिशन तिरमनवार आणि गं.भा.सुलोचनाबाई



श्री व सौ. तिरमनवार एका निवांतक्षणी (सन २०२५



कन्या स्नेहल आणि जावई प्रशांत





संपुर्ण तिरमनवार कुटुंब : तीन पिढ्या एकत्र (२०२३)



मा.इंजि.व्ही.व्ही.गायकवाड
सेवानिवृत्त सचिव, जलसंपदा
महाराष्ट्र राज्य

श्री संतोष तिरमनवार यांचा नि माझा संपर्क ते जलसंपदा खात्यात सेवेत रुजू झाल्यापासून ते सेवानिवृत्त होईपर्यंत वेगवेगळ्या ठिकाणी अनेक प्रकल्पांवर काम करीत असताना प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे आला आहे. तिरमनवार यांनी शासकीय सेवेत काम करीत असताना त्यांची संपुर्ण आत्मियता, काटकसर आणि प्रकल्प पुर्णत्वाकडे नेण्याची ओढ या गुणांचा पुरेपूर वापर करुन काम केले आहे. त्यांच्या प्रदीर्घ सेवेत त्यांनी महाराष्ट्रातील सर्व प्रदेशात तसेच प्रकल्प स्थळांवर, प्रशासकीय कार्यालयांमध्ये आणि मंत्रालयात काम केलेले आहे. त्यांच्या या विविध ठिकाणी केलेल्या कामाच्या अनुभवाचा फायदा ते गोदावरी मराठवाडा पाटबंधारे येथे कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत असताना झाल्याचे दिसून येत आहे. एकंदरीत त्यांची संपुर्ण कारकिर्दच उत्कृष्ट झाली आहे.

मराठवाड्याच्या सुदैवाने मराठवाड्याच्या मातीत जन्मलेले भूमिपूत्र अभियंते फार मोठ्या प्रमाणावर सिंचन क्षेत्रात सिंचन निर्मितीत कार्यरत राहिलेले आहेत. त्यामुळे त्यांनी अतिशय पोटतिडकेने काम केल्याचे दिसून येते. तसा मराठवाडा हा भाग पूर्णपणे शेतीवर अवलंबून असलेला प्रदेश आहे. त्यामुळे शेतीसाठी पाणी हा सर्वांच्याच जिव्हाळ्याचा विषय राहिला

आहे. मराठवाड्यात जन्मलेल्या अभियंत्याना योगायोगाने मराठवाड्यातील मुख्यमंत्र्यांचे मार्गदर्शन लाभले आहे. त्यामुळे जलसंपदा विभागातील महत्वाची कामे वेगाने मार्गी लागण्यास मदत झाली आहे. जेव्हा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली, त्यावेळी मराठवाड्याची सिंचन क्षमता अवघी अर्धा टक्के होती. एक दोन बोटावर मोजता येण्याजोगे प्रकल्प वगळता कोणताही मोठा प्रकल्प या ठिकाणी चालू झालेला नव्हता. मराठवाड्याच्या सिंचन आस्थपनेतील अभियंत्यांच्या साखळीतील उच्च पदावर काम करणारे सद्या तरी संतोष तिरमनवार हे शेवटचे अधिकारी असावेत असे मला वाटते. जेव्हा एकादा उच्च पदावर असणारा निर्णयक्षम अधिकारी आपल्या जन्मभूमित काम करण्याची संधी त्याला मिळते तेव्हा त्याचे फायदे त्या प्रदेशाला मिळत असतात. त्या प्रदेशातील अपूर्ण राहिलेले प्रकल्प पुर्ण होण्यासाठी गती मिळते हे तिरमनवार यांच्या कारकिर्दीवरुन दिसून येते.

अलिकडच्या काळात मराठवाडयाच्या वाट्याला आलेले कृष्णा व गोदावरी खोऱ्यांचे पाणी जलसाठ्याच्या निमित्ताने जवळपास पुर्णपणे वापरण्यास सुरुवात झाली आहे. तेच प्रकल्प पुर्ण करणे व त्याची देखभाल करणे आणि दुरुस्तीची कामे करुन पाण्याचा योग्य वापर करणे ह्या प्रकारचेच काम सद्या शिल्लक आहे.

आपल्या या मराठवाड्यात राज्यातील इतर भागातील पाणी आणल्याशिवाय पाण्याची गरज भागणार नाही. ही गरज ओळखून त्यांनी कोकणातील पश्चिम वाहिनी नद्यांचे वाहून जाऊन समुद्राला मिळणारे पाणी लिफ्ट करुन गोदावरी खोऱ्यात वळवून त्याचा लाभ मराठवाड्याला व्हावा यासाठी योजना तयार केल्या. एवढेच नव्हे तर त्याची अंमलबजावणीदेखील लवकरात लवकर व्हावी यासाठी प्रयत्न केले. कृष्णा खोऱ्यातून मराठवाड्याकरिता मिळालेल्या २१ टीएमसी पाण्यापैकी ७ टीएमसी पाणी

अगदी प्रयत्नपूर्वक मराठवाड्यातील तुळजापूरपर्यंत आणले आहे. याशिवाय गोदावरी लवादांतर्गत कृष्णा लवादानुसार पाण्याचा फेर हिशोब करुन मध्य गोदावरीत पाणी उपलब्ध करुन देऊन त्याची कामेही सुरु झाली आहेत. या शिवाय उपलब्ध पाण्याचा साठा वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरुन निम्न मनार प्रकल्पावर स्वयंचलित बंधारे बसवून अतिरिक्त पाणी कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त भूसंपादन न करता मिळवून दिले आहे. त्याचा लाभ आज अनेक शेतकरी अनेक वर्षापासून घेत आहेत. त्याच्या कार्यकारी संचालक पदाच्या कारकिर्दीत अनेक बॅरेजेस आणि धरणांची कामे पुर्णत्वास गेली आहेत. त्याचबरोबर काही नवीन प्रकल्पदेखील सुरु झाले आहेत.

मराठवाड्यामधील सर्व मोठ्या प्रकल्पांची कामे संपलेली असून केवळ लेंडी या महाराष्ट्र -तेलंगणा (पुर्वीचा आंध्र प्रदेश) या प्रकल्पाचे काम गेल्या अनेक वर्षापासून भूसंपादनातील अडचणीमुळे प्रलंबित होते. कै. शंकरराव चव्हाण राज्याचे मुख्यमंत्री असताना म्हणजे सुमारे ४० वर्षापूर्वी उर्ध्व मानार आणि लेंडी या दोन्ही प्रकल्पाच्या कामाचा शुभारंभ एकाच दिवशी झाला होता. त्यावेळी मी स्वत: तेथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होतो. या प्रकल्पाचे काम गेल्या चाळीस वर्षापासून अपूर्ण अवस्थेत रहिलेले आहे. हा प्रकल्प आंतरराज्यीय असल्याने यासाठी निधीची कधीही कमतरता नव्हती. परंतु तेथील प्रकल्पग्रस्तांच्या दर पाच वर्षांनी नवनवीन मागण्या पुढे यायच्या. त्यामुळे प्रकल्पाची घळभरणी करण्यास अडचणी निर्माण व्हायच्या. इतक्या जुन्या आणि रखडलेल्या प्रकल्पाला गती देण्यासाठी व त्यावर तोडगा काढण्यासाठी श्री तिरमनवार यांनी खूप नेटाने प्रयत्न केले. यासाठी शासन स्तरावर मान्यता घेऊन त्याच्या घळभरणीचे काम जून २०२५ मध्ये पूर्ण केले. या ठिकाणी देखील त्यांनी आपले नेहमीप्रमाणे हे काम विक्रमी वेळेत पुर्ण केले. इतकी वर्षे रखडलेल्या प्रकल्पाच्या पुर्णत्वासाठी त्यांनी मनापासून

प्रयत्न करुन हा प्रकल्प पुर्ण केला यासाठी त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. मुखेड व देगलूर या अतिदुष्काळी भागातील लोक तिरमनवार यांचे नाव कधीही विसरणार नाहीत. यासाठी ते विशेष अभिनंदनास पात्र आहेत. या प्रकल्पाची विशेष बाब म्हणजे हे धरण पुर्ण झाल्यानंतर प्रथमच पूर्व मान्सून पावसाच्या अतिवृष्टीनेच पुर्ण भरुन गेले होते. तो प्रसंगदेखील त्यांनी अतिशय कौशल्याने आणि समन्वयाने हाताळला. यासाठीदेखील त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

अशा प्रकारे तिरमनवार यांनी आपल्या कारकर्दीत अतिशय महत्वाची जबाबदारी पार पाडली आहे. ते स्वत: मराठवाड्याचे भूमिपूत्र असल्याने रखडलेले प्रकल्प आपण उच्च पदावर काम करत असताना सुटले पाहिजेत ही त्यांची मनापासूनची तळमळ होती. त्यामुळेच अनेक रखडलेले प्रकल्प त्यांच्या कारकिर्दीत मार्गी लागले आहेत. महाराष्ट्र राज्यात जिथे जिथे त्यांनी काम केले ते अतिशय मनापासून केले. त्यामुळे राज्याच्या अनेक भागात त्यांच्या हातून अतिशय उलेल्खनीय आणि लोकोपयोगी कामे पार पडली आहेत. त्यामुळे एक वेगळे समाधान घेऊन ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यांना पुढील सुखी आणि आरोग्यदायी जीवनासाठी खूप खूप शुभेच्छा!



मा.इंजि. राम घोटे
से.नि. कार्यकारी संचालक
जलसंपदा, विभाग

कर्मयोगी भूमिपूत्र

सन १९९५ मध्ये मी जायकवाडी पाटबंधारे विभाग नाथनगर येथे कार्यकारी अभियंता असताना इंजि. संतोष तिरमनवार हे सहाय्यक कार्यकारी अभियंता म्हणून शासन सेवेत रुजू झाले होते. तीर्थपुरी उपविभागामध्ये सिंचन व्यवस्थापनाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली होती. त्यावेळी त्यांचा आणि माझा प्रथम परिचय झाला. त्यांचा मृदू आणि शांत स्वभाव, उत्कृष्ट कार्यशैली आणि कार्य तत्परता यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व चटकन लक्षात राहिले. पुढे अनेक ठिकाणी वेगवेगळ्या पदांवर आम्ही सोबत काम केले. परंतु पहिल्या वेळेच्या कामाचा अनुभव काही औरच होता. नवा जोश, कामाची आवड आणि काम समजून घेण्याची आवड यामुळे ते अल्पावधीतच खात्यामध्ये लोकप्रिय झाले. त्यानंतर त्यांची पदोन्नती झाली आणि ते कार्यकारी अभियंता झाले.

इंजि.संतोष तिरमनवार यांच्याशी पुन्हा एकत्र काम करण्यासाठी भेट झाली ती सन २००३ मध्ये! मी नांदेड येथे नांदेड पाटबंधारे मंडळात अधीक्षक अभियंता असताना ते कार्यकारी अभियंता म्हणून आले. त्यावेळी त्यांच्याकडे

संपुर्ण नांदेड जिल्ह्याची सिंचन व्यवस्थापनाची जबाबदारी होती. त्यावेळी त्यांनी अतिशय चांगल्या पध्दतीने काम केले होते. त्यावेळी त्यांच्या हातून झालेले महत्वाचे काम म्हणजे निम्न मानार प्रकल्पाच्या डाव्या कालव्याचे नुतनीकरण होय! हा कालवा त्यावेळी २५ वर्षापूर्वीचा जुना होता. अतिशय खराब झाला होता. त्या कालव्याचे डिझाइन ६०० क्युसेस पाणी वाहण्याची क्षमता असणारे होते. परंतु कालवा गाळाने प्रचंड भरला असल्याकारणाने एकूण क्षमतेच्या २५ टक्केही पाणी वहनाची त्याची क्षमता उरली नव्हती. तिरमनवार यांची त्या ठिकाणी नियुक्ति झाली. त्या ठिकाणी त्यांनी अतिशय मन लावून काम केले. निम्न मानारच्या डाव्या कालव्याच्या संपुर्ण नुतनीकरणाची जबाबदारी त्यांनी स्वत:वर घेतली आणि कामाला सुरुवात केली. विशेष म्हणजे या कालव्याच्या नुतनीकरणाचे काम त्यांनी खूपच कमी कालावधीत आणि अतिशय गुणवत्तापूर्ण रितीने पूर्ण केले. या कालव्याची क्षमता ६०० क्युसेस होती ती आम्ही नुतनीकरणानंतर ६०५ क्युसेस पर्यंत नेली. या कामाचे दुसरे वैशिष्ट्य असे होते की या कामात ठेकेदारांचा अजिबात सहभाग नव्हता. हे संपुर्ण काम शासनाच्या यांत्रिकी विभागामार्फत करण्यात आले होते. केवळ यांत्रिकी विभागाच्या मशिनरींच्या डिझेलचा खर्च करुन ते काम पुर्ण करण्यात आले होते. बाकी एकही पैसा खर्च करावा लागला नाही. काम मात्र अतिशय उत्कृष्टरित्या पुर्ण झाले होते. या कामाच्या गुणवत्तेची किर्ती मंत्रालयापर्यंत पोचली. त्यावेळी तात्कालिन मंत्री ना. बाळासाहेब थोरात यांनी जातीने हजर राहून या कालव्याच्या कामाची पहाणी केली. मुख्य कालवा आणि त्यांच्या शाखांचे झालेले काम त्यांनी बारकाईने पाहिले आणि समाधान व्यक्त केले. एवढेच नव्हे तर महाराष्ट्रातील सर्व भागातील कालव्यांची दुरुस्तीची आणि नुतनीकरणाची कामे केवळ शासनाच्या यांत्रिकी विभागामार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या कामाची सर्वच पातळीवर विशेष दखल घेतली गेली. प्रादेशिक वृत्तपत्रांनी रकानेच्या रकाने भरुन या कामाची स्तुती केली.

शासकीय पातळीवर मंत्रालयातदेखील याची दखल घेतली गेली. पुढे मला अधीक्षक अभियंता असताना उत्कृष्ट अभियंता म्हणून राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला त्यात या कामाचाही उल्लेख होता. या ठिकाणी मी जरी अधीक्षक अभियंता होतो तरी तिरमनवार यांनी कार्यकारी अभियंता म्हणून अतिशय चांगल्या पध्दतीने काम केले आहे. त्यावेळचे मंत्रालयातील कडा विभागाचे सचिव श्री सोडल यांनीदेखील या कामाचे तोंड भरुन कौतुक केले होते. पाटबंधारे मंत्र्यांचाही विश्वास निर्माण झाला. त्यानंतर शासनाने एक जी.आर. काढून अहिल्याबाई होळकर कालवा स्वच्छता अभियान नावाची मोहिमच राज्यभर सुरु केली. त्यात राज्यभर कालवा स्वच्छतेचा नांदेड पॅटर्नच तयार झाला. त्यानंतर राज्यभरात मोठ्या प्रमाणावर कालवे दुरुस्तीची कामे सुरु करण्यात आली. त्यामुळे हे काम म्हणजे राज्याच्या कालवे दुरुस्तीच्या कामातील एक माइलस्टोनच ठरले आहे.

श्री तिरमनवार यांच्या कार्यकारी अभियंता कारकिर्दीतील आणखी एक महत्वाचे काम म्हणजे निम्न मानार प्रकल्पाच्या ऑटोमॅटीक गेटचे काम होय! या प्रकल्पात १८१ ऑटोमॅटीक गेट बसवण्यात आले आहेत. हे कामदेखील तिरमनवार यांच्याच कार्यकाळात अतिशय विक्रमी वेळेत पुर्ण करण्यात आले आहे. साधारणपणे सात महिन्यात हे काम पुर्ण करण्यात आले आहे. नोव्हेंबर महिन्यात काम सुरु करुन जून महिन्यात काम पुर्ण करण्यात आले. याही त्यांच्या कामाचे सगळीकडे कौतुक झाले. राज्यातील ऑटोमॅटीक गेटचे काम यशस्वी करणारा हा पहिला प्रकल्प असून याचे श्रेय तिरमनवार यांना जाते. या प्रकल्पाला लोकांचा तीव्र विरोध असताना, अनेक अडचणी असताना त्यांनी हे काम विक्रमी वेळेत आणि गुणवत्तापुर्ण रितीने पुर्ण केले आहे. त्याचबरोबर या निम्न मानार प्रकल्पाची उंचीही एक मीटरने वाढवण्यात आली. आधीच प्रकल्पग्रस्तांनी काम करण्यास विरोध केला असताना धरणाची उंची वाढवण्याचा निर्णय घेण्यात आल्याने या

प्रकल्पाच्या पाणी साठवणीत जवळपास १ टीएमसीने वाढ झाली. त्यावेळी श्री गर्जे नावाचे ठेकेदार होते. त्यांनी देखील वेळेचे बंधन पाळून उत्कृष्ट काम केले. त्यामुळे या प्रकल्पाची सिंचनक्षमताही वाढली. जवळपास ती दुप्पट झाली. त्यानंतर मात्र लोकांच्या भावना बदलल्या. लोकांना सिंचनात वाढ झाल्याचे पाहून आनंद झाला. त्यांचा आत्मविश्वास दुणावला. अशा प्रकारे त्यावेळी चांगले काम आमच्या टीमककडून झाले याचा मला आनंद आहे.

या दरम्यान मी माझ्या कुटुंबासोबत खात्याच्या नांदेड येथील कॉलनीमध्ये राहत होतो आणि तिरमनवारही तेथेच शेजारी राहत होते. माझी दोन मुले महेश आणि वर्षा ही त्यावेळी त्यांची दोन मुले आमोद आणि स्नेहल यांच्यासोबत एकत्र खेळत असत. त्यांचे खेळण्यासाठी एकमेकांच्या घरी जाणे येणे इतके होते की ते एकमेकांशिवाय राहात नसत. एवढेच नव्हे तर त्यांची दोन्ही मुले आमोद आणि स्नेहल माझ्या वडिलांचे खूप लाडके होते. त्यांचा त्यांना खूप लळा लागला होता. त्यामुळे आमच्या दोन्ही कुटुंबांमध्ये खूपच स्नेह निर्माण झालेला होता. तो स्नेह आजतागायत टिकून आहे. त्यानंतर आमच्या बदल्या पुढे वेगवेगळ्या ठिकाणी झाल्या तरी तो कौटुंबिक जिव्हाळा आमच्यामध्ये कायम होता. एवढेच नव्हे तर माझा मुलगा महेश लग्नानंतर पत्नीसह अमेरिकेत वास्तव्याला गेला. दरम्यान त्याच शहरात तिरमनवारांची मुलगी स्नेहल ही देखील शिक्षण घेण्यासाठी वास्तव्यास होती. कोरोना दरम्यान जगभरात भीतीचे वातावरण पसरले होते. त्यावेळी स्नेहल अनेक दिवस महेशच्या घरी वास्तव्यास होती आणि तिथे तिला घरच्यासारखे सुरक्षित वाटत होते. हे ऋणानुबंध कायमचे जोडले गेले आहेत. श्री तिरमनवार जर मुलीकडे अमेरिकेत गेले तर जाणीवपूर्वक वेळात वेळ काढून ते महेशकडे जातात आणि घरच्या प्रमाणे भेटतात. आमच्या मुलांनाही ते फार बरे वाटते. असे हे नांदेडमध्ये २०-२५ वर्षांपूर्वी निर्माण झालेले ऋणानुबंध आजही कायम आहेत.

पुढे मी सन २००९ ते २०१२ या कार्यकाळात छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य अभियंता कडा येथे रुजू झालो. त्यावेळी दुधना प्रकल्पाचे काम सुरू होते. हा प्रकल्प जोमाने सुरू करून लवकर पूर्ण करण्यासाठी मी जाणीवपूर्वक संतोष तिरमनवार यांची बदली दुधना प्रकल्पावर कार्यकारी अभियंता म्हणून करून घेतली. कारण त्यांच्या कामाचा आवाका मला माहीत होता. त्याचप्रमाणे त्यांनीही अतिशय धडाक्याने कामाला सुरुवात केली. या ठिकाणी काम करीत असताना प्रकल्पग्रस्त लोकांनी त्रास दिला, कामात अडथळे आणले परंतु हार मानतील तर ते तिरमनवार कसले ! त्यांनी वर्षभराच्या आत काम पूर्ण करून पाणीसाठा देखील केला. त्यामुळे ते सर्वांच्या कौतुकास पात्र झाले. लोकांनी इतका त्रास दिला की काम सुरळीत पार पाडण्यासाठी त्यांनी काही वेळा पोलिस संरक्षणात काम करावे लागले..

त्यानंतर पुढे ते अधीक्षक अभियंता झाले. बीड जिल्ह्यात परळी येथेही काही काळ त्यांनी अधीक्षक अभियंता म्हणून काम केले. तिथेही त्यांनी रखडलेला उर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्प पूर्ण केला. तसेच लातूर जिल्ह्यातील मांजरा व तेरणा नदीवरील उर्वरित उच्च पातळी बंधाऱ्याची कामे पुर्णत्वास नेली. ज्या ज्या ठिकाणी अधिकारी म्हणून त्यांनी कार्य केले त्या त्या ठिकाणी त्यांनी स्वतःला झोकून देऊन काम केले आणि आपल्या कामाचा कायमस्वरूपी ठसा उमटवला आहे. असे अधिकारी कायम आपल्या कर्तृत्वाने आपले नाव कोरून ठेवत असतात. शेवटी ते आपल्या खात्याच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचले. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. मराठवाड्याचे भूमिपूत्र असलेल्या तिरमनवारांनी आपल्या मातृभूमीसाठी कार्य करून पांग फेडले आहेत. त्यामुळे त्यांचे जीवन सार्थ झाले आहे. सेवानिवृत्तीनंतरचे त्यांचे आयुष्य सुखाचे समृद्धीचे आणि आरोग्यदायी जावो ही ईश्वरचरणी प्रार्थना !



मा.इंजि. दीपक रं. कंदी
से.नि. कार्यकारी संचालक
जलसंपदा, महाराष्ट्र राज्य

कार्यक्षम अभियंता

श्री संतोष तिरमनवार कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ हे मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्यात असणाऱ्या किनवट येथील मूळ रहिवासी आहेत. त्यांना आपल्या जन्मभूमीत काम करण्याची संधी मी औरंगाबाद जलसंपदा विभागात मुख्य अभियंता असताना मिळाली होती. त्यावेळी त्यांनी अतिशय मेहनतीने आणि झोकून देऊन काम केले आहे. या किनवट सारख्या आदिवासी बहुल तालुक्यातील अनेक वर्षे रखडलेले काही लघु प्रकल्प त्यांनी स्वतः जातीने लक्ष घालून मार्गी लावले आहेत आणि पूर्ण देखील केले आहेत. त्यामध्ये पलाईगोडा, शिरपूर आणि मांडवी या प्रमुख प्रकल्पांचा समावेश आहे. त्यापूर्वी त्यांनीच या भागातील तळणी, चांडोल, आणि जामखेड हे प्रकल्प देखील घळभरणी करून पूर्ण केले होते. मात्र मी मुख्य अभियंता असताना त्यांनी केलेले तिन्ही ल.पा. प्रकल्प कमी वेळेत


म्हणजे वर्षभराच्या आतच पूर्ण केले आहेत. त्यामुळे त्यांचे काम विशेष लक्षात राहण्यासारखे आहे.

संतोष तिरमनवार हे एक कार्यक्षम अधिकारी असून सुरुवातीपासूनच त्यांची कार्यपद्धती वाखाणण्यासारखी आहे. स्वतःहून कामासाठी पुढाकार घेणे आणि हाती घेतलेले काम पार पडेपर्यंत त्याचा पाठपुरावा करणे हे त्यांच्या कार्य शैलीचे वैशिष्ट्य आहे. त्यामुळे मराठवाड्यातील विशेष करून नांदेड, परभणी, बीड आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील रखडलेल्या प्रकल्पांना पूर्णत्वाकडे नेण्यासाठी त्यांनी स्वतःहून पुढाकार घेतला. भूसंपादनाच्या आणि पुनर्वसनाच्या अडचणी सोडवून ते प्रकल्प मार्गी लावले. विशेष म्हणजे परभणी, नांदेड आणि बीड जिल्ह्यातील अनुक्रमे निम्न दुधना, निम्न मानार आणि उर्ध्व कुंडलिका या प्रकल्पांसाठी विशेष मेहनत घेतली. प्रकल्पग्रस्तांच्या समस्या सामंजस्याने सोडवून त्यांचा विश्वास संपादन करून त्यांनी हे प्रकल्प पूर्णत्वास नेले. प्रसंगी त्यांना लोकप्रतिनिधींची मध्यस्थी करावी लागली, प्रसंगी पोलीस प्रशासनाची मदत घ्यावी लागली. परंतु ते डगमगले नाहीत. हे प्रकल्प त्यांनी अतिशय गुणवत्तापूर्ण रीतीने आणि कमी कालावधीत पूर्ण केले आहेत. त्यामुळे त्यांचे विशेष कौतुक!

आपल्या शासकीय सेवेतील शेवटच्या टप्प्यामध्ये पुन्हा त्यांना आपल्या मातृभूमीत म्हणजेच मराठवाड्यात गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्यावेळी सन २०२३ मध्ये मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या निमित्ताने छत्रपती संभाजीनगर येथे राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली होती. या बैठकीमध्ये त्यांनी मराठवाड्यातील बऱ्याच रखडलेल्या प्रकल्पांना सुप्रमा मिळवली आणि कामे देखील सुरू केली. उदाहरणार्थ नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात असणाऱ्या व गेल्या ४० वर्षापासून रखडलेल्या लेंडी प्रकल्पाचे काम त्यांनी हाती घेतले आणि त्यातील पुनर्वसनाच्या अडचणी सोडवून त्या रखडलेल्या

प्रकल्पाची घळभरणी देखील केली. त्याचा फायदा आता या दुष्काळग्रस्त मुखेड आणि देगलूर तालुक्यातील लोकांना होणार आहे. ही फार मोठी अचीवमेंट आहे. याशिवाय अन्य काही प्रकल्पांनाही त्यांनी चालना दिली आहे.

संतोष तिरमनवार यांनी मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि मंत्रालय अशा विविध प्रदेशात चांगले काम केले असून त्या ठिकाणी त्यांनी आपल्या वैशिष्ट्यपूर्ण कार्य शैलीची छाप सोडली आहे. गेली ३२ वर्षे त्यांनी जलसंपदा खात्यात विविध पदावर सेवा बजावून ते आत्ता आपल्या नियत वयोमानासार सेवानिवृत्त होत आहेत. सेवानिवृत्तीनंतरचे त्यांचे आयुष्य सुखाचे, समाधानाचे आणि आरोग्यदायी जावो अशी मी शुभकामना करतो!



मा.इंजि. राजेंद्र पानसे
से.नि. सचिव, जलसंपदा
महाराष्ट्र राज्य

इंजि. संतोष तिरमनवार
एक कर्तबगार, असामान्य अभियंता

श्री संतोष तिरमनवार यांच्यासमवेत सहकारी अभियंता म्हणून सुमारे ६ ते ७ वर्षे काम करण्याचा मला योग आला. मी कृष्णा खोरे विकास महामंडळ कार्यालयात अधीक्षक अभियंता म्हणून कार्यरत असताना महामंडळ कार्यालयातील प्रकल्पविषयक कामांचा प्रचंड व्याप विचारात घेता एका अनुभवी, ज्येष्ठ, तांत्रिक दृष्ट्या कार्यकुशल, व्यासंगी, अभ्यासू व विश्वासार्ह कार्यकारी अभियंत्याची गरज होती. आमचे तत्कालीन कार्यकारी संचालक श्री कोळवले साहेब यांनी सदर सर्व निकषांची पूर्तता करणाऱ्या श्री.तिरमनवार यांची सार्थ शिफारस तत्कालीन मंत्री महोदयांना केली व त्यानुसार श्री.तिरमनवार यांची बदली महामंडळ कार्यालयात कार्यकारी अभियंतापदी झाली. तोपर्यंत माझा त्यांच्याशी शासकीय सेवेत थेट संबंध आला नव्हता. पण कार्यकारी संचालक श्री कोळवले साहेब यांनी ज्या विश्वासाने व कौशल्ये पाहून त्यांची निवड केली होती ते सर्व गुण श्री.तिरमनवार, महामंडळ

कार्यालयात हजर झाल्याच्या पहिल्या दिवसापासूनच त्यांच्या कामात प्रकर्षाने दिसून आले. कृष्णा खोरे महामंडळ कार्यालयात त्यांनी विविध व क्लिष्ट स्वरूपाची अनेक कामे जबाबदारीने, विश्वासाने, कौशल्यपूर्वक व अभ्यासपूर्ण रीतीने पार पाडली. यामुळे ते सर्व वरिष्ठ अधिकारी व मंत्री महोदयांचे आवडते अधिकारी होते. माझी पदोन्नतीवर बदली झाल्यावर महामंडळातील अधीक्षक अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार देखील सर्वगुण संपन्न अभियंता श्री.तिरमनवार यांच्याकडे सोपवण्यात आला होता.

यानंतर मी मंत्रालयात जलसंपदा विभागात मुख्य अभियंता व सह सचिव तसेच तदूनंतर सचिव पदावर कार्यरत असताना सुमारे तीन ते चार वर्षे श्री. तिरमनवार यांचे समवेत सहकारी अभियंता म्हणून काम करण्याचा पुनःश्च योग आला. या काळात प्रकल्प कामाविषयी तसेच निविदा विषयक कार्यपद्धतीत सुधारणा करणारे अनेक शासन निर्णय निर्गमित झाले. या सर्वांचे मूळ मसुदे श्री. तिरमनवार यांनी विशेष परिश्रम घेऊन स्वतः तयार केले होते. ही बाब प्रकर्षाने नमूद करण्यासारखी आहे. प्रकल्पांच्या सु.प्र.मा. विषयक प्रस्ताव, मंत्रिमंडळासमोर सादर करण्याचे विविध प्रस्ताव इत्यादी संदर्भात देखील त्यांचा सक्रीय सहभाग व भरीव योगदान होते.

संतोष तिरमनवार यांचा शांत, निगर्वी स्वभाव, अखंड परिश्रम करण्याची तयारी, अफाट तांत्रिक कौशल्य, अभ्यासूवृत्ती, शासनाप्रती शतप्रतिशत निष्ठा व कोणत्याही दबावाला समर्थपणे तोंड देण्याची वृत्ती आदी अनेकविध गुणांमुळे त्यांनी मंत्रालयातील जबाबदारी अत्यंत समर्थपणे, यशस्वीपणे व निष्ठापूर्वक सांभाळली व पार पाडली. जलसंपदा विभागात ते एक अत्यंत लोकप्रिय अभियंता होते. आता असा कर्तबगार, असामान्य अभियंता परत लाभणे अत्यंत दुरापास्त आहे असेच म्हणावे लागेल.
श्री. संतोष तिरमनवार, यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा फायदा शासनाकडून निश्चितच करून घेतला जाईल अशी अपेक्षा आहे.

संतोष जल योगदानाचा...



किनवट : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे हस्ते अहमदनगर येथील निवळंडे प्रकल्पाचे जलपूजन करून लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ संभाजीनगरचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार यांनी त्यांचे स्वागत केले.

संतोष जल योगदानाचा...



: प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे हस्ते अहमदनगर येथील निवळंडे प्रकल्पाचे जलपूजन करून लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ संभाजीनगरचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार यांनी त्यांचे स्वागत केले.



सन २०२५ मध्ये गोदावरी नदीला आलेल्या पुराच्यावेळी जायकवाडी धरणातून सोडण्यात आलेल्या ३ लाख क्युसेस पाण्याच्या विसर्गाचे छायाचित्र



मराठवाड्यातील महत्वाचा आणि अनंत अडचणीवर मात करुन तयार करण्यात आलेला निम्न दुधना प्रकल्प ज्यासाठी इंजि. संतोष तिरमनवार यांनी खूप मेहनत घेतली आहे. या प्रकल्पासाठी २२ गावांचे पुनर्वसन करण्यात आले.



निम्न दुधनाचे विहंगमय दृष्य



निम्न मानार प्रकल्पाची उंची वाढवत असतानाचे छायाचित्र



निम्न मानारची उंची वाढविल्यानंतर झालेला पाणीसाठा

तिरुका को.प.बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रुपांतर







वरील पहिल्या छायाचित्रात तिरुका को.प. बंधारा दिसत असून बाजूच्या छायाचित्रात उच्च पातळी बंधाऱ्यात रुपांतर केल्यानंतर साठलेला पाणीसाठा दिसत



कृष्णा मराठवाडा उपसा सिंचन योजना-२ चा टप्पा क्र. ५ चे छायाचित्र




कोकणातील पश्चिम वाहिनी नद्यांचे अतिरिक्त पाणी दुष्काळग्रस्त मराठवाड्याला देण्यासाठी नदीजोड प्रकल्प इंजि. तिरमनवारांनी गतीमान केले. वैतरणा – मुकणे या नदीजोड योजनेची उजवी मार्गदर्शक भिंत उभी रहात असतानाचे छायाचित्र



वैतरणा – मुकणे नदीजोड योजनेचा पुच्छ कालव्याचे काम सुरु असतानाचे छायाचित्र

संतोष जल योगदानाचा...





प्रवाही वळण योजनेंतर्गत कालवा



लेंडी प्रकल्पाची घळभरणी पूर्व पाहणी






लेंडी प्रकल्पाची घळभरणी पूर्व पाहणी



तात्कालिन पाटबंधारे मंत्री डॉ. पद्मसिंह पाटील साहेब यांचा ड्रीम प्रोजेक्ट असलेला निम्न तेरणा प्रकल्प. यावरील उपसा सिंचन योजना पुर्णत्वास गेली.



मांजरा उजवा कालवा नुतनीकरण



जवळगा को.प.बं. नुतनीकरण ता. रेणापूर जि.लातूर



मांजरा डावा कालवा अस्तरीकरण









उर्ध्व कुंडलिका म. प्र. ता. वडावणी, जि. बीड





अनेक वर्षे रखडलेला उर्ध्व कुंडलिका प्रकल्प इंजि. तिरमनवार यांच्या कार्यकाळात घळभरणीसह पुर्ण केल्यानंतर झालेला पाणीसाठा

संतोष जल योगदानाचा...



पैठण उजवा कालव्याचे काम 2024 ते 2026 या अल्प कालावधीत उच्च दर्जाच्या अस्तरीकरण व वहनक्षमता पुनर्स्थापना कामांची यशस्वी अंमलबजावणी करून कालव्याची वहनक्षमता पुनर्स्थापित झाली असून,लक्षणीय पाणी बचत साध्य झाली आहे!!!



पैठण उजवा कालवा किमी ८५ वहनक्षमता पुनर्स्थापना कामांमुळे कालव्याची विसर्ग वहन क्षमता 900 cusec वरून 2250 cusec पर्यंत वाढवून मूळ स्थितीत पुनर्स्थापित करण्यात आली आहे !!!

संतोष जल योगदानाचा...



राज्यस्तरीय पंचम क्रीडा स्पर्धेत विजेता संघ गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ संघ मा.ना. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याहस्ते पुरस्कार (शिर्डी २०२६)



स्वागत कार्यकारी संचालकांचे सहकाऱ्यांकडून....



मा.इंजि. अजय कोहिरकर
से.नि.सचिव, जलसंपदा
महाराष्ट्र राज्य

उमदा, कार्यतत्पर अधिकारी

शासकीय सेवेत काम करीत असताना अनेक सरकारी अधिकारी, वरिष्ठ अधिकारी, कनिष्ठ अधिकारी यांच्याशी संपर्क येत असतो. परंतु प्रत्येक व्यक्ती ठळकपणे लक्षात राहीलच असे नाही. मात्र काही लोक आपल्या स्वभावामुळे, कर्तृत्वामुळे किंवा विशेष कार्यशैलीमुळे लक्षात राहतात. अशाच व्यक्तिमत्वापैकी एक म्हणजे संतोष तिरमनवार होत. तात्कालीन पाटबंधारे मंत्री डॉ.पद्मसिंह पाटील साहेब यांनी मराठवाड्यातील चांगल्या क्रियाशील अधिकाऱ्यांची एक टीम तात्कालीन उस्मानाबाद म्हणजे आत्ताच्या धाराशिव जिल्ह्यात एकत्र केली होती. त्यामध्ये इंजिनियर बी. एन. कंदरफळे, इंजिनियर ए.ए.कपोले, इंजिनियर श्री हनुमंत गुणाले, इंजिनियर आशिष देवगडे, मी स्वतः आणि संतोष तिरमनवार अशी क्रियाशील अधिकाऱ्यांची फौज तयार केली होती. वास्तविक मी त्यावेळी जिल्हा परिषदेमध्ये कार्यरत असलो तरी राहायला एकाच कॉलनीत होतो. संपूर्ण जिल्हाभर पाटबंधारे विभागाच्या कामाची मोठी धडाकेबाज मोहीम सुरू होती. त्यावेळी बैठकीच्या निमित्ताने आमच्या भेटीगाठी आणि चर्चा व्हायच्या.

संतोष जल योगदानाचा...

कामासंदर्भात बैठक असली की इंजि. संतोष तिरमनवार हे एकदम उमदा, धाडसी, तरुण अभियंता स्वतःहून पुढे येऊन चर्चा करायचे. निर्णय घ्यायचे. कामात पुढाकार घ्यायचे. तिरमनवार यांचे वेगळेपण असे की सर्व स्तरातील लोक, प्रशासकीय अधिकारी आणि राजकीय नेते मंडळी यांच्याशी ते पुढाकार घेऊन चर्चा करायचे. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्व सर्वांच्याच लक्षात राहील असे होते. तिथेच आमची पहिली ओळख झाली. ओळखीचे रूपांतर मैत्रीत देखील झाले. राहायला एकत्र कॉलनीत असल्याने सकाळी बॅडमिंटन खेळायला एकत्र असायचो. त्यामुळे आमचा स्नेह वाढत गेला आणि मैत्रीही घट्ट झाली.

त्यानंतर धाराशिव येथून आमच्या दोघांच्याही बदल्या नांदेड येथे झाल्या. त्यांची बदली जरा माझ्या अगोदर झालेली होती. त्यानंतर माझी पोस्टिंग अप्पर पैनगंगा येथे सिंचन व्यवस्थापनामध्ये झाली. माझ्या आधी त्यांची बदली झाल्याने नांदेड पाटबंधारे विभाग आणि अप्पर पैनगंगा विभाग असे दोन्ही पदभार त्यांच्याकडे होते. मी बदलून नांदेड येथे आल्यावर अप्पर पैनगंगाचा पदभार त्यांच्याकडून मी स्वीकारला. या ठिकाणी देखील आम्ही सोबत काम केले. त्यावेळी वारंवार असे दृष्टीस पडायचे की तिरमनवार नेहमीच कामाच्या बाबतीत एनर्जेटिक असायचे. कुठल्याही कामात स्वतःहून पुढाकार घ्यायचे आणि कामे वेगाने मार्गी लावायचे. त्याचबरोबर आपल्या जलसंपदा खात्याव्यतिरिक्त महसूल, गृह, बांधकाम इत्यादी खात्यातील अधिकाऱ्यांशी देखील त्यांचे घनिष्ठ संबंध असायचे. त्यामुळेच नांदेडमध्ये झालेल्या गुरु ता गद्दी या त्रिशतकी महोत्सवासाठी अनेक नाविन्यपूर्ण बांधकामे त्यांच्याकडे सोपविण्यात आली. वास्तविक पाहता आम्ही दोघेही जलसंपदा विभागात सिंचन व्यवस्थापनात काम करीत होतो. बांधकाम हा विषय आमच्याकडे नव्हता. परंतु गुरू त्ता गद्दीच्या निमित्ताने जी काही नवीन बांधकामे नांदेड शहरात येणार होती, त्याची जबाबदारी तिरमनवार यांचा उत्साह आणि

कार्यक्षमता बघून त्यांच्याकडे सोपविण्यात आली. ती त्यांनी अतिशय उत्कृष्टपणे पार पाडली आहेत. गोदावरी नदीच्या तीरावरील अनोखा घाट, गार्डनची कामे त्यांनी अतिशय नाविन्यपूर्ण रीतीने आणि काल मर्यादेपूर्वी पूर्ण केली. या कामाच्या निमित्ताने ज्या बैठका होत असत, त्यामध्ये श्री तिरमनवारांचा उत्साह दांडगा असायचा. उत्स्फूर्तपणे ते चर्चेत आणि कामात सहभागी होत असत. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संपर्कात राहत असत. त्यावेळी राम घोटे साहेब हे आमच्या दोघांचेही वरिष्ठ होते.

श्री घोटे साहेबांनी आम्हाला दोघांना काम करण्यासाठी फ्री हँड दिला होता. त्यामुळे तिरमनवार स्वतः प्रत्येक कामात पुढाकार घ्यायचे. स्वतः भरपूर काम करायचे. कामे चालू असताना जातीने साईट व्हिजिट करुन लक्ष घालून त्याची गुणवत्ता कशी राखली जाईल आणि वेळेच्या आत ती कशी पूर्ण होतील यावर त्यांचे बारीक लक्ष असे. कुठल्याही कामाची जबाबदारी ते स्वतः घेत असत आणि त्यात काही अडचणी आल्या तरी ते स्वतः जबाबदारी स्वीकारत असत. कर्मचाऱ्यांवर कधीही त्यांनी खापर फोडले नाही.

दुधना प्रकल्पाच्या बाबतीत तर त्यांचे धाडस, संयम, चिकाटी आणि जिद्द खूपच दिसून येते. त्या ठिकाणी पुनर्वसनाचा प्रश्न अनेक वर्षापासून प्रलंबित होता. प्रकल्पग्रस्त लोकांच्या मागण्यांना अंतच राहिला नव्हता. लोक खात्याच्या अधिकाऱ्यांना कामच करू देत नव्हते. जे जे सरकारकडून काढून घेता येईल तेवढे घेतले जात होते. परंतु कामाला मात्र सुरुवात करू देत नव्हते. अधिकाऱ्यांनी कितीही समजूतदारपणे समजावून सांगितले आणि स्थलांतरासाठी तयार केले तरी लोक अजिबात ऐकायचे नाहीत. त्यामुळे पुढील काम करणे अशक्यप्राय होते. परंतु तिरमनवार यांनी चिकाटी सोडली नाही. महसूल आणि गृह खात्यामधील अधिकारीही त्यांचे मित्र होते. त्यांची मदत घेऊन त्यांनी थेट पोलीस संरक्षणात काम सुरू केले

आणि एक वर्षाच्या आत ते काम पूर्ण देखील केले. त्यावेळी त्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागला. परंतु त्यांनी आपली जिद्द सोडली नाही, हे काम गतीने चालू ठेवले.

त्यानंतर बीड जिल्ह्यामध्ये देखील आम्ही सहकारी म्हणून काम केले आहे. या ठिकाणी देखील असाच एक प्रकल्प वर्षानुवर्षे रखडलेल्या अवस्थेत होता. बीड जिल्ह्यातील अप्पर कुंडलिका हा प्रकल्प खूप रखडला होता. तिथेही पुनर्वसनाचा प्रश्न होता. तेथेही त्यांनी सर्व पातळीवर वरिष्ठांशी संपर्क करून, राजकीय नेत्यांची मदत घेऊन लोकांमध्ये विश्वास निर्माण केला आणि प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्यासाठी टेम्पररी शेड बांधले. लोकांना स्थलांतरीत करताना स्वतः तिथे उभे राहिले. लोकांना विश्वास दिला आणि तो रखडलेला प्रकल्प शेवटी मार्गी लागला. त्यांनी आपल्या कारकिर्दीत रखडलेले अनेक प्रकल्प मार्गी लावले आणि खूप त्रासही सहन केला. परंतु निराशा कधी त्यांच्या चेहऱ्यावर दिसली नाही. सतत सकारात्मक विचार करणे हे त्यांचे खास स्वभाव वैशिष्ट्य आहे. इतका कामाचा व्याप मागे असताना वारंवार साईट व्हिजिट करणे, कामाची गुणवत्ता राखणे याबाबत ते कधीही तडजोड करीत नसत. त्यांचे बोलणे, वागणे सगळेच कसे अगदी सिस्टिमॅटिक होते. त्यामुळे त्यांचे म्हणणे लगेचच समोरच्या लोकांच्या गळी उतरत असे. त्यांचे विचार करणे अद्भुत होते.

पुढे काही काळ ते कोकण पाटबंधारे विकास महामंडळाचे मुंबई येथे मुख्य अभियंता म्हणून देखील कार्यरत होते. त्यावेळी त्यांचे लक्ष जसे कोकणात रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्याकडे होते तेवढेच ते मराठवाड्याच्या दुष्काळग्रस्त भागाकडेही होते. घाटमाथ्यावर भरपूर पाऊस पडतो आणि तेथील पश्चिम वाहिनी नद्या पुढे कोकणात वेगाने वाहून प्रचंड मोठ्या प्रमाणात पाणी समुद्राला जाऊन मिळते. ते वाया जाणारे पाणी नद्या जोड प्रकल्प अंतर्गत मराठवाड्यापर्यंत कसे आणता येईल याचा ते

सतत विचार करीत होते. केवळ विचारच करत नव्हते तर ते प्रत्यक्षात कसे साकारता येईल याची मांडणी देखील करत होते.

श्री तिरमनवार यांच्या हस्ते पार पडलेले आणखी एक महत्त्वाचे काम म्हणजे लेंडी प्रकल्प! हा प्रकल्प नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात असून गेल्या ४० वर्षापासून तो रखडलेला आहे. लोक पुनर्वसनाच्या प्रश्नावर अडून बसायचे आणि घळभरणीचे काम होत होऊ देत नव्हते. परंतु त्यांनी अजिबात हार मानली नाही. एकीकडे प्रशासकीय पातळीवर सुधारित प्रशासकीय मान्यता आणि अंमलबजावणी अशी लढाई तर दुसरीकडे घळभरणीपूर्वी प्रकल्पग्रस्ताचे पुनर्वसन या दोन्ही आघाडीवर त्यांचे प्रयत्न सुरू होते. या प्रकल्पाच्या घळभरणीला मे महिन्यात मंजुरी मिळाली आणि अवघ्या एक महिन्यात घळभरणी पावसापूर्वी पूर्ण करायची होती. तत्पूर्वी लोकांचे स्थलांतर करायचे होते. तेथील लोकांना समजावून सांगितले, विनंत्या केल्या तरी लोक काही घरे सोडायला तयार होत नव्हती. पावसाळा तर तोंडावर आला होता. अशा परिस्थितीत काम करणे खूप धाडसाचे होते. मोठी रिस्क होती. परंतु श्री तिरमनवार यांनी ती रिस्क घेतली. पावसाळा पंधरा दिवसावर आहे म्हणताना घळभरणी ऐन पावसात पूर्ण केली. परंतु त्यात दुर्दैवाची गोष्ट अशी की मोसमी पूर्व पावसाने अचानक मुसंडी मारली. फार मोठ्या प्रमाणावर पाऊस पडला आणि मोठे नुकसान झाले. परंतु त्यांनी शेवटपर्यंत हार मानली नाही. शेवटी लेंडी हा २६००० हेक्टर सिंचन क्षमता असणारा प्रकल्प पूर्णत्वास गेला. दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील मुखेड आणि देगलूर तालुक्याची कायमची पाण्याची तहान भागली. शेतकरी देखील खूश झाले.

अशा प्रकारे मराठवाड्याच्या मातीशी इमान राखणाऱ्या भूमिपुत्राने असंख्य संकटाशी सामना करून लोकांनी आशा सोडून दिलेले प्रकल्प नुसते मार्गी लावले नाहीत तर कमी वेळेत पूर्ण देखील केले. आपल्या प्रदीर्घ शासकीय सेवेतून ते सध्या सेवानिवृत्त होत आहेत.त्यांना दीर्घायुष्य चिंतितो.



मा.इंजि. जयंत बोरकर
कार्यकारी संचालक
तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळ,
जळगाव

स्मरणगंध एका व्यक्तिमत्त्वाचा

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागात तब्बल बत्तीस वर्षांहून अधिक काळ निष्ठेने, समर्पणाने आणि उत्कटतेने सेवा बजावल्यानंतर संतोष तिरमनवार हे कार्यकारी संचालक या सचिव संवर्गातील सर्वोच्च पदावरून निवृत्त होत आहेत. या निमित्ताने, एका व्यक्तीच्या कारकीर्दीचा शेवट होत नाही; उलट एका अर्थपूर्ण, प्रेरणादायी आणि अनेकांना दिशा देणाऱ्या प्रवासाचा एक महत्त्वाचा टप्पा पूर्णत्वास येत आहे.

एखाद्या अधिकाऱ्याच्या कार्याचा आलेख मांडणे, त्याच्या पदोन्नतीची नोंद घेणे, त्याच्या कामगिरीचे विश्लेषण करणे हे सर्व नोंदवहीत मांडता येते. पण एखाद्या माणसाचा प्रवास समजून घेणे, त्याच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलू अनुभवणे आणि त्या सगळ्याला शब्दांत पकडण्याचा प्रयत्न करणे हे मात्र अत्यंत सूक्ष्म आणि संवेदनशील काम आहे. विशेषतः जेव्हा तो माणूस तुमचा सहप्रवासी, सहकारी आणि त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे जिवाभावाचा

मित्र असतो. संतोषचा प्रवास हा केवळ पदांचा किंवा जबाबदाऱ्यांचा आलेख नाही; तो एका ठाम निर्णयाचा, धैर्याचा आणि मुल्यांशी केलेल्या निष्ठेचा प्रवास आहे. महानगरातील सुखसोयींनी परिपूर्ण, स्थिर आणि प्रतिष्ठित खाजगी नोकरीचा मार्ग त्याने जाणीवपूर्वक सोडला. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कठीण आणि स्पर्धात्मक परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून त्याने शासन सेवेत प्रवेश केला. सहाय्यक कार्यकारी अभियंता म्हणून सुरुवात करताना त्याच्या मनात केवळ करिअरची आकांक्षा नव्हती, तर समाजाशी जोडलेली जबाबदारी होती.

नांदेड जिल्ह्यातील किनवटसारख्या ग्रामीण भागातून आलेल्या संतोषने महानगरात शिक्षण आणि करिअर घडवले आहे. पण त्यांनी पुन्हा ग्रामीण वास्तवाशी एकरूप होऊन, त्या भागाच्या गरजांना प्रतिसाद देत काम करणे ही त्याची खरी ताकद होती. त्याने महाराष्ट्राच्या विविध भागात काम करताना केवळ योजना राबवल्या नाहीत, तर त्या त्या भागाशी एक भावनिक नातं निर्माण केलं. कार्यकारी अभियंता म्हणून सुरुवात करताना जो उत्साह, धडाडी आणि कामाप्रतीची निष्ठा त्याच्यात होती, तीच ज्योत कार्यकारी संचालक पदापर्यंत अखंड पेटती राहिली. पद उंचावत गेले, जबाबदाऱ्या वाढत गेल्या, पण त्याच्या कामाच्या पद्धतीतला प्रामाणिकपणा आणि समर्पण कधीही कमी झाले नाही.

नांदेड येथील दिवस माझ्यासाठी विशेष आठवणीत राहणारे आहेत. वाल्मी येथील प्रशिक्षणाच्या सुरुवातीच्या काळात मी स्वतः संभ्रमात होतो ONGC सारखी चांगली नोकरी सोडून शासन सेवेत येण्याचा निर्णय योग्य ठरला का, हा प्रश्न मनात सतत घोंगावत होता. त्या काळात संतोषने केलेली चर्चा, त्याने सांगितलेले अनुभव आणि शासन सेवेच्या व्यापकतेबद्दलचे त्याचे दृष्टिकोन यांनी माझा संभ्रम दूर केला. त्या एका संवादाने माझ्या विचारांना नवी दिशा दिली.

नांदेडमध्ये आमचे सहजीवनही तितकेच संस्मरणीय होते. संतोष शेजारच्या क्वार्टरमध्ये राहत होता. त्या काळात मला नांदेड विशेष भावले नव्हते; उलट मी तिथे आजारीही पडलो होतो. एक प्रकारची एकाकीपणाची भावना होती. पण संतोषच्या सहवासामुळे त्या काळातला एकटेपणा आणि निराशा मोठ्या प्रमाणात हलकी झाली. मित्र म्हणून त्याची साथ किती महत्त्वाची असते, हे तेव्हा प्रकर्षाने जाणवले.

जीवनात काही प्रसंग असे येतात, जे व्यक्तिमत्त्वाचे खरे रूप उलगडून दाखवतात. कोरोनाच्या दुसऱ्या लाटेतला काळ हा तसाच होता. मी अत्यंत गंभीर अवस्थेत रुग्णालयात भरती होतो. एकाकीपणा, अनिश्चितता आणि भीती या सगळ्यांनी वेढलेला तो काळ होता. अशा वेळी संतोष स्वतः आजारी असूनही रोज सकाळ-संध्याकाळ फोन करून माझी विचारपूस करत राहिला. तुला काही होणार नाही, तू नक्की बरा होशील हा त्याचा विश्वास मला उभारी देणारा ठरला. त्या शब्दांनी केवळ धीरच दिला नाही, तर जगण्याची इच्छा दृढ केली. मित्र म्हणून त्याचे हे रूप माझ्यासाठी कायम स्मरणात राहील.

संतोषचा सेवाप्रवास महाराष्ट्राच्या विविध भागांशी जोडलेला आहे. यवतमाळ, नांदेड, धाराशिव, मंत्रालय, कोकण आणि छत्रपती संभाजीनगर. प्रत्येक ठिकाणी त्याने वेगवेगळ्या भूमिका निभावल्या. मंत्रालयात उपसचिव म्हणून धोरणात्मक काम, क्वालिटी कंट्रोल प्रमुख म्हणून राज्यभर भ्रमण, कोकणातील कठीण परिस्थितीत खंबीर नेतृत्व आणि छत्रपती संभाजीनगर येथे कार्यकारी संचालक म्हणून जबाबदाऱ्यांचा प्रचंड भार सांभाळताना आंदोलकांशीही ठामपणे सामना या सर्व भूमिकांमध्ये त्याची कार्यक्षमता आणि स्थैर्य दिसून येते. पण या सर्व पदांच्या पलीकडे एक माणूस आहे , संवेदनशील, जिव्हाळ्याचा आणि आशावादी. कुटुंबासाठी प्रेमाचा

आधार असलेला पिता, मित्रांसाठी दिलखुलास आणि मदतीला तत्पर असलेला साथी आणि प्रत्येक परिस्थितीत सकारात्मकता शोधणारा व्यक्ती. त्याच्या व्यक्तिमत्त्वातील ही माणुसकीच त्याला वेगळं ठरवते. आज तो औपचारिकरित्या सेवेतून निवृत्त होत आहे. पण काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की, त्यांना निवृत्ती हा शब्द लागू होत नाही. ती सतत कार्यरत राहतात, त्यांच्या अनुभवातून, त्यांच्या विचारातून आणि त्यांच्या कृतीतून. संतोष हा त्याच प्रकारातील आहे. त्यामुळे ही केवळ सेवापूर्ती नसून, एका नव्या अध्यायाची सुरुवात आहे.

या नव्या प्रवासात त्याच्याकडे अनुभवाची संपन्नता आहे, नात्यांची उब आहे आणि आशावादाची अमर्याद ऊर्जा आहे. त्यामुळे तो पुढेही समाजात, देशात आणि आपल्या परीने लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवत राहील, याबद्दल शंका नाही. या क्षणी, एका मित्राच्या नात्याने, सहकाऱ्याच्या नात्याने आणि त्याच्या प्रवासाचा साक्षीदार म्हणून मी त्याचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. त्याच्या पुढील आयुष्यात आनंद, समाधान, आरोग्य, ऐश्वर्य आणि नव्या यशांची शिखरे लाभोत हीच मनापासून शुभेच्छा. संतोष, तुझा हा प्रवास आम्हाला अभिमान देणारा आहे. आणि पुढचा प्रवास तो नक्कीच अधिक उज्ज्वल असेल याची खात्री आहे.

चिअर्स!



मा.इंजि. संजीव टाटू
महासंचालक, मेरी,
नाशिक

एका अवीट मैत्रीचा प्रवास

संतोष रामकिशन तिरमनवार. माझा VJTI कॉलेजचा आणि जलसंपदा विभागाचा बॅचमेट. त्याची माझी पहिली भेट VJTI कॉलेजमध्ये १९८५ ते ८६ या दरम्यान कधीतरी झाली. त्या पहिल्या भेटीमध्ये कधी असे वाटले नव्हते की आमची मैत्री इतकी गाढ होईल. महाराष्ट्राच्या नांदेड जिल्ह्यातील तेलंगणा (तत्कालीन आंध्र प्रदेश) राज्याच्या सीमेवर असलेल्या किनवट या नावाच्या गावाहून माझ्यासाठी अगदी अनोळखी ठिकाणाहून आलेला संतोष मुंबई सारख्या मोठ्या महानगरामध्ये केव्हा रमून गेला आणि सर्व VJTI च्या बॅचमेट्स मध्ये समरस होऊन गेला हे कळलेच नाही. VJTI मध्ये शिकत असताना तो हॉस्टेलमध्ये राहत होता, त्यामुळे हॉस्टेलमध्ये राहणाऱ्या इतर बॅचमेट्सबरोबर त्याची गट्टी जास्त घट्ट जमली. एखाद्या Tollywood मधील सुप्रसिद्ध हिरो सारखा संतोष दिसायचा (अजूनही दिसतो), त्यामुळे सर्व कॉलेजच्या मित्रांनी त्याचे बारसे करून अण्णा असे नाकारण केले. आजही कॉलेजचे मित्र त्याला अण्णा म्हणूनच हाक मारतात.

कॉलेज मध्ये अण्णा अत्यंत sincere, honest and hardworking होता. Termwork, Assignments, practicals हे सर्व तो अतिशय मन लावून करायचा. माझे आणि त्याचे आडनाव T अक्षरावरून सुरू होत असल्यामुळे आमच्या Viva परीक्षा जवळपास एकामागून एक व्हायच्या तेव्हा अण्णा

शेवटच्या क्षणापर्यंत पुस्तकात डोकं घालून अभ्यास करत असलेला मी पाहिला आहे. कॉलेजतर्फे खंडाळा, महाबळेश्वर आणि गोवा अशा तीन Field Visits झाल्या. त्यात अण्णांनी सर्व अपेक्षित assignment मन लावून व संघ भावना प्रमुख स्थानी ठेवून केल्या. अनेक विद्यार्थी assignments करताना GT मारायचे. पण अण्णानी GT मारल्याचे मला आठवत नाही. तसेच अनेकांना कुठल्या न कुठल्या semester मध्ये कुठल्या न कुठल्या विषयात एटीकेटी लागली होती, परंतु अण्णाला एटीकेटी लागल्याचे स्मरत नाही.

अण्णा sincere, honest and hardworking जरी असला तरी तो serious बिलकुल नव्हता. उलट तो मनमिळावू, मिश्किल स्वभावाचा व चेहऱ्यावर कायम स्मितहास्य असलेला होता. कोणालाही कुठल्याही प्रकारची नड भासली तर त्याचा मदतीचा हात कायम पुढे असायचा. त्यामुळे अण्णा हा सर्वांशी चांगल्या प्रकारे कनेक्ट झाला होता. आमच्या बॅच मध्येसुनील पुजारी व अनुराग वर्दे हे दोन अत्यंत सुंदर गायक होते. कॉलेज च्या ॲन्युअल फंक्शनमध्ये ते दोघे स्टेज वर बरेच गाणी गायचे. त्या वेळेस आम्ही सर्व स्टेजच्या खाली मनसोक्त नाचायचो. या नाचण्यात अण्णाचा उत्साह लई भारी असायचा. सुनीलचे ते गाणे, नवीन पोपट हा.. लागला विठू विठू बोलायला.. आणि त्यावर अण्णासकट सर्व प्रेक्षकांनी केलेला नृत्योत्सव अवर्णनीय व अविस्मरणीय आहे. सुनील पुजारी, मनोज कुरुमभटी, शिवा वंजारी, हरीश जेठवा, अशोक शिवाजीराव निलंगेकर पाटील, उदय पाटील इत्यादी हे अण्णाचे विशेष दोस्त. त्यांच्या बरोबर, तसेच इतर सारे बॅचमेट्स बरोबर मिळून मिसळून, गंमत जंमत करत हसत खेळत कॉलेजचे चार वर्षे केव्हा पूर्ण झाली व सर्व जण बी.इ.सिव्हील इंजिनियरींग झाले, ते कळलेच नाही. त्या नंतर प्रत्येक जण आपापल्या मार्गावर पुढे निघून गेले. काही जण GRE, TOEFL देऊन उच्च शिक्षणासाठी परदेशी निघून गेले, तर काही नी नोकरी सुरू केली, तर काहींनी वडिलांच्या व्यवसायात काम सुरू केले. अण्णांनी VJTI मध्येच ME Environmental Engineering साठी admission घेतले. मी मात्र बीई सिव्हील झाल्यानंतर

नोकरीला लागलो. त्यामुळे अण्णासोबतचा VJTI मधील माझा सहवास संपला. ME Environmental Engineering चे VJTI मधील उच्च शिक्षण पण अण्णांनी उत्कृष्टरित्या पूर्ण केले असणार यात काही शंका असण्याचे कारणच नाही.

जलसंपदा विभागातील आठवणी :-

ME Environmental Engineering पूर्ण केल्यानंतर संतोष नी ROLTA नावाच्या सुप्रसिद्ध मल्टी नॅशनल कंपनीमध्ये नोकरी सुरू केली. आमच्या बीई सिव्हील इंजिनियरींगच्या बॅचमेट्सपैकी अत्यंत खोडकर असा निरंजन उपाध्याय पण संतोष सोबत ROLTA कंपनीत नोकरीला लागला. दोघांनी त्या कंपनीत खूप मन लावून काम केले.

जून १९९२ मध्ये एमपीएससीची परीक्षा असल्याचे वृत्तपत्रात जाहीरात आली. ग्रामीण भागात वाढलेल्या संतोषने या संधीचा फायदा घेऊन शासकीय नोकरी स्वीकारून सर्व सामान्य जनतेची सेवा करण्याचे ठरवले व एमपीएससी परीक्षेचा अर्ज भरला. बीइ सिव्हील इंजिनियरींग आणि एमई एन्व्हायरमेंटल इंजिनियरींग सारखे शिक्षण घेऊन उत्कृष्ट शैक्षणिक पात्रता तर संतोष कडे होतीच. त्या सोबत एमपीएससी परीक्षेसाठी पुनश्च जोमाने अभ्यास करून व इंजिनियरिंगमध्ये शिकलेल्या गोष्टींची मनोभावे उजळणी करून संतोष एमपीएससी परीक्षेसाठी सज्ज झाला. लेखी परीक्षेत चांगल्या मार्कांनी उत्तीर्ण होऊन मौखिक परीक्षा द्यायला संतोष एमपीएससी कार्यालयात आला तेव्हा माझी त्याची पुन्हा भेट झाली. दोघांनी एकमेकांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या आणि दोघे ही एमपीएससीद्वारे वर्ग १ अधिकारी म्हणून जलसंपदा विभाग (तत्कालीन पाटबंधारे विभाग) मधे निवडलो गेलो. तिथून पुढे आमचा शासकीय नोकरीचा विभागांतर्गत प्रवास सुरू झाला.

३ जानेवारी १९९४ रोजी आम्ही सर्व नवनियुक्त सहाय्यक कार्यकारी अभियंता या पदावर Induction Trining साठी इंजिनियरींग स्टाफ कॉलेज नाशिक येथे रुजू झालो व आमच्या मैत्रीपूर्ण प्रवासाचा नवीन अध्याय सुरू झाला. जलसंपदा विभागाच्या कामकाजाचे विविध पैलू आम्हाला या एका वर्षात शिकवल्या गेले. नाशिक येथे काही दिवस ट्रेनिंग झाल्या नंतर विविध

क्षेत्रीय कार्यालयात फिल्ड ट्रेनिंग झाले. वाल्मी, औरंगाबाद येथे जवळपास ९ महिन्याचे ट्रेनिंग झाले. या ट्रेनिंगच्या कालावधीत आमच्या सर्व बॅचमेट्सची एकमेकात जी मैत्री झाली, ती दिवसेंदिवस गाढ होत गेली व आज च्या घडीला आम्ही एकमेकांचे जिवलग मित्र झालो आहोत.

ट्रेनिंग नंतर प्रत्येक जण आपापल्या पोस्टिंगच्या ठिकाणी रुजू झाले व कामकाजाला सुरुवात केली. वेळोवेळी प्रत्येकाच्या बदल्या वेगवेगळ्या ठिकाणी होत गेल्या. काहींची पदस्थापना एकाच मुख्यालयात झाली, तर काहींची वेगवेगळ्या मुख्यालयात झाली. ज्यांची लग्न व्हायची बाकी होती, त्यांची लग्न झाली. संतोषचे लग्न किनवटला झाले. लग्नाला येण्यासाठी त्याने आवर्जून निमंत्रण दिले होते, परंतु कामाच्या व्यापामुळे मी काही जाऊ शकलो नव्हतो.

साधारणपणे १० वर्षानंतर आमच्या बॅचमेट्सनी नाशिक येथे गेट टुगेदर करायचे ठरवले. त्यावेळी संतोषची पुन्हा भेट झाली. मधल्या काळात एकमेकांचे अनुभव एकमेकांना सांगितले, तेव्हा कळले की संतोषला सहाय्यक कार्यकारी अभियंता आणि कार्यकारी अभियंता या पदावर वैविध्यपूर्ण कामे करायला मिळाली होती. ही सर्व कामे संतोष लीलया पार पाडत होता याचे मला कौतुक वाटले. या गेट टुगेदरमध्ये संतोष सकट सगळ्यांनी मनसोक्त आनंद घेतला व त्याच वेळी ठरवलं की असे गेट टूगेदर अधून मधून करत राहायला पाहिजे. मग कधी लोणावळा तर कधी औरंगाबाद तर कधी कोकणात तर कधी पुणे असे वेगवेगळ्या ठिकाणी गेट टूगेदर होत राहिले. या सर्वांमध्ये संतोषचा उत्साह कौतुकास्पद होता.

अधीक्षक अभियंता व उपसचिव (मो प्र-१) या पदावर मंत्रालयात संतोषनी काही काळ व्यतीत केला. त्यात त्यानी काही महत्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यात हातभार लावला.

मुख्य अभियंता म्हणून कोंकण प्रदेश सारख्या महत्वपूर्ण भागात संतोषनी अतिशय योग्य पद्धतीने व सामाजिक हित लक्षात ठेवून निर्णय घेतले. काही प्रसंगी त्याला त्याचा खूप त्रास देखील झाला. पण त्या त्रासाला

न डगमगता संतोष त्याच्या सदसद्विवेकबुद्धीला स्मरून काम करत राहिला. किचकट न्यायालयीन प्रकरणे, अज्ञात लोकांचे दडपण, चालू बांधकामातील तांत्रिक अडचणी, कंत्राटदारांचे हेवेदावे इत्यादी यांना संतोष अत्यंत सावधपणे व शिस्तबद्धपणे सामोरे गेला. त्या काळात त्यानी मालवण येथे कोस्टल सिंधुदूर्गमध्ये आमच्या सर्व बॅचमेट्सची एक गेट टूगेदरचे आयोजन केले होते व त्याचा सर्वांनी मनसोक्त आनंद घेतला होता हे माझ्या कायम स्मरणात राहील. मी स्वतः पण या गेट टूगेदरमध्ये सामील झालो होतो व निसर्गरम्य समुद्र किनारी टेहळणी करण्याचा, बोटींग करण्याचा व snorkelling चा आस्वाद घेतला होता.

या गेट टूगेदरच्या दरम्यान सोळाव्या शतकात निर्माण केलेल्या धामापूर तलावाची पाहणी संतोष सोबत करायला मिळाली व त्याची माहिती घेऊन आश्चर्यचकित झालो. जवळ जवळ ५०० वर्षापूर्वी बांधलेल्या या तलावात आजही पाणी अगदी स्वच्छ व निर्मळ दिसत होते. तलावाच्या आजुबाजूला आंबा व नारळाच्या अनेक बागा दिसल्या. स्थानिक लोकांच्या सहाय्याने या तलावाचे व त्या शेजारी असलेल्या भगवती मंदिराचे संगोपन केले जात असल्याचे ऐकून खूप कौतुक वाटले. एकंदरीतच हे कोकणातील गेट टूगेदर स्पेशल होते व ते कायम स्मरणात राहील.

याच दरम्यान हम्पटा पास या हिमालयीन ट्रेकला संतोष सोबत जाण्याचा प्रसंग आला. त्यातील संतोषवर आलेला बिकट प्रसंग व स्वर्गाचे दार ठोठावून परत घरी आल्याचा प्रसंग संस्मरणीय राहील.

त्या पुढील पदोन्नती मिळाल्यावर गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ या कार्यालयात संतोष कार्यकारी संचालक या जलसंपदा विभागातील सचिव समकक्ष आणि सर्वोच्च पदावर रूजू झाला. त्यानंतर त्या महामंडळात शिस्तबद्धता आणण्याचा व घडी नीट बसवण्याच्या कामाला संतोष लागला. त्या महामंडळात विविध बांधकामे सुरू होती त्याचा आढावा घेऊन त्यांना गती देण्याचे काम संतोषनी सुरू केले. भूसंपादन, पुनर्वसन, निधी इत्यादी अडचणी सोडविण्यात संतोषनी त्याचे कौशल्य पणाला लावले.

मला आठवते लेंडी प्रकल्पाच्या घळभरणीसाठी संतोष सातत्याने प्रयत्न करत होता. मा. मंत्री महोदयांपासून मंत्रालयातील अवर सचिवापर्यंत सगळ्यांना लेंडी प्रकल्पाच्या घळभरणीसाठी तात्काळ बैठक लावावी असा तगादा संतोष नी वारंवार केला. त्याचाच परिणाम म्हणून या प्रकल्पाच्या पुनर्वसनाचा क्लिष्ट विषय मार्गी लागून सन २०२५ मध्ये लेंडी प्रकल्पाची घळभरणी यशस्वी रीत्या पूर्ण होऊ शकली. प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण करून त्याचा लाभ सर्व लाभधारकांना मिळावा यासाठी संतोष सातत्याने करत असलेले प्रयत्न सर्वांना प्रेरणादायी व अनुकरणीय आहेत.

गोदावरी नदीच्या उर्ध्व भागातील प्रकल्पांचे पाणी मराठवाडा प्रदेशातील जायकवाडी धरणात समन्यायी पद्धतीने पाणी वाटप करण्याची संपूर्ण जबाबदारी कार्यकारी संचालक या नात्याने संतोष वर होती. मला आठवते सन २०२२-२३ च्या पावसाळ्यात पाऊस कमी पडल्यामुळे असे समन्यायी पद्धतीने पाणी वाटप करण्याचा प्रसंग संतोष वर आला होता. हा अतिशय संवेदनशील विषय होता. कारण गोदावरी नदीच्या उर्ध्व भागातील लाभधारक पाणी सोडण्याच्या विरोधात होते व जायकवाडीचे लाभधारक त्यांच्या हक्काचे पाणी त्यांना मिळावे म्हणून उर्ध्व भागातील धरणांमधून पाणी सोडण्याबाबत तीव्रपणे आग्रही होते. प्रकरण खूप गरम झाले होते. मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल झालेल्या होत्या. त्याचा निकाल लागून मा. सर्वोच्च न्यायालयाची पायरी लोकांनी गाठली होती. त्या काळात इतकी तणावपूर्ण परिस्थिती होती की संतोषला स्वतःचा जीव वाचवण्याकरिता पोलिस संरक्षण घ्यावे लागले होते. अशा परिस्थिती देखील संतोषनी मन व मेंदू स्थिर ठेवून कायद्यातील तरतुदीनुसार व न्यायालयीन आदेशात दिलेल्या सूत्रानुसार पाणी सोडण्यासाठी आवश्यक आदेश निर्गमित केले व त्यानुसार चोख अंमलबजावणी होईल याची काळजी घेतली. खरोखर ""Hats Off"" म्हणायला पाहिजे संतोष च्या या कामाबद्दल.

संतोषच्या मुलीचे, स्नेहलचे एंगेजमेंट व लग्न अत्यंत थाटामाटात व जंगी स्वरूपात झाले. या दोन्ही कार्यक्रमाला मला उपस्थित राहता आले व हा सोहळा अनुभवता आला. संतोषच्या मुलाच्या आमोदच्या

कार्यालयाचे पुण्यात नुकतेच उद्घाटन झाले. तो कार्यक्रम पण खूप छान पद्धतीने संपन्न झाला.

एकंदरीत सर्व जबाबदाऱ्या संतोषनी अत्युत्कृष्टपणे पार पाडल्या असून आता ३० एप्रिल रोजी त्याची सेवापूर्ती होत आहे. त्यांनी केलेल्या कामाबद्दल त्याला माझ्यातर्फे खूप खूप अभिनंदन आणि पुढील कालावधी मधील त्याच्या वाटचाली करीता मनःपूर्वक शुभेच्छा.

संतोष,...सुमारे ४० वर्षापासूनची आपली मैत्री अशीच उत्तरोत्तर अधिक घट्ट व स्नेहपूर्ण होत राहो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

तुझा मित्र
संजीव टाटू



मा.इंजि. आशिष देवगडे
से.नि. महासंचालक, मेरी
नाशिक

संतोष रामकिशन तिरमनवार आमचा बॅचमेंट, वाट चुकून जलसंपदा विभाग कडे आला. भूमिपुत्राकडून काही लोकसेवा घडायची असेल, स्थापत्य अभियंता नावारुपास यायचा असेल, आमची मैत्री व्हायची असेल, कदाचित प्रारब्ध असेल. काहीतरी घडवण्यासाठी उत्स्फूर्त सतत चंचल व चप्पळ अशा त्याच्या आंतरिक अतिउत्सामुळे स्वतः अस्थिर राहतो आणि इतरांनाही अस्थिर करू शकतो. आपल्याला नेमकं काय साध्य करायचं आहे हे त्याच्या सतत ज्ञानात असते. त्यासाठी अचूक वेळ साधने हे कौशल्य आणि त्यासाठी कोण, कधी, कसा, कुठे उपयोगी पडेल याचे विविध अंगी आराखडे तयार करताना तत्त्वज्ञानाची ठाम भूमिका घेतो. कधीमधी तो मवाळ, नमती किंवा सोयीची ही भूमिका घेतो. वेळप्रसंगी प्रखर विरोधालाही सामोरा जाऊन लढवय्याप्रमाणे स्वतःवर वार घेतो आणि अंतिमतः एखादा प्रकल्प पूर्णत्वास न्यायचा असेल तर ज्याची सहाय्यता कामी येऊ शकेल

त्याचा उचित उपयोग करून घेता येणे जमले तर विभागात यशस्वी होऊ शकतो हा मूलमंत्र त्याने शेवटपर्यंत जोपासला. विभागातील तरुण आणि होतकरू अभियंत्यांनी त्याचा हा गुण घेण्यासारखा आहे. सतत असंतुष्ट राहण्याची त्याची वृत्ती नवनवीन निर्मितीचा पाया असतो जरी नावात संतोष असेल तरी. त्याला अत्यल्प शब्दात वर्णायचे असेल तर अतिरेकी उत्साही तरीही संतोष असे म्हणता येईल.

३ जानेवारी १९९४ रोजी आम्ही सर्व बॅचमेट एकत्र भेटलो. भेटलो काय, जिवलग मित्र झालो. कमी अधिक प्रमाणात सुख दुःखात सहभागी झालो पण सर्वांनी जीव लावला एकमेकांना. चांगल्या वाईट गोष्टीचे आदान प्रदान झाले. चुकत असेल तर टोकतो, दुखत असेल तर धीर देतो. संतोष फक्त त्याची तरा वेगळी. रोल्टा या त्यावेळच्या नावाजलेल्या संगणक क्षेत्रात अग्रणी असलेल्या कंपनीच्या नोकरीला सोडून निम्म्यापेक्षा कमी पगारात जलसंपदा विभागात दाखल झालेला संतोष तिरमनवार त्याच क्षेत्रात राहिला असता तर तो कुठे पोहोचला असता याची कल्पनाच केलेली बरी. प्रशिक्षणा दरम्यान त्याच्या संगणक कौशल्याची चुणूक सीडॅक औरंगाबादला त्यांनी दाखवली. तेव्हाचे आमचे प्रशिक्षक तांदळे सर आमच्या सर्व बॅचचे गुणगान करायचे. म्हणायचे ही बॅच वेगळीच आहे. प्रत्येकाने आपापला रंग भरला त्यात. संतोषचाही सर्वात राहून सर्वांपेक्षा वेगळा. पार्टी करण्यात सर्वांना हवाहवासा, मनाने दिलदार असूनही वाकड्या वळणावर नाही गेला. मन मोकळेपणाने व्यक्त होणारा, तो पैशांची उधळपट्टी करतोय असं मला कधी जाणवलं नाही. प्रत्येक प्रशिक्षण दौऱ्यात हिरीरीने सहभागी होणारा आणि ग्रुप फोटोमध्ये त्याचा सहभाग असलाच पाहिजे यासाठी आग्रही असलेला संतोष. तेव्हा गाजलेल्या बाजीगर सिनेमातील **ए काली काली आँखे, ये गोरे गोरे गाल** या गाण्यावर प्रशिक्षणार्थी बस मधल्या निमूळत्या जागेत केलेला बेधुंद नाच माझ्या आणि सर्व मित्रांच्या मनात चिरतरुण राहील. संतोष दक्षिणेतील

सिनेमात गेला असता तर नक्कीच सुपरस्टार झाला असता याची आताही झलक त्याच्यात आढळते असे त्याचे काही निवडक मित्रांचे मत अजूनही आहे.

वडील पोलीस खात्यात उच्च पदस्थ असल्याने हात मोकळा आणि सैल. वडील मनमिळावू होते. त्यांना जेव्हा कधी भेटलो तेव्हा आमच्या कुटुंबाबद्दल आस्थेने विचारणा करायचे. त्याची आणि माझी आई मैत्रिणी होत्या. अगदी मुलाच्या लग्नात हुंडा घ्यायचा की नाही इतपत त्यांच्या चर्चा झाल्याचं माझ्या आईने मला सांगितले होते. त्याच्या लग्नाला हनुमंत गुणाले आणि मी किनवट सारख्या दूरदराजमध्ये असलेल्या तेव्हाच्या खेडेगावात आवर्जून उपस्थित होतो. त्यासाठी नांदेडहून शेअरिंग जीपने केलेला प्रवास आणि त्यानंतर नागपूरपर्यंत घडलेला बसचा प्रवास अजूनही मनात ताजा आहे. सौ लीना वहिनींची पहिली भेट तिथेच झाली आणि संतोषच्या मित्रांचे अनुभव त्यांना यायला सुरुवात झाली. संतोषच्या सासरकडच्या मंडळीच्या सागवानी लाकडाच्या व्यवसायाचा मलाही थोडा लाभ झाला हा त्याच्या प्रेमापोटी. किनवटकडे तेलुगु भाषेचा आणि दक्षिणात्य संस्कृतीचा काही प्रभाव दोन्ही कुटुंबामध्ये आढळतो. जेवणात ढीगभर भात घ्यायचा आणि कधी रस्सम, कधी सांबर कधी भाजी आणि शेवटी दही कालवून खायचं याच्याकडेच अनुभवलं. त्यामुळे वेळेवर जेवायला काही मित्र वाढले तर भातच वाढायचा हे एक सूत्र वहिनींनी लिलया अंगीकारले होते. आता वयाच्या प्रकृतीच्या आणि कॅलरीच्या मर्यादेनुरूप बदललेल्या खाद्य संस्कृतीला त्याची मजा यायची नाही.

संतोष आणि सौ लीना यांच्या संसार वेलीवर स्नेहल आणि आमोद ही दोन फुलं उमलली. ती सर्वांचीच झाली. उस्मानाबादला कार्यकारी अभियंता असताना आम्ही आनंदनगरमधील शासकीय कॉलनीत राहायचो. त्यांनी त्यावेळी एकमेकांची मुलं एकमेकांकडे सहज खेळायची. रमायची

दिवसभर. संध्याकाळी या दोघांना कोणाकडे तरी शोधणे हा उपक्रम करावा लागायचा संतोषला. अतुल कपोले, संतोष आणि मी एखाद्या संध्याकाळी जवळच्या केटीवेअरवर बसून गप्पा मारायचो. कधी हातलादेवीला पायी जायचो. संतोषकडे त्यावेळी दुष्काळातील तातडीचे उपाययोजना करण्याचे तेरवरून उस्मानाबादला पाणी आणणाऱ्या उपसा सिंचन योजनेचे काम होते. ते नेमके तेव्हाचे पाटबंधारे मंत्री नामदार पद्मसिंह पाटील यांच्या गावचे आणि प्रतिष्ठेचे काम होते. त्यासाठी त्यांनी दिवस-रात्र मेहनत करुन वेळेत काम पूर्ण केले. कामासाठी राबण्याची आणि मेहनत करण्यामध्ये झोकून देण्याची त्याच्यातली प्रवृत्ती क्वचितच आढळते. वेळप्रसंगी प्रकृती स्वास्थ्याकडे दुर्लक्ष करून तरी त्यामध्ये होणाऱ्या निर्मितीचा संतोष काही औरच आहे हे त्याला बघून जाणवते. ज्याने झोकून दिले त्यांनेच तो अनुभवला आहे. त्याचे श्रेय आपोआप चालून आल्याचे भासते.

कार्यकारी अभियंता म्हणून सुरुवातीच्या काळात यवतमाळला काही दिवस सोबत होतो. काही शासकीय कामानिमित्त मित्रमंडळींचे दौरे व्हायचे. त्यांचे कामकाज संपल्यावर मैत्रीची उजळणी व्हायची. संजय बेलसरे अकोला येथे कार्यरत असताना यवतमाळ आणि अकोलाच्या सीमेवर असलेल्या अडाण प्रकल्पाच्या विश्रामगृहालगत संजय आणि संतोष सोबत अनुभवलेली संगीत बैठकीची महफिल क्वचितच घडावी. ख्रिसमसला उस्मानाबादहून गोव्याला सहकुटुंब पहिली सहल केली ती संतोषच्या कुटुंबासोबत. कळंगुट बीचवरील हॉटेल गोवन हेरिटेजमधील वास्तव्य, समुद्रात पोहणे, बारीक-सारीक कुरकुरणे, नवीन वर्ष साजरा करणं अजूनही लक्षात आहे. भ्रमंती करणं, नवनवीन ठिकाणं बघणं, हिमालयातील गिरी भ्रमण करणं, विविध खाद्य संस्कृतीचा मनसोक्त आस्वाद घेणे हे आमचे समान आवडते विषय आहेत. हमता पास ला पंधरा वर्षे केलेले झेंडावंदन, भारत मातेचा जयजयकार आणि त्यानंतर गुदरलेला जीवघेणा प्रसंग आम्ही कसा हाताळला हे संजय

बेलसरे, संजीव टाटू आणि प्रमोद मांदाडे यांनाच माहिती आहे. संपूर्ण बॅचचे स्नेहमिलन तत्कालीन कोकणच्या राजाने संतोषने घडवून आणले. ती एक रम्य संध्याकाळ, सकाळचे स्कुबा ड्रायव्हिंग, काही डॉल्फिन सोबतचा सागरी प्रवास, ते अविस्मरणात जाणे अशक्य. भाऊच्या धक्क्यावरून स्पीड बोट ने प्रवास करणे आणि खार भूमीच्या कामांचे निरीक्षण करण्याचा कोकण भ्रमंतीचा आनंद घेण्याचे त्यांचे निमंत्रण माझ्या तत्कालीन व्यस्त त्यामुळे शक्य झाले नाही याची अजूनही खंत आहे.

कोकणचा मुख्य अभियंता असताना ताठ कण्याने, बाणेदारपणे कार्यान्वयन केले आणि ज्या दबावाखाली तो वाकला नाही तो संतोषच. त्यानंतर त्याला पाठीच्या मणक्याचा इतका त्रास झाला की त्याला सलग पाच मिनिटे चालता येत नव्हते. काही दिवस हॉस्पिटलमध्ये तर काही दिवस घरीच बेडरेस्ट घ्यावी लागली. त्यानंतर तो उभा राहिला आणि भूमिपुत्रांच्या जबाबदारीला सांभाळले. आज त्याच्याकडे बघून यावर विश्वास बसत नाही. हे त्यांने जिद्दीने मिळवले आहे. बदलीसाठी मी केव्हाही तयार आहे हे सांगायचा पण तडजोड करून बदलायला तयार नव्हता. वरिष्ठांच्या सुचनांचे अनुपालन करणे, हुकूमाची तामिल करणे आणि शासनाच्या धोरणानुसार कार्यान्वयन करणे यांची दिशा ठरलेली. त्यामुळे कधीकधी मनाविरुद्ध कार्यवाही केली असेलही आणि असंतुष्टही राहिला असेल. पण हे त्या त्या वेळी फक्त खाजगीत व्यक्त केले सगळ्याप्रमाणे. नाहीतर सर्वच गोष्टी कुठे मनासारख्या होतात.

कार्यकारी संचालक पदावर प्रदीर्घ काळ त्याने छत्रपती संभाजीनगर येथे काम केले. त्या कामाचा लेखाजोखा मांडणे अथवा विश्लेषण करणे म्हणजे एक अध्याय होईल जो त्यानेच लिहावा. सीडिओच्या मुख्य अभियंत्याच्या दृष्टीने ही मी त्याच्या कारकिर्दीच्या शेवटच्या टप्प्याचे थोडे अंतरावर आकलन केले आहे. प्रकल्पाच्या तांत्रिक बाबीत सखोल चर्चा करणे हे कार्यकारी

संचालनाचे काम नव्हे याची त्याला कल्पना होती. पण प्रकल्पाचे आराखडे तातडीने प्राप्त व्हावे यासाठी सतत पाठपुरावा करायचा. काय तांत्रिक अडचण असेल हे समजून घेण्यासाठी ती अडचण कोण सोडवू शकेल त्याची मदत घ्यायचा. संकल्पने मिळवण्यासाठी सीडीओकडे खूप विलंब होतो असा अपप्रचार केल्याचे मला कधी कधी मित्रांकडून कळायचे. इप्सित साध्य करण्यासाठी प्रसंगी वरिष्ठांकडून दबाव आणण्याचाही एखादवेळी अयशस्वी प्रयत्न करायचा. पण तांत्रिक बाबीवर तडजोड करण्याची सीडीओमध्ये संस्कृती नसल्याने जो किमान वेळ लागायचा त्यातही तो सर्वांना अस्वस्थ करायचा. शाखा अभियंतापासून मुख्य अभियंतापर्यंत संपूर्ण समूह एखाद्या प्रकल्पाच्या संकल्पनासाठी सीडीओला पाठवायचा. माझ्यासहित सगळ्यांकडून माहिती घेत राहायचा. मोबाईल त्याला सतत चिकटूनच राहायचा आणि सूचनांचे आदान-प्रदान सतत हे त्याच्याच महामंडळात घडले. माझ्या सीडीओच्या कार्यकाळात प्रकल्पासाठी त्याच्या इतका पाठपुरावा इतर कुठल्याही कार्यकारी संचालकाने केला नाही. त्यामुळे सर्वात जास्त संकल्पने त्याच्याच महामंडळाची दिली गेली होती.

दोन मोठ्या प्रकल्पांची तांत्रिक छाननी राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडे सुरू होती. त्याचा छाननी अहवाल मी महासंचालक म्हणून निवृत्त झाल्यावर आणि संजीव टाटू यांनी कार्यभार घेण्यापूर्वी अतिरिक्त कारभाराच्या काळात अचूक वेळ साधून शिताफीने काढून घेण्याचे कौशल्य त्याचेच. विकेटकीपर आणि स्लिपच्या गॅप मधून चौकार मारण्याच्या सचिन तेंडुलकरच्या कौशल्याची तुलना करावीशी वाटते.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळात कुठल्याही पदावर काम करणे इतर महामंडळाच्या तुलनेने जरा जास्त क्लिष्ट आहे. कार्यकारी संचालक पदावर जरा जास्तच किचकट आणि तारेची कसरत आहे. तरीही नेटाने काम करत राहायचे धैर्य संतोषने दाखवले याचे निश्चितच शत्रूंनीही

कौतुक करावे. कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याचे उच्च पातळी बंधाऱ्यात रूपांतरणाचे मार्केटिंग करण्याचे कौशल्य, पैनगंगा नदीवरील नवीन बॅरेजची उभारणी ब्रह्मगव्हाण सारख्या अत्यल्प पाण्यावरच्या योजनांचे कार्यान्वन, कुंभमेळ्याच्या कामांना दिशा देणे, कोकण गोदावरी संगमाचे रखडलेले काम सुरू करणे, मराठवाड्याला पाणी उपलब्ध करून देण्यासाठी डीव्हीजी व डीईजी सारख्या नदीजोड प्रकल्पांचा पाठपुरावा, माननीय पंतप्रधानांकडून निळवंडे प्रकल्पाचा जलपूजनाचा झालेला कार्यक्रम अशा अनेक उपलब्धी त्याच्या अशा काळात झाल्या. पूर्वी श्री कोहीरकर या भूमिपुत्राने देखील रचलेल्या सिंचन प्रकल्पाच्या पायाचा दुसरे भूमिपुत्र श्री तिरमनवार यांनी कळस चढवला. या दोन भूमिपुत्रांच्या कार्यकाळाला एकत्र बघितले तर या कालावधीत मराठवाड्यात सिंचन क्षेत्रात मोठे काम घडल्याचे दिसून येईल. यात संतोषचा वाटा निश्चितच मोठा आहे.

याच कार्यकालात त्याची मोठी मुलगी स्नेहल हिचे लग्न झाले तेही व्यायांच्या विनंतीनुसार हैदराबादला. संपूर्ण दक्षिणात्य संस्कृतीचा अफाट नमुना तेथे अनुभवायला मिळाला. अनेक लोकांना त्याने निमंत्रण दिले, एवढेच नाही तर तो ते कधी येणार, त्यांची राहण्याची आणि प्रवासाची काय व्यवस्था आहे, त्यांना मजा येते की नाही, राहून गेले आहे इत्यादी बारीक-सारीक तपशील स्वत: बघायचा. स्वभावानुसार अस्थिरता त्याला इथेही स्वस्त बसू देत नव्हती. सततचा पाठपुरावा. त्या लग्नात आशीर्वाद देण्यासाठी माननीय जलसंपदा मंत्री उपस्थित होते. आम्हीही होतो. त्याशिवाय सन २००० मध्ये स्नेहलला अंगाखांद्यावर खेळवणारा त्यांचा वाहन चालक श्री हुजूर हा देखील उपस्थित होता. सौ लीना वहिनी आणि अमोद यांच्यासह त्याने केलेले लग्नकार्याचे उत्कृष्ट व्यवस्थापन आढळले. वधूपिता असल्याने सर्वच रुसवे फुगवे यांनीच बघायचे. कन्यादानाच्या संवेदनशील प्रसंगाला धैर्याने सामोरा गेलेला संतोष मनाने किती हळवा आहे हे त्याच्या कुटुंबाला आणि काहीच

मित्रांना माहिती असेल. उच्च शिक्षणासाठी स्नेहल अमेरिकेत गेली तेव्हाही किती हळवा झाला होता तो. वडिलांच्या आपुलकीमुळे ती गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून मायदेशी परतली. हिला संतोषचाच गुण.

संतोष आता वयानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत आहे, मुक्त होत आहे. अस्थिर राहण्याच्या त्याच्या प्रवृत्तीतून मुक्त होईल असे वाटत नाही. प्रकृतीला जपण्याचे एक आव्हान त्याच्यासमोर आहे. आमोदचे करियर सुरू होत आहे. त्यालाही आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करण्याचे आव्हान समोर आहे. मित्र मंडळ आणि नातेवाईक सांभाळणे हेही आव्हानात्मक आहे. काही अज्ञात आव्हानेही त्याच्यासमोर असतीलच. नकारात्मकता जवळ येऊ न देणे आणि अस्थिर प्रवृत्ती सांभाळणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. पण अनुभवातून निपजलेले आपल्या प्रवृत्तीला हाताळण्याचे कौशल्य ही त्याच्यात आहे. शेवटी तो संतोष आहे. त्याच्या नावानुसार सर्वार्थाने त्याला आणि कुटुंबीयांना संतोष लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना करतो. मनापासून शुभेच्छा देतो.





मा. इंजि.रामचंद्र निटूरकर
से.नि. मुख्य अभियंता
जलसंपदा विभाग

उत्कृष्ट तांत्रिक क्षमता असणारा अभियंता

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक इंजि. संतोष तिरमनवार हे एक सुस्वभावी, अत्यंत मनमिळावू आणि लोकप्रिय अभियंता आहेत. त्यांची तांत्रिक क्षमता अतिशय उत्कृष्ट आहे. संतोष तिरमनवार यांनी माझ्यासोबत मी जेव्हा गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळामध्ये मुख्य अभियंता होतो त्या वेळेला ते बीड पाटबंधारे मंडळात परळी या ठिकाणी अधीक्षक अभियंता म्हणून कार्यरत होते. त्यावेळी त्यांनी उत्कृष्ट कार्य केलेले आहे. विशेष करून अप्पर कुंडलिका प्रकल्पाची कामे त्यांनी अतिशय चिकाटीने पूर्ण केली आहेत. या अप्पर कुंडलिका प्रकल्पामध्ये पुनर्वसनाच्या खूप अडचणी होत्या. विशेष करुन पुनर्वसनांच्या अडचणीमुळे प्रकल्पग्रस्त काम सुरु करु देत नव्हते. त्या प्रकल्पग्रस्तांच्या अडचणी गावकऱ्यांसोबत चर्चा करून, आपले कौशल्य

वापरून त्यांनी त्यावर तोडगा काढला. गावकऱ्यांची मने वळविण्यात त्यांना यश आले. पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागल्यामुळे प्रकल्पाचे अपुर्ण राहिलेले काम पूर्ण करता आले. त्यामुळे आम्ही अप्पर कुंडलिका प्रकल्पामध्ये पूर्ण क्षमतेने पाणी साठवू शकलो याचा मला खूप अभिमान आहे.

इंजि. संतोष तिरमनवार यांच्या बद्दल सांगायचे तर ते माणूस म्हणून देखील खूप चांगले व्यक्तिमत्व आहे. अगदी सर्वांना मदत करणारे, सर्वांना सोबत घेऊन जाणारे आणि सर्वांशी प्रेमळपणे वागणारे! अगदी कार्यालयातील शिपायापासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांशी त्यांचे अगदी स्नेहाचे संबंध आहेत. सद्या ते गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक आहेत. या ठिकाणी रुजू झाल्यानंतर देखील त्यांनी अतिशय महत्त्वपूर्ण कामे पूर्ण केली आहेत. मराठवाड्यातील वर्षानुवर्षे जे प्रकल्प अर्धवट राहिलेले आहेत, ते पूर्ण करण्यासाठी त्यांनी पूर्ण क्षमतेने प्रयत्न केले आहेत. त्यात त्यांना यश देखील आलेले आहे. त्यातल्या त्यात विशेष सांगायचे तर नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यात असणाऱ्या लेंडी प्रकल्पाचे उदाहरण देता येईल. हा प्रकल्प देखील गेल्या ४० वर्षापासून रखडलेला होता. पुनर्वसनाची कामे अपूर्ण होती. त्यामुळे ती पूर्ण केल्याशिवाय प्रकल्पग्रस्त काम करू देत नव्हते. अनेक अधिकाऱ्यांनी प्रयत्न करूनही ते काम पूर्ण झाले नव्हते. परंतु जेव्हा संतोष तिरमनवार हे कार्यकारी संचालक म्हणून आले, त्यावेळी त्यांनी शासन स्तरावरून या गोष्टीचा पाठपुरावा केला. त्यासाठी निधी आणणे एक महत्त्वाची बाब होती. त्या ठिकाणी त्यांनी आपले कौशल्य वापरून शासन स्तरावर प्रयत्न करून निधी आणला आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असणाऱ्या लेंडी प्रकल्पाची घळभरणी अगदी कमी वेळेत त्यांनी पूर्ण केली. हे मराठवाड्यासाठी फार मोठे योगदान आहे असे वाटते. या प्रकल्पामुळे नांदेड जिल्ह्यातील मुखेड

आणि देगलूर तालुक्यातील पिण्याच्या प्रश्न तर मिटणारच आहे. याशिवाय जवळपास २६००० हेक्टर इतके मोठे क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. मराठवाड्याच्या दृष्टीने ही बाब फार महत्वाची आहे. आपल्या कारकिर्दीत त्यांनी अशा अनेक बंद पडलेल्या प्रकल्पांची कामे त्यांनी स्वत: पुढाकार घेऊन पुर्णत्वास नेली आहेत. त्यामुळे जनतेच्या मनातील ते उत्कृष्ट अभियंता आहेत.

मराठवाड्यातील या आधीदेखील अर्धवट अवस्थेत राहिलेले अनेक प्रकल्प त्यांनी मार्गी लावून पुर्ण केले आहेत. उदाहणार्थ निम्न मानार. सेवेच्या अंतिम टप्प्यात त्यांना पुन्हा मराठवाड्यात काम करण्याची संधी मिळाली. त्यात त्यांनी रखडलेले प्रकल्प पुर्ण केले. त्यामुळे मराठवाड्याच्या विकासात त्यांचे मोलाचे योगदान आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. येत्या एप्रिल महिन्यात ते आपल्या प्रदीर्घ शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत. श्री तिरमनवार यांना आणि त्यांच्या संपुर्ण कुटुंबीयांना मी मन:पूर्वक शुभेच्छा देतो.



इंजि. तिरमनवार यांच्या कारकिर्दीत झालेला मांजरा नदीवरील धनेगाव बॅरेज



मा.डॉ.इंजि. विजय घोगरे
से.नि. मुख्य अभियंता,
जलसंपदा विभाग, महाराष्ट्र

चांगला सहकारी मित्र

३० एप्रिल २०२६ रोजी अत्यंत चांगल्या प्रकारे शासकीय सेवेत योगदान देऊन गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक तथा माझे सहकारी मित्र इंजि. संतोष तिरमनवार साहेब सेवानिवृत्त होत आहेत. अतिशय प्रेमळ व सहकारी मित्र म्हणून त्यांची ओळख आहे. आपल्या कार्यकाळात त्यांनी जलसंपदा विभागात मोलाचे कार्य केले आहे. एक प्रयोगशील, नव्या संकल्पना प्रत्यक्षात अस्तित्वात आणणारे व सहकाऱ्यांना प्रोत्साहित करणारे व्यक्तिमत्व म्हणजे तिरमनवार साहेब आहेत.

मराठवाड्यात असणाऱ्या नांदेड जिल्ह्यातील किनवट हे त्यांचे गाव. तिरमनवार साहेब सन १९९२ ला एमपीएससी उत्तीर्ण झाले. सन १९९४ मध्ये ते शासकीय सेवेत आले. महाराष्ट्र अभियांत्रिकी शासकीय प्रबोधिनी, नाशिक येथून शासकीय सेवेला सुरुवात केली. मी १९९३ ला एमपीएससीत महाराष्ट्रात पहिला आलो होतो. सन १९९५ ला जलसंपदा विभागात रुजू झालो. आम्हा दोघात शासकीय सेवेत एक वर्षाचे अंतर आहे. प्रशासकीय

सेवेच्या कालखंडात त्यांच्याशी सतत संबंध येत राहिला. एक चांगला सहकारी मित्र म्हणून माझ्या जीवनात त्यांचे स्थान निर्माण झाले आहे. त्याचा आनंद आहे.

सन २०१३ ला आम्हाला दोघांनाही एकाच दिवशी अधीक्षक अभियंता म्हणून पदोन्नती मिळाली. त्यावेळी तिरमनवार साहेबांनी मराठवाडा विभाग घेतला. त्यामुळे मला पुणे विभाग मिळाला. माझ्या परिसरात मला काम करता आले. साहेबांनी मराठवाड्यात अतिशय चांगले काम केले.

मराठवाड्याचा रखडलेला कृष्णा मराठवाडा प्रकल्प पूर्ण करण्याचे श्रेय तिरमनवार साहेबांना जाते. या प्रकल्पाला त्यांच्या काळात अंतिम स्वरूप मिळाले.

श्री तिरमनवार साहेबांनी अत्यंत धडाडीने मराठवाड्यासारख्या अवर्षणग्रस्त भागात १७ धरणे पूर्ण केली. त्यामुळे शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला. मराठवाड्याला सिंचनाच्या संदर्भात समृद्ध करण्यामध्ये तिरमनवार साहेबांचा महत्त्वाचा वाटा राहिलेला आहे.

नांदेड जिल्ह्यातील लेंडी प्रकल्प हा चाळीस वर्षापासून रखडलेला होता. तिरमनवार साहेबांनी यात लक्ष घालून दीर्घकाळ रखडलेला हा प्रकल्प पूर्णत्वास नेला. जून २०२५ मध्ये लेंडी धरणाची घळभरणी केली. लेंडी प्रकल्पात त्यांच्यासोबत मलाही काम करता आले. साहेबांना मराठवाड्याबद्दल पूर्ण आस्था तर आहेच शिवाय चांगली माहिती असून हा प्रदेश समृद्ध करण्यासाठी त्यांनी आपले कौशल्य वापरले आहे. मराठवाड्यातील अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांना पूर्णत्वाला नेले. हे त्यांचे योगदान महाराष्ट्राला विसरता येणार नाही.

ऑगस्ट २०२१ मध्ये मी मुख्य अभियंता म्हणून छत्रपती संभाजी नगरला बदलून आलो. या काळात तिरमनवार साहेबांसोबत काम करण्याचा योग आला. गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक

म्हणून त्यांची कारकीर्द जवळून बघता आली. सोबत काम करता आले, ही माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे.

आम्ही एकत्रितपणे कुटुंबासह सिक्कीम व दार्जिलिंग येथील सहल केली. तसेच कोजागिरी पौर्णिमेला रात्रीच्या वेळी कात्रज ते सिंहगड ट्रेक एकत्र पूर्ण केला. अतिशय उत्साहाने त्यांनी आमच्याबरोबर सहभाग दिला.

सेवापुर्तीनंतर त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो व पुढील आयुष्य आनंदात जावो, अशी सदिच्छा देतो.



मा.इंजि. प्रकाश मिसाळ
मुख्य अभियंता,जलसंपदा विभाग
नाशिक

आधुनिक भगिरथ

आदरणीय श्री संतोष तिरमनवार साहेब, आपण दिनांक ३० एप्रिल २०२६ रोजी जलसंपदा विभागातील ३३ वर्षांच्या प्रदीर्घ, यशस्वी आणि प्रेरणादायी सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहात! हा आपल्या जीवनातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या निमित्ताने मनःपूर्वक अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा!

कार्यकारी अभियंता ते कार्यकारी संचालक असा आपला शानदार शासकीय सेवेतील प्रवास विविध सिंचन प्रकल्पातून लाखो शेतकरी व लाभधारकांचे जीवन समृद्ध करण्याचे मोठे कार्य करणारा राहिला आहे. नि:स्वार्थ सेवाभाव, कामाप्रतीची अटल निष्ठा, कुशाग्र बुद्धिमत्ता आणि दूरदृष्टी यांच्या जोरावर आपण अनेक आव्हानात्मक परिस्थितीवर मात करत आपल्या कार्याचा कायमस्वरूपी ठसा उमटवला आहे. आपल्या नेतृत्वाखाली उभ्या राहिलेल्या प्रकल्पांनी केवळ पाण्याची उपलब्धता वाढली नाही तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवे आयाम दिले गेले आहेत.

मला सन २००८ पासून विविध टप्प्यांवर आपल्या सोबत काम

करण्याची संधी मिळाली. ही माझ्यासाठी खरोखर भाग्याची गोष्ट आहे. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ पुणे, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ठाणे तसेच गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर येथे आपल्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प व्यवस्थापनातील विविध पैलू जसे की भूसंपादन, पुनर्वसन, संकल्पन, बांधकाम व देखभाल दुरुस्ती यांचा सखोल अनुभव मिळाला.

देहर्जी प्रकल्प, निळवंडे प्रकल्प, नदीजोड प्रकल्पाचे विविध प्रस्ताव तसेच वैतरणा मुकणे वळण योजना यासारख्या महत्त्वपूर्ण कामांमध्ये आपले मार्गदर्शन खरोखर अमूल्य ठरले आहे, कामावरील आपली घट्ट पकड, सहकाऱ्यांबद्दलची नेहमी सहानुभूती आणि प्रभावी नेतृत्व गुण यामुळे आपण सर्वांसाठी खरी प्रेरणा ठरलात. मी आणि माझे सहकारी नेहमीच आपल्या निर्णय क्षमतेचे व सकारात्मक दृष्टिकोनाचे कौतुक करतो.

खऱ्या अर्थाने आधुनिक भगीरथ म्हणून जलसंपदा क्षेत्रातील आपले योगदान जे पाण्याच्या संरक्षणापासून ते शाश्वत विकासापर्यंत पोहोचते, सदैव स्मरणात राहील. आपण बॉस पेक्षा मित्र, मार्गदर्शक आणि प्रेरणास्त्रोत म्हणून अधिक जवळचे वाटतात. आपल्यासोबत घालवलेले चर्चेचे, समस्या सोडवण्याचे आणि यश साजरे करण्याचे क्षण माझ्या स्मृतीपटलावर कायमचे कोरले गेले आहेत.

आता वैयक्तिक व कौटुंबिक जबाबदाऱ्यातून मुक्त झालेल्या आपल्या आयुष्याच्या पुढील इनिंगमध्ये स्वतःसाठी सहचारिणीसाठी कुटुंबीयांसमवेत अधिक वेळ देऊन प्रवास, छंद, सामाजिक कार्य किंवा नवीन आव्हाने स्वीकारून आनंदाचे व समाधानाचे क्षण अनुभवा ही मनःपूर्वक शुभेच्छा! तसेच आपल्या अनुभवाचा लाभ घेऊन क्षेत्रातील युवा पिढीला मार्गदर्शन करत राहाल अशी अपेक्षा आहे.

आपल्या पुढील आयुष्यातील नवीन पर्वासाठी मी माझ्या कुटुंबियांकडून हार्दिक शुभेच्छा! उत्तम आरोग्य, अत्यंत आनंद व पूर्ण समाधान लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

आपला स्नेहांकित

प्रकाश मिसाळ व कुटुंबीय

आधुनिक भगीरथ संतोष तिरमनवार
नद्या जोडून पाणी साठवून केले शेतकऱ्यांचे जीवन हिरवेगार
निष्ठेच्या ओघाने वाहता राहिला प्रवास फार
सेवेच्या अमृताने भरली प्रत्येक धार
नव्या पर्वात आनंद घ्या तोच राहील जेवणाचा सुंदर सार



मा.इंजि. प्रसाद नार्वेकर
सहसचिव तथा मुख्य अभियंता
जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

पुढाकार घेऊन काम करणारा अभियंता

मी छत्रपती संभाजीनगर येथे म्हणजे पुर्वीचे औरंगाबाद येथे सहायक कार्यकारी अभियंता असताना इंजि.श्री इंगोले यांच्या घरामध्ये भाड्याने रहात होतो. श्री इंगोले यांचे जावई इंजि.देवगडे हे तात्कालिन उस्मानाबाद जिल्ह्यात कार्यकारी अभियंता होते आणि त्यांच्यासोबतच कार्यकारी अभियंता म्हणून संतोष तिरमनवार साहेब कार्यरत होते. ते दोघे बॅचमेंट असल्याने छत्रपती संभाजीनगरला आले की श्री इंगोले यांच्या घरी येत असत. त्यावेळी तिरमनवारसाहेब आणि माझी ओळख झाली.

पुढे जेव्हा माझी पदोन्नती झाली आणि मी कार्यकारी अभियंता झालो, त्यावेळी माझी बदली नांदेड येथे मध्यम प्रकल्प विभाग नांदेड येथे झाली. मी ज्या इंजि. मुदीराज यांच्याकडून कार्यकारी अभियंता पदाचा


पदभार स्वीकारला त्यांच्या आधी तो पदभार श्री तिरमनवार यांच्याकडे होता आणि त्यानंतरदेखील तिथेच दुसऱ्या विभागात कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होते. त्यावेळी इंजि. घोटेसाहेब आमचे अधीक्षक अभियंता होते. ते नेहमी काहीतरी नाविन्यपूर्ण उपक्रम राबवित असत. त्यांनी नांदेड मंडळात कालवे स्वच्छता अभियानाचा प्रयोग सुरु केला होता. त्यावेळी स्वत: पुढाकार घेऊन काम करणारे अभियंता म्हणजे इंजि. तिरमनवार होत. इंजि. तिरमनवार यांनी त्यावेळी अतिशय उत्साहाने कालवे स्वच्छतेच्या कामाला सुरुवात केली. विशेष म्हणजे हे काम त्यांनी कोणत्याही ठेकेदाराला न देता शासनाच्या यांत्रिकी विभागामार्फत केले. त्यांच्या कामाचा आवाका आणि गती दांडगी होती. कमी वेळात त्यांनी कालवा स्वच्छतेची कामे अतिशय उत्तम रितीने पुर्ण केल्यामुळे तो एक पायलट प्रोजेक्ट ठरला. पुढे शासनाने धोरण म्हणून कालवा स्वच्छतेची कामे यांत्रिकी विभागामार्फत करण्यासाठी एक अभियानच सुरु केले. इंजि. घोटेसाहेबांची कालवे स्वच्छतेची संकल्पना तिरमनवार यांनी उचलून धरली आणि राज्यातील एक पायलट प्रोजेक्ट ठरली.

त्याचप्रमाणे निम्न मानार प्रकल्पाचे कामही काही अडचणींमुळे रखडले होते. जुन्या सांडव्यावर गेट नव्हते. परंतु जेव्हा या प्रकल्पाचा पाणीसाठा वाढविण्याचे ठरले, त्यावेळी तेथे गोडबोले पध्दतीचे गेट बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. हा प्रकल्प मार्गी लावत असताना अनेक अडचणी असतानाही तिरमनवार यांच्या जिद्दीने हा प्रकल्प मार्गी लागला. त्यांच्या कार्य पध्दतीचे हेच वैशिष्ट्य आहे की त्यांनी अनेकदा आव्हानात्मक कामे स्वीकारली आणि नेटाने पुर्णत्वासदेखील नेली. त्यांची कामाची आवड, निष्ठा आणि स्वत: पुढाकार घेऊन काम करण्याची वृत्ती यामुळे त्यांनी मराठवाड्यातील अनेक रखडलेले प्रकल्प मार्गी लावले तर काही पुर्ण केले.

निम्न मानारप्रमाणेच निम्न दुधना हा प्रकल्पदेखील अनेक वर्षापासून

रखडला होता. तेथील पुनर्वसनाचा प्रश्न रखडल्यामुळे लोक काम करु देत नव्हते. परंतु तिरमनवार यांनी तेथील अडचणी सोडवून पोलीस बंदोबस्तात काम सुरु केले आणि संपविलेदेखील. अगदी अलिकडे ते गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक झाल्यानंतर त्यांचे ध्येय तेच होते की मराठवाड्यातील जे वर्षानुवर्षे रखडलेले प्रकल्प आहेत त्यातील समस्या सोडवून ते मार्गी लावणे. त्यापैकी एक मोठा प्रकल्प म्हणजे लेंडी प्रकल्प होय. या ठिकाणीदेखील प्रकल्पग्रस्तांच्या वाढीव मावेजाचा प्रश्न सोडवून आणि निधीची उपलब्धता करुन तो मराठवाड्याच्यादृष्टीने विशेष करुन मुखेड- देगलूर सारख्या दुष्काळी भागाच्या जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावला आहे. आव्हानात्मक कामे स्वीकारुन ती मार्गी लावणे हा त्यांचा स्थायीभावच आहे. त्यामुळे अनेक विविध कारणांनी रखडलेले प्रकल्प त्यांच्या कार्यकाळात पुर्ण झाले आहेत.

जवळपास ३२ वर्षे शासनामध्ये सेवा केल्यानंतर ते आता सेवानिवृत्त होत आहेत. या पुढील आयुष्य त्यांना सुखाचे, समाधानाचे आणि आरोग्यदायी जावो या मन:पूर्वक शुभेच्छा!



मा.इंजि. समाधान सब्बीनवार
मुख्य अभियंता, गुणनियंत्रण
सिंचनभवन, पुणे

अष्टपैलू अभियंता

आदरणीय इंजि. संतोष तिरमनवार सर माझ्या म्हणजे नांदेड जिल्ह्यातील मूळ रहिवासी आहेत. त्यामुळे मी नोकरीत रुजू झाल्यापासून त्यांच्याविषयी जिव्हाळ्याची व आदराची भावना माझ्या मनात आहे. मी नोकरीच्या निमित्ताने कुठेही असलो तरी त्यांच्या कामाची किर्ती माझ्यापर्यंत येत होती. तिरमनवार सर यांनी जलसंपदा विभागाच्या सर्वच शाखांमध्ये म्हणजे बांधकाम, सिंचन व्यवस्थापन, सर्वेक्षण, संकल्पन, गुण नियंत्रण, मंत्रालय, या ठिकाणी काम केले असल्याने त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व घडत गेले. त्यामुळे त्यांच्या विचारात आणि निर्णयात प्रत्येक ठिकाणी अचुकता, नेमकेपणा, कायदेशीर चौकटीत काम आणि प्रॅक्टिकलपणा हे गुण दिसून येतात. त्यामुळेच त्यांना अगदी योग्य असे सर्वोच्च पद कार्यकारी संचालक गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विभाग या पदावर त्यांची पदोन्नती झाली

आहे. त्या ठिकाणी त्यांच्या कामाचा ठसा त्यांनी उमटवला आहे. त्यांच्या या कार्यकाळातच त्याच्या मार्गदर्शनाखाली मलाही काम करण्याची संधी मिळाली याचा मला आनंद आहे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विभागाचे अधिनस्त लाभक्षेत्र विकास प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर येथे अधीक्षक अभियंता (प्र.) म्हणून काम करताना साहेबांशी अनेक वेळा महत्त्वाचे बैठकीत चर्चा व निर्णय झाले. तसेच खुद्द महामंडळातील अधीक्षक अभियंताचे पद रिक्त असल्याने सुमारे दीड वर्ष अतिरिक्त कारभार माझ्याकडे असताना प्रत्यक्ष कार्यालयातील काम करण्याची संधी मला मिळाली. मा.तिरमनवार साहेबांची आकलन शक्ती व काम करण्याची क्षमता अफाट आहे. एखाद्या धारिकेतील प्रकरण कितीही किचकट असले तरी एका नजरेत संपूर्ण प्रकरणाचा त्यांचा अभ्यास व्हायचा.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यालय छत्रपती संभाजीनगर शहराच्या मध्यवर्ती भागात व जालना रोडवर असल्याने कार्यालयात नेहमीच कार्यकर्ते, राजकीय नेते, कंत्राटदार, शेतकरी यांचे मोठ्या प्रमाणात ये-जा असायची. मा. साहेब सर्वांना भेटत असत. सर्वांना वेळ देत असत. संपूर्ण वेळ कार्यालयात उपलब्ध असल्याने अनेकांची कामे वेळेवर होत होती. वर उल्लेख केल्याप्रमाणे त्यांनी सर्व विभागात सर्वच ठिकाणी काम केले असल्याने जनतेच्या हिताचा, शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय कसा घेता येईल याच्याकडे त्यांचा कल अधिक असायचा. त्यांची स्मरणशक्ती अफाट असल्याने सर्व गोष्टी, ठोकताळे त्यांच्या बुध्दीमध्ये फिट असायचे.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळात अनेक लहान मोठ्या प्रकल्पाची कामे चालू आहेत. त्या प्रत्येक प्रकल्पाची मंजुर सुप्रमा किंमत, यावर्षीची अर्थसंकल्पीय तरतूद, झालेला खर्च व आता लागणारा निधी हे सर्वकाही त्यांच्या तोंडपाठ असते. त्यामुळे मंत्रालयात अचूक चर्चा झाल्यानंतर निधी मिळणे सोपे होत गेले. छत्रपती संभाजीनगर सन २०२३

मध्ये येथे झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजूर झालेल्या सोळा प्रकल्पांच्या विक्रमी सुप्रमा हा तर गोदावरी महामंडळाच्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिला गेलेला इतिहास असून एक टर्निंग पॉईंट असल्यामुळे नाशिक व मराठवाड्यातील अनेक बंद पडलेले प्रकल्प मार्गी लागले आहेत.

माझ्या अधिनस्त असलेल्या जायकवाडी प्रकल्पासाठी व मराठवाड्यातील सर्वच प्रकल्पासाठी सप्टेंबर २०२५ मधील शेवटचा आठवडा हा परीक्षेचा काळ ठरला. कारण या आठवड्यात मराठवाड्यात खूप मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली. अनेक ठिकाणी ढगफुटी झाली. त्यामुळे कोणत्या प्रकल्पात किती पाणी येईल याचा काहीच भरोसा सांगता येत नव्हता. सर्व धरणे शंभर टक्के भरली होती. तरी देखील पाऊस थांबायचे नाव घेईना. याच काळात जायकवाडीत पाण्याची मोठी आवक सुरू झाली. वरुन येणाऱ्या पाण्याचा अंदाज घेत, धरणाची पाणी पातळी ९५ टक्के पर्यंत कमी केली पण अतिवृष्टी आणि ढगफुटी यामुळे मोठ्या प्रमाणावर आवक सुरूच राहिली. अशा कठीण परिस्थितीमध्ये कार्यकारी संचालक तिरमनवार साहेब दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळपासून धरणावर आले. मराठवाड्यातील गोदावरीला मिळणाऱ्या सर्वच नद्यांची पातळी वाढत होती. निम्न दुधना, पूर्णा प्रकल्प, माजलगाव प्रकल्प व जायकवाडी यांचे एकात्मिक पद्धतीने पूर्ण नियंत्रण करण्यासाठी साहेबांनी कौशल्य पणाला लावून पूर पूरस्थिती नियंत्रणात आणली. यासोबतच तेलंगणाच्या अधिकाऱ्यांशी सतत संपर्कात राहून पोचमपाड येथील धरणाची पाणी पातळी कमी करायला लावली. नांदेड शहराचा पुराच्या पाण्यापासून बचाव करण्यात साहेब यशस्वी झाले. या दिवशी जायकवाडी प्रकल्प प्रकल्पात प्रत्यक्षात तीन लाख ६० हजार क्युसेस एवढा प्रवाह येत असताना प्रकल्पातून तीन लाख ६ हजार पर्यंत मर्यादित करून अनेक शहरांना पूर परिस्थितीपासून वाचवले. त्या पुराच्या दिवशी धरणाची जबाबदारी कनिष्ठांवर न सोडता साहेब स्वतः रात्री दोन

वाजेपर्यंत धरणावर थांबून पूर परिस्थिती नियंत्रणात आल्यावरच छत्रपती संभाजीनगरला गेले. प्रत्येक अभियंत्यांना असे अनेक अनुभव आहेत.

ज्या पद्धतीने तिरमनवार सरांनी पुराचे नियोजन केले त्यापेक्षाही चांगले काम दुष्काळी परिस्थितीत जायकवाडीसाठी पाणी उपलब्ध करून देऊन सन २०२४ मध्ये केले. त्यावेळी अत्यल्प पाऊस पडला. त्यामुळे जायकवाडीत केवळ ४७ टक्के पाणीसाठा झाला होता. गोदावरी स्टडी ग्रुपचा अहवाल व जनहित याचिका जनतेच्या पीआयएल–१७३ च्या निकालानुसार जायकवाडीच्या उर्ध्व भागातील धरणातून पाणी सोडण्याचे आदेश व संपूर्ण अंमलबजावणी करण्याची जबाबदारी कार्यकारी संचालक म्हणून साहेबांवर होती. पाणी सोडण्यास उर्ध्व भागातील जनतेचा प्रचंड विरोध तर मराठवाड्यातील जनतेची तितकीच प्रचंड आग्रही मागणी होती. पाणी तातडीने सोडण्यासाठी विविध आंदोलने, रस्ता रोको इत्यादी झाले. त्यातच उर्ध्व भागातील जनतेने न्यायालयात धाव घेऊन पाणी थांबवण्याच्या कार्यकारी संचालकाच्या आदेशाला स्थगिती देण्याची मागणी केली. त्यावेळी मी महामंडळात अधीक्षक अभियंता व जायकवाडीशी संबंधित अधीक्षक अभियंता असल्याने यातील अनेक बारकावे मला माहित होते. यातील अनेक घटना या ठिकाणी लिहिणे शक्य नाही, परंतु या दोन महिन्यांमध्ये साहेब खूप तणावाखाली दिसून आले. पण शेवटी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय व प्रशासनाचा निर्णय होऊन तिरमनवार साहेबांच्या कुशल नेतृत्वाखाली जायकवाडीला पाणी सोडण्याची प्रक्रिया सुरळीत पार पडली. त्यातून जालना छत्रपती संभाजीनगर, बीड, परभणी या जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांना त्याचा फायदा झाला.

मा.तिरमनवार साहेबांचा सिंचन व्यवस्थापनाचा अनुभव दांडगा आहे. व्यवस्थापनातील महत्त्वाचा पण दुर्लक्षित भाग म्हणजे कालव्यांची

देखभाल दुरुस्ती, गाळ काढणे, गवत काढणे यामध्ये सर्व अधिकारी त्रस्त असतात. पण मराठवाड्यात स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने कालव्यातील



गाळ व गवत काढून महाराष्ट्रासमोर त्यांनी आदर्श निर्माण केला आहे. या कामात नाम, सिद्धीविनायक, मानव लोक यासारख्या स्वयंसेवी संस्थांची मदत घेऊन शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी पोहोचवले. शिवाय महामंडळाची कोट्यवधी रुपयांची बचत देखील केली. अशा प्रकारे तिरमनवार साहेब अतिशय क्रियाशील आणि कर्तृत्ववान नेतृत्व करणारे अभियंता आहेत. त्यांना सेवानिवृत्तीच्या निमित्ताने खूप खूप शुभेच्छा! त्यांना दीर्घायुष्य लाभो ही ईश्वरचरणी प्रार्थना.



मा.सौ. लीना संतोष तिरमनवार
धर्मपत्नी/सहचारिणी

हेच सौभाग्य मम भाग्याला

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक माननीय संतोष तिरमनवार साहेब हे जगाच्या दृष्टिकोनातून साहेब आहेत संयमी, शांत, प्रसंगी शिस्तप्रिय आणि मनमिळावू. परंतु माझ्यासाठी ते प्रेम, आत्मविश्वास, विश्वास आणि अखंड प्रेरणेचा स्त्रोत आहेत. माझ्या आयुष्याचा आधारस्तंभ आहेत. कारण ते माझे पती आहेत. खरे तर पती आणि पत्नीमध्ये प्रेमाचा धागा इतका घट्ट विणलेला असतो की तो कधी उलगडून दाखवावा लागत नाही, म्हणजे हे प्रेम शब्दातून कधी व्यक्त करावे लागत नाही. ते नजरेतून आणि प्रत्येक कृतीतून व्यक्त होत असते. परंतु आज त्यांच्या शासकीय सेवानिवृत्तीनिमित्त प्रकाशित होणाऱ्या गौरव ग्रंथाच्या निमित्ताने मी ते शब्दात व्यक्त करीत आहे.

आमचे लग्न सन १९९४ मध्ये झाले. आमचे पूर्वीचे नातेसंबंध असल्यामुळे अर्थातच लग्न अरेंज मॅरेज आहे. साहेबांची मावशी ही माझी काकू आहे. त्यामुळे दोन्हीकडचे लोक एकमेकांना आधीपासूनच ओळखत होते. आमचे लग्न आमच्या काकांनी जमविले. लग्नानंतर लक्षात आले की

साहेबांचा स्वभाव सरळ, साधा, भाबडा, प्रेमळ आणि हळवा आहे. त्यामुळे आम्हाला एकमेकांशी एकरूप व्हायला फार वेळ लागला नाही. आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये पती हेच पत्नीचे सर्वस्व असल्याने जिथे जिथे पती जाईल तिथे तिथे मी आनंदाने गेले. त्यांच्या सुखात आणि दुःखात माझे सौख्य मांनले. वास्तविक साहेब एक चांगला पती आहेत असे नव्हे तर प्रत्येक नाते ते तितक्याच अंत:करणापूर्वक निभावत असतात. ते एक आदर्श पिता आहेत, ते एक आज्ञाधारक मुलगा आहेत आणि कर्तव्यनिष्ठ अधिकारी आहेत. आपल्या प्रत्येक कर्तव्यात ते कुठेही कमी पडत नाहीत. त्यामुळे मी त्यांची पत्नी आहे याचा मला सार्थ अभिमान आहे.

जया अंगी मोठेपण
तया यातना कठीण

असे संत तुकाराम महाराजांनी म्हटले म्हटले आहे. चांगल्या माणसांना त्रास हा होतच असतो. परंतु त्या त्रासाचा बाऊ त्यांनी कधीच केला नाही.

कार्यालयातील ताण तणाव त्यांनी घरापर्यंत कधीही येऊ दिला नाही. ते घरी आले की ते मुलांचे प्रेमळ बाबा आणि आई-वडिलांचा मुलगा राहायचे. मुलांना शिस्तीच्या नावाखाली कधीही दबावात ठेवले नाही. त्यांना स्वच्छंदी जीवन जगण्यासाठी मोकळीक दिली होती. अर्थात मुलांनीही त्याचा कधी गैरफायदा घेतला नाही. मुलांवर संस्कार करायचे म्हणजे हातात छडी घेऊन वागायचे नसते तर मुले ही अनुकरणीय असतात. ते आपल्या आई-वडिलांच्या वागण्या - बोलण्यातून त्यांचे अनुकरण करतात आणि संस्कारी बनतात. आमच्या मुलांचे बाबा हेच त्यांचे आदर्श आहेत. कारण ते कधीच कोणाचा द्वेष करीत नाहीत, कधी कोणावर रागावत नाहीत, कधी कोणावर चुकून रागावलेच तर त्याचा राग अगदी तात्पुरत्या स्वरूपाचा असतो, ज्याच्यावर रागावले ती व्यक्ती काही वेळानंतर त्यांच्याकडे गेली तर साहेब त्याच्याशी अशा पद्धतीने वागतात जसे काही घडलेच नाही.

साहेबांना कोणी त्रास दिला असेल आणि ती व्यक्ती पुन्हा त्यांच्याकडे काही कामानिमित्त आली तर साहेब पूर्वग्रह दूषितपणे कधीच वागत नाहीत. हेच त्यांचे गुण मुलांनी संस्कार म्हणून घेतले आहेत. त्यांचा मनाचा मोठेपणा हाच खरा माझा दागिना आहे.

दिनांक २३ एप्रिल १९९४ ते ३० एप्रिल २०२६ या गेल्या ३२ वर्षात आमच्या सहजीवनात कटुतेचा कधी लवलेशही नाही. पती-पत्नीमध्ये छोटे मोठे रुसवे फुगवे होतच असतात, पण त्याला कटूता म्हणत नाहीत तर ते संसारातील मीठ मानले जाते. ते तुटेपर्यंत कधीच ताणले जात नाहीत. साहेबांचा स्वभाव प्रेमळ असल्यामुळे कटूतेला थाराच मिळाला नाही. साहेबांनी आयुष्यभर स्वतःच्या संसारा बरोबरच शासनाचाही संसार केला. कामात शासनाच्या पैशाची काटकसर करणे, शासनाचा पर्यायाने जनतेचा लाभ होईल अशा योजना मार्गी लावणे यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. हे करत असताना त्यांनी कुटुंबाकडे कधी दुर्लक्ष होऊ दिले नाही. पती,-पिता आणि मुलगा अशी सगळी कर्तव्ये त्यांनी पार पडली आहेत. ते अतिशय मित्रप्रेमी आहेत. त्यांचे खूप मित्र आहेत व ते मैत्री जपतात. शासकीय सेवेतील व्यस्त कारभारामुळे त्यांना हवा तसा वेळ देता आला नाही. त्यामुळे साहेबांना माझे हेच सांगणे आहे की तुम्ही आता सेवानिवृत्तीनंतर स्वच्छंदीपणे जगा, नातेवाईकांना- मित्रांना वेळ द्या, मनासारखं जगा आणि स्वतःच्या आरोग्याकडेही लक्ष द्या. शेवटी **हेल्थ इज वेल्थ.** साहेब ३० एप्रिल नंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांना सतत कामात मग्न राहायची सवय आहे पण मला खात्री आहे की ते सेवानिवृत्तीनंतरही स्वस्थ बसणार नाहीत. आपल्या ज्ञानाचा उपयोग इतरांना व्हावा यासाठी सतत प्रयत्नशील राहतील. त्यांच्या सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य सुखाचे जावे यासाठी मी तर सोबत आहेच परंतु त्यांचे जीवन निरामय आरोग्यदायी व्हावे ही परमेश्वर चरणी प्रार्थना!



MRS. SNEHAL PRASHANT
Daughter

There are people who shape you quietly, not through grand gestures or loud declarations, but through the steady, tireless warmth of their presence. My father is one such person. He is, without question, the most important figure in my life.

For nearly three decades, he gave himself wholly and without hesitation to the service of Maharashtra. He began this journey before the age of thirty, carrying the weight of public responsibility on shoulders that never seemed to buckle. Those who worked alongside him will know the depth of his dedication; spend an entire career devoted to service of the people. I am so proud of him.

But what strikes me most is not the office he held, or the decisions that rested on his desk. What strikes me is who he was when he came home.

He is never the big officer at home. He is just Pappa — always loving, present for us. Whatever burdens he carried as a man in such a position, he left them at the door. We, his children, never heard him speak of hardship. We never knew, growing up, how much he quietly sacrificed so that we could live fully and dream freely. He bore it all with a grace I now understand was an act of extraordinary love, the kind that asks for nothing in return.

He was there for us in every sense of the word. Emotionally, unconditionally, always. Never authoritative, never distant, always our father first. That is rare. And I know it now, perhaps more than I did then.

"There is one moment I carry with me always. The first time I came home from the United States, after a year away, in the middle of my master's, he got emotional when he saw me. Tears in his eyes, a trembling he tried to hide. In that single moment, I understood what it had cost him to let me go. How deeply he must have missed me. How big his heart was, to let me fly anyway."

That is the truest measure of a father, not that he holds you close, but that he trusts you enough to let you go, even when it breaks his heart a little. He encouraged me to pursue higher studies, to become independent, to build a life I could call entirely my own. Without his belief in me, I would not be the person I am today. That is not a small thing. That is everything!

From him, I have learned the values I hold most dear: take responsibility, give your whole self to whatever you do, work hard enough to need no one's mercy, and never — no matter how far you rise — let go of the hands that walk beside you. Walk with your family. Always be there for your own. He lived every one of these lessons before he taught them to me. That is the kind of man he is.

And now, at 58, as he steps into this next chapter, I want to say this to him gently but firmly — it is time to rest. Not because his energy has dimmed, but because he has earned every moment of peace that comes now. He poured so much of himself into his work, often at the cost of his own health and rest, that we, his family, owe it to him to insist: slow down. Breathe. Let us take care of you for once.

I want him to travel, to see the places he always meant to

see. I want him to spend long, unhurried mornings with Mummy, the kind of time that duties and deadlines always interrupted. I want him to know the quiet joy of having nowhere to be and no file to sign — just a life to live, beautifully and fully, on his own terms.

This is the most beautiful beginning he has yet had. We are all here — his family, his children — waiting to fill these years with laughter, travel, good health, and all the time in the world together. The best is truly yet to come. With more love than words can hold,

Your Daughter,
Snehal



मा.श्री किरणकुमार धोत्रे
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
गो.म.पा.वि.महामंडळ,
छत्रपती संभाजीनगर

सर्वांना संतोष देणारे व्यक्तिमत्व

माननीय श्री संतोषजी तिरमनवार यांची गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर येथे दिनांक १/१२ /२०२२ रोजी कार्यकारी संचालक म्हणून नियुक्ती झाली व ते रुजू झाल्यानंतर माझी व त्यांची साधारणता ४० वर्षानंतर पुन्हा भेट झाली. पुन्हा भेट झाली हे सांगण्याचे कारण की शालेय जीवनात आम्ही दोघे इयत्ता सातवी ते नववी दरम्यान जालना येथील सरस्वती भुवन प्रशाला येथे वर्गमित्र होतो. माझाच एक वर्गमित्र माझे साहेब म्हणून मला लाभण्याचे भाग्य मिळाले. साधारणतः १९८१-८२ नंतर आम्ही २०२२ च्या अखेरीस

भेटलो. परंतु सरांनी मला पाहताच ओळखले. नावानिशी केवळ जुने चार-पाच बोटावर मोजण्या इतकेच लक्षात असलेल्या वर्गमित्रांपैकी मी एक असल्याचे सांगताच मला खूप छान वाटले. सरांनी त्यांच्या वडिलांचे पोलीस खात्यातील नोकरीतील बदलीमुळे १९९२ ला जालना सोडले व पुढील शालेय शिक्षणासाठी यवतमाळला गेले. तेथील शासकीय तंत्रनिकेतन यवतमाळ येथून त्यांनी अभियांत्रिकी पदविका पूर्ण केली. योगायोगाने मी देखील शासकीय तंत्रनिकेतन औरंगाबाद आत्ताचे छत्रपती संभाजीनगर येथून डीसीई पूर्ण केले. सन १९८२ नंतर सरांचा व माझा संपर्क तुटला होता. त्याकाळी आजच्यासारख्या भ्रमणध्वनी किंवा दूरध्वनी सारख्या संवादाच्या सोयी उपलब्ध नसल्याने तसेच सामाजिक साधने देखील म्हणजे सोशल मीडिया नव्हती परंतु आठवणी मधील संपर्क कायम राहिला.

सरांना फार पूर्वी मी एकदा फेसबुक फ्रेंड रिक्वेस्ट पाठवली होती परंतु सर फेसबुक जास्त वापरत नसल्याने प्रत्यक्ष संपर्क होऊ शकला नव्हता. सरांची भेट होताच त्यांचे परवानगीने मी आमच्या वर्ग मित्रांच्या व्हाट्सअप ग्रुपमध्ये समाविष्ट केले. सर्व वर्ग मित्रांनी आवर्जून सरांना लक्षात ठेवले होते ते त्यांच्या क्रिकेट संघातील प्राविण्यामुळे, सर डाव्या हाताने उत्कृष्ट गोलंदाजी करत असत. आम्ही सर्व मित्र त्यांच्या जालना येथील रेल्वे स्टेशन जवळील निवासस्थानाशेजारच्या मैदानात नेहमी क्रिकेट खेळत असू. त्यांच्या गोलंदाजीचे कौशल्य त्यांच्या यॉर्कर लेंथ चेंडूत असायचे. कोणताही दमदार फलंदाज बॅट उचलेपर्यंत त्याला त्रिफळाचीत करण्याची कला सरांना आत्मसात होती. त्यांच्या उंचीचा देखील ते खेळताना पुरेपूर उपयोग करीत असत. थंडीच्या दिवसात खेळामध्ये किंवा शाळेत येताना हात पाय व ओठ उलायचे परंतु सर त्याकडे दुर्लक्ष करून खेळात तसेच अभ्यास करतानाही स्वतःला झोकून देत असत. डाव्या हाताने भराभर लिहिणे, कमी वेळात गणिते सोडवणे यात त्यांचा हातखंडा होता. व्यावसायिक जीवनात

एमपीएससी तांत्रिक परीक्षा उत्तीर्ण होऊन ते सहाय्यक कार्यकारी अभियंता या पदावर जलसंपदा विभागात प्रथम रुजू झाले ते देखील जालना जिल्ह्यात तीर्थपुरी येथे. तेव्हा माझ्या एका मित्राने याबाबत मला कळविले होते, परंतु भेटीचा योग आला नव्हता. त्यानंतर याच विभागात सर्वोच्च अशा कार्यकारी संचालक पदावर (मंत्रालयातील सचिव दर्जाचे पद) ते विराजमान झाले व मला देखील महामंडळात मुख्य लेखा व वित्त अधिकारी पदावर रुजू होऊन जेमतेम तीन महिने झाले होते. तेव्हापासून माझी आम्ही साधारण साडेतीन वर्षे सोबत काम करीत आहोत.

सर दिनांक ३०/०४/२०२६ रोजी सेवानिवृत्त होत आहेत व माझी देखील सेवानिवृत्ती दिनांक ३०/ ११/२०२६ रोजी होणार आहे. या कालावधीत सरांनी मला अत्यंत चांगली वागणूक दिली. एक सहकारी अधिकारी म्हणून बरोबरीने मान दिला. त्यांच्या या कालावधीत त्यांच्या मराठवाड्यातील विविध पदांवर काम करण्याचा दीर्घ अनुभव पणास लावून त्यांनी अनेक रखडलेल्या प्रकल्पांची कामे पूर्ण केली व काही कारणांमुळे बंद असलेले प्रकल्प सुरू करून त्यांना गती दिली. मराठवाड्यातील सिंचन क्षेत्र वाढविण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

या दरम्यान त्यांची काम करण्याची पद्धत, हाताखालील अधिकारी व कर्मचारी यांचे कडून वेळेत काम करून घेण्याची हातोटी तसेच अनेक विविध बैठकांना उपस्थिती याचा मला जवळून अनुभव घेता आला. सर्व घटकांना सोबत घेऊन, योग्य निर्णय घेऊन कामे मार्गी लावण्याचे कौशल्य त्यांना प्राप्त आहे. या काळात मी लेखा शाखेचा प्रमुख म्हणून सरांचे मार्गदर्शनात काम करताना अनेक वेळा कमी कालावधीत जास्त काम करावे लागत असले तरी त्याबाबत कामाचा कंटाळा वाटला नाही. सरांकडे येणारे अनेक विविध अभ्यागत, विविध बैठका, दूरध्वनी - भ्रमणध्वनी, विविध कार्यक्रम व प्रचंड प्रवास पाहता त्यांनी नेहमी सर्वांना संतोष देण्याचा म्हणजेच समाधानी

करण्याचा यशस्वीपणे प्रयत्न केला आहे.

शासनाचे निर्देशानुसार जुन्या बँकिंग पद्धती ऐवजी कोषागाराकडील आयपीएलए पद्धत सुरू झाल्याने महामंडळाचा निधी बँकेत पडून न राहता शासनाच्या कोषागार कार्यालयातील पीएलए खात्यातून खर्च करावा लागतो ही पद्धत यशस्वीरित्या राबविण्यात आली.

देखभाल व दुरुस्ती कामे करण्याकरिता आवश्यक सिंचन, बिगर सिंचन पाणीपट्टीची वसुली सरांच्या काळात वाढत जाऊन या वर्षात रुपये ५०० कोटीच्या वर झाली आहे. विविध बैठका व त्याकरिताचा प्रवास यामुळे ताण असूनही सरांनी कोणाचीही कामे प्रलंबित न ठेवता वेळत करण्याचा शिरस्ता अखेरपर्यंत पाळला आहे. राजकीय, सामाजिक, प्रशासकीय या सर्व घटकांना तसेच शेतकरी वर्ग, कंत्राटदार यांना देखील त्यांनी न्याय दिला आहे. सरांना त्यांच्या पुढील निरामय आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!





मा.इंजि.राजेंद्र धोडपकर
अधीक्षक अभियंता
गोदावरी मराठवाडा पा.वि.महामंडळ

मार्गदर्शक, आधारस्तंभ आणि एक विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व

संतोषजी तिरमनवार साहेब नावाप्रमाणेच परिपूर्ण, शांत, संयमी आणि तेजस्वी व्यक्तिमत्त्व असलेले एक आदर्श अधिकारी. स्थापत्य अभियांत्रिकीतील विलक्षण पारंगतता, कायद्याचे सखोल ज्ञान आणि सर्वसामान्य माणसाच्या भावना अचूक ओळखण्याची अद्वितीय क्षमता यांचा सुंदर संगम म्हणजे मा. तिरमनवार साहेब. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अधिकार आणि आपुलकी, कर्तव्यनिष्ठा आणि माणुसकी यांचा अत्यंत संतुलित मिलाफ दिसून येतो.

साहेबांसोबत काम करताना कधीही भीती, तणाव किंवा संभ्रम जाणवला नाही. कारण प्रत्येक वेळी त्यांच्या रूपाने एक मार्गदर्शक, एक आधारस्तंभ आणि एक विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व आमच्या पाठीशी ठामपणे उभे

होते. त्यांच्या उपस्थितीनेच अनेक गुंतागुंतीच्या समस्या सहज सोडवल्या जातील, असा विश्वास प्रत्येकाच्या मनात निर्माण होत असे.

सन २००८ सालापासून सरांशी माझी ओळख असली तरी, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विभागात त्यांच्या सोबत प्रत्यक्ष काम करण्याचा आलेला अनुभव आमच्यासाठी अत्यंत समृद्ध, प्रेरणादायी आणि आयुष्यभर लक्षात राहणारा ठरला. नवीन पदावर रुजू होताना असलेली अनिश्चितता, भीती आणि जबाबदारीची जाणीव त्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाने, विश्वासाने आणि काम करण्याची पूर्ण मोकळीक देऊन दूर केली. त्यांनी आम्हाला फक्त काम दिले नाही, तर कामावर विश्वास ठेवण्याची ताकद दिली. त्यामुळे काम करताना कधी दडपण जाणवले नाही; उलट प्रत्येक आव्हानाला आत्मविश्वासाने सामोरे जाण्याची सवय लागली. महामंडळाच्या कार्यपद्धतीत त्यांनी केलेले बदल हे केवळ प्रशासकीय सुधारणा नव्हते, तर एक दीर्घकालीन दृष्टीकोनाचा भाग होते. प्रवेश नियमावली लागू करून नागरिकांसाठी फोटो पास व्यवस्था सुरू केली, ज्यामुळे कार्यालयीन शिस्त आणि सुरक्षा अधिक मजबूत झाली. कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा, योग्य आसनव्यवस्था आणि आवश्यक कामासाठी मंजुरी दिली आणि अनुकूल वातावरण निर्माण करून त्यांनी कार्यालयाला एक सकारात्मक कार्यसंस्कृती दिली.

महामंडळाच्या सर्व ठिकाणी सीसीटीव्ही प्रणाली बसवण्याचा त्यांचा निर्णय अत्यंत दूरदृष्टीपूर्ण ठरला. यामुळे अनावश्यक वावर, आगंतुकांची रेलचेल आणि अव्यवस्थित हालचालींवर नियंत्रण आले. काही वेळा समाजकंटकांमुळे उद्भवलेल्या कटू प्रसंगांनाही त्यांनी अत्यंत धीराने, संयमाने आणि ठामपणे सामोरे जात परिस्थितीवर नियंत्रण मिळवले. या कठीण प्रसंगी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे मिळालेले सहकार्य

आणि साहेबांचा धीरगंभीर स्वभाव यामुळे प्रत्येक संकट सहज पार पडले. त्यांच्या कार्यकाळात सिंचन व्यवस्थापनाच्या क्षेत्रात अनेक उल्लेखनीय आणि दूरगामी परिणाम करणारी कामगिरी पार पडली. निम्न तेरणा उपसा सिंचन योजना (उस्मानाबाद) येथील प्रलंबित कामे पूर्ण करून दुष्काळी भागातील शेतकऱ्यांना दिलासा दिला. निम्न मानार प्रकल्पाचे १९७० पासून प्रलंबित असलेले स्वयंचलित दरवाजेयुक्त काम १ वर्षांत पूर्ण करून एक ऐतिहासिक कामगिरी साध्य केली. कुंडलिका व इतर ठिकाणी घळभरणी करून पाणीसाठा निर्माण केला व जलसंपत्ती वाढवली.

लेंडी प्रधान प्रकल्पाचे ४० वर्षांपासून रखडलेले काम पुन्हा सुरू करून जून २०२५ मध्ये पूर्णत्वास नेले. सहस्त्रकुंड प्रकल्पासाठी सुधारित प्रशासकीय मान्यता प्रक्रियेला गती देऊन भविष्यात ९ टीएमसी पाणी साठवण्याचा मार्ग मोकळा केला. नदी-जोड प्रकल्पांद्वारे ७.६८ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याच्या महत्त्वपूर्ण योजना पुढे नेल्या. जायकवाडी प्रकल्प टप्पा-२ साठी मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय प्रस्ताव सादर करून पुढील विकासाचा भक्कम पाया रचला. कोल्हापुरी बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर, धरण सुरक्षा व पुनर्वसन यांसारखी तांत्रिकदृष्ट्या अत्यंत आव्हानात्मक कामे त्यांनी यशस्वीपणे पूर्णत्वास नेली. या कामांमुळे केवळ प्रकल्प पूर्ण झाले नाहीत, तर हजारो शेतकऱ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून आला.

फक्त प्रशासकीय कामापुरतेच मर्यादित न राहता, साहेबांनी माणसांना जपण्यावरही तितकाच भर दिला. कर्मचाऱ्यांच्या आरोग्य, क्रीडा आणि सर्वांगीण विकासासाठी त्यांनी घेतलेले उपक्रम उल्लेखनीय आहेत. त्यांच्या प्रेरणेतून आणि मार्गदर्शनाखाली २०२६ साली गोदावरी पाटबंधारे महामंडळाने सर्वोत्तम राज्यस्तरीय संघ हा मानाचा किताब पटकावला ¯ हा त्यांच्या नेतृत्वाचा आणि संघभावनेचा जिवंत पुरावा आहे. तसेच सिंचन व

बिगर सिंचन पाणीपट्टी वसुलीत ५२० कोटी रुपयांचा विक्रमी टप्पा गाठत, मागील वर्षाच्या तुलनेत २२० कोटींनी अधिक प्रगती साधली - हा केवळ आकड्यांचा विजय नव्हे, तर व्यवस्थापन, नियोजन आणि टीमवर्कचा एक उत्कृष्ट नमुना आहे. या यशाबद्दल माननीय जलसंपदा मंत्री तसेच अतिरिक्त मुख्य सचिव (जलसंपदा) यांनी सर्वांचे मनापासून अभिनंदन केले - ही बाब महामंडळासाठी अत्यंत गौरवाची ठरली.

साहेबांचा सर्वात मोठा गुण म्हणजे त्यांचा शांत, संयमी आणि समजूतदार स्वभाव. कोणतीही समस्या असो, त्यांनी कधीही घाईघाईने निर्णय घेतला नाही; तर प्रत्येक गोष्टीचा सखोल विचार करून योग्य तो मार्ग निवडला. अधीनस्थ कर्मचाऱ्यांच्या चुका समजावून सांगून त्यांना सुधारण्याची संधी देणे, आणि गरज पडल्यास त्यांच्या चुका स्वतःवर घेणे - ही त्यांची माणुसकी आणि नेतृत्वाची खरी ओळख आहे.

धरण व्यवस्थापन, पावसाळ्यातील परिस्थितीचे नियोजन, पाण्याचे संतुलन राखणे यामध्ये त्यांचे ज्ञान आणि व्यवस्थापन कौशल्य अत्यंत प्रभावी ठरले. प्रत्येक प्रकल्पाची अचूक आणि अद्ययावत माहिती त्यांच्या जवळ असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत योग्य, वेळेवर आणि दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेणे शक्य झाले. अशा या कर्तृत्ववान, दूरदर्शी, प्रेरणादायी आणि सहृदय व्यक्तिमत्त्वाचा सहवास लाभणे ही आमच्यासाठी केवळ अभिमानाचीच नव्हे, तर आयुष्यभर जपून ठेवण्यासारखी अमूल्य ठेव आहे.

साहेब तुमच्या शांत छायेत आम्ही वाढत गेलो,
तुमच्या शब्दांतून मार्ग नवा शोधत गेलो
कधी आधार दिलात, कधी धीर दिलात,
प्रत्येक पावलावर आमच्यात आत्मविश्वास रुजवत गेलात
राग न दाखवता समजावून सांगणारे,

चुकांमधून शिकवण देणारे
असे अधिकारी नव्हे,
तर आमचे खरे मार्गदर्शक बनून राहिलात तुम्ही
तुमच्याविना हे क्षण आता थोडे रिकामे वाटतील,
तुमच्या आठवणी मात्र कायम मनात राहतील
वेळ पुढे जाईल, दिवस बदलतील,
पण तुमचं स्थान आमच्या हृदयात कधीच बदलणार नाही
साहेब
अधिकारी म्हणून तुम्ही पुढे जाल,
पण माणूस म्हणून तुम्ही कायम आमच्या हृदयात राहाल.
तुमचा शांत स्वभाव, तुमचं मार्गदर्शन, तुमचा आधार
हे सगळं आम्हाला आयुष्यभर प्रेरणा देत राहील.
तुमच्या पुढील आयुष्यास उत्तम आरोग्य, अखंड आनंद, भरभराट आणि समाधान लाभो - हीच मनःपूर्वक प्रार्थना.

धन्यवाद साहेब

आमच्या आयुष्यात एक सुंदर अध्याय बनल्याबद्दल!



इंजि. सुरेश दे. कुलकर्णी
उप अभियंता (से.नि.)
महामंडळ मुख्य कार्यालय
छ. संभाजीनगर

तिरमनवार साहेब यांच्या सोबत अविस्मरणीय कार्य अनुभव !

आदरणीय कार्यकारी संचालक श्री तिरमनवार साहेब यांच्या गौरवशाली कारकिर्दीचा आणि त्यांच्या सेवा निवृत्तीच्या सन्मान प्रसंगी माझा कार्य अनुभव व्यक्त करावासा वाटतो. त्यांच्यासोबत काम करण्याचा मला लाभलेला बहुमोल अनुभव स्मरणात आणताना गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ मुख्य कार्यालयात त्यांच्या सोबत काम करतानाचा जीवनातील सर्वात संस्मरणीय आणि प्रेरणादायी अध्याय ठरतो. मी महामंडळ मुख्य कार्यालयात दीर्घ काळ काम केले आहे. या कालावधीत ज्या कार्यकारी संचालकांच्या समवेत काम करताना समाधान मिळाले (job satisfaction)

त्या अधिकाऱ्यांमध्ये सेवानिवृत्त सचिव श्री बिराजदार साहेब, सेवानिवृत्त सचिव श्री कोहीरकर साहेब यांच्या सह श्री तिरमनवार साहेब यांच्या नांवाचा उल्लेख करावासा वाटतो. श्री तिरमनवार साहेब महामंडळ मुख्य कार्यालयात कार्यकारी संचालक या पदावर रूजू झाल्यापासून ते आजपर्यंत त्यांनी केलेले मार्गदर्शन, सहकार्य आणि प्रेरणा यांनी आम्हा सर्वांच्या व्यावसायिक मूल्यांना अधिक दृढ बनवले.

एखादा प्रकल्प प्रकल्पग्रस्तांच्या आडकाठीमुळे रखलडलेला असेल तर त्यासाठी त्या भागातील लोकप्रतिनिधी यांच्यासोबत चर्चा करून, आवश्यक असेल तर त्यांना मध्यस्थाची भूमिका पार पाडण्यासाठी विनंती करून, शासनस्तरावर बैठका आयोजित करून प्रश्न मार्गी लावण्यासाठी श्री तिरमनवार साहेब यांनी खूप प्रयत्न केले. यांची काही उदाहरणे म्हणून लेंडी प्रधान प्रकल्प व पश्चिम वाहिनी वैतरणा नदीचे उर्ध्व वैतरणा धरणाचे अतिरिक्त पाणी मराठवाडा प्रदेशासाठी गोदावरी खोऱ्यात वळविण्यासाठी असलेल्या वैतरणा–मुकणे वळण योजनेचे कामाचा उल्लेख करणे अगत्याचे वाटते. सदर प्रकल्प शासन मान्यता मिळाल्यावरही मागील दहा ते पंधरा वर्षांपासून बंद होते. याबाबत श्री तिरमनवार साहेब यांनी पुढाकार घेऊन कामे पुन: सुरू करण्यासाठी प्रयत्न केले. आज रोजी या प्रकल्पांची सुरू असलेला कामाचा वेग पहाता आगामी एक दोन वर्षात प्रकल्प पुर्ण होतील याबाबत खात्री वाटते.

लेंडी प्रधान प्रकल्पाच्या घळ भरणी प्रकरणात तर ते क्षेत्रिय अधिकाऱ्यांच्या पाठीशी उभे राहिले. जलसंपदा प्रकल्पांचे बांधकाम हे फक्त तांत्रिक कार्य नसून ती दूरदृष्टी, संयम, शिस्त आणि कठोर परिश्रमांची कसोटी असते. या सर्व टप्प्यांत त्यांची उपस्थिती क्षेत्रिय अधिकाऱ्यांना स्थैर्य, विश्वास आणि योग्य दिशा देणारी ठरली. कठीण परिस्थितीत शांतपणे निर्णय घेणे आणि गुंतागुंतीच्या समस्यांचे स्पष्ट, तांत्रिक व व्यावहारिक उपाय सुचवण्याची

खात्यातील विकासाची कामे करताना लोकप्रतिनिधी, जिल्ह्यातील महसूल प्रमुख असलेले जिल्हाधिकारी व इतर अधिकारी यांच्याशी त्यांचे कायमच संबंध सौहार्दपूर्ण असायचे. लोकप्रतिनिधींशी चांगले संबंध ठेवल्यामुळे प्रकल्पाच्या भूसंपादन व पुनर्वसनविषयक अडचणी सोडवण्यासाठी त्यांना नेहमी मदत मिळत असे. तसेच सिंचन व्यवस्थापन विषयक लाभार्थी शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवणे त्यांना सहज शक्य होत असे. त्यामुळेच त्यांनी केलेल्या कामाचा वेगळाच ठसा त्या त्या विभागामध्ये कायमचा उमटविला गेला आहे.

माझे वैयक्तिक अनुभव : महामंडळ मुख्य कार्यालय म्हणजे नेक्स्ट टू मंत्रालय आहे. हे कार्यालय क्षेत्रिय कार्यालय व मंत्रालय यांच्या मधील दुवा आहे. त्यामुळे बऱ्याच प्रकरणात शासनस्तरावरून महामंडळ कार्यालयाकडे पाठपुरावा करून माहिती प्राप्त करून घेण्यात येते. विधीमंडळ कामकाजाशी संबंधीत पत्रव्यवहारामध्ये तारांकित/अतारांकित प्रश्नांची उत्तरे, लक्ष्यवेधी सुचनेचे उत्तर क्षेत्रिय कार्यालयाकडून प्राप्त झाल्यानंतर ते जर सुसंगत नसेल तर, याबाबत आम्हाला श्री तिरमनवार साहेब यांनी मंत्रालयामध्ये केलेल्या कामाचा खूप फायदा झालेला आहे.

मंत्रालयस्तरावर कशा प्रकारे उत्तर अपेक्षित आहे, त्यानुसार त्याची मांडणी करून थेट महामंडळ स्तरावरूनच उत्तर तयार करून शासनास सादर करण्यात येत होते. यामध्ये आम्हा महामंडळ कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचारी/अधिकारी यांना श्री तिरमनवार साहेब यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत असे.

श्री तिरमनवार साहेबांच्या कार्यशैलीचे आणखी एक उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे कामातील शिस्त, गुणवत्ता व निर्णय क्षमता. क्षेत्रियस्तरावरून एखादा प्रस्ताव अपुर्ण स्वरूपात महामंडळास प्राप्त झालेला असेल तर पुनः

कालापव्यय टाळण्याच्या दृष्टीकोनातून साहेब स्वत: त्या विषयात लक्ष घालून तो प्रस्ताव परिपुर्ण करून घ्यायचे व शासनास सादर करावयाचे. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आमच्यात तांत्रिक जबाबदारी दृढ होऊन प्रत्यक्ष काम करणे हे एक अविस्मरणीय झाले.

श्री तिरमनवार साहेबांच्या स्वभावाचे गुणवैशिष्ट्य म्हणजे त्यांची स्मरणशक्ती. साहेबांची स्मरणशक्ती खूप दांडगी आहे, कारण एखाद्या किचकट प्रकरणाची सोडवणूक करताना शासन निर्णय/परिपत्रक यांची आवश्यकता खूप असते. अशावेळी साहेब सांगायचे की अशा प्रकारचा एक शासन निर्णय निर्गमित झालेला आहे, तुम्ही तपासा आणि खरोखरच त्या विषयाचा शासन निर्णय निर्गमित झालेला असायचा. त्याचप्रमाणे प्रकल्पांची किंमत, त्यांच्यावर झालेला खर्च, त्या प्रकल्पास त्या आर्थिक वर्षात केलेली तरतूद याची आकडेवारी तसेच त्या प्रकल्पावर निर्माण झालेली सिंचन क्षमता याबाबतची आकडेवारी आपण एखाद्या बैठकीच्या निमित्ताने साहेबांना जर दिली तर ती त्यांच्या कायमच्या स्मरणात राहत असते आणि दुसऱ्या वेळेस चुकून तो आकडा बदलला गेला तर ते सांगायचे की तुम्ही मागील वेळी दिलेली आकडेवारी आणि आता तुम्ही दिलेली माहिती/आकडेवारी वेगळी आहे. आम्ही याची तपासणी केली असता हे आमच्या लक्षात यायचं की आमच्याकडून चुकीची माहिती साहेबांना देण्यात आलेली आहे. त्यामुळे साहेबांकडे जाताना एखादा विषय घेऊन जाताना अभ्यासपूर्ण जावे लागायचे.

साहेबांबद्दल अजून एक सांगावेसे वाटते. ते व्हाट्सअप वर खूप ॲक्टिव असायचे. बऱ्याच वेळा दौऱ्यानिमित्त साहेब कार्यालयाच्या बाहेर असताना विधिमंडळ कामकाजाशी संबंधित किंवा इतर पत्रव्यवहार त्यांना व्हाट्सअप वर पाठवून त्यावर त्यांची मंजुरी घेण्यात येत असे. साहेबांना एखादा मसुदा मान्यतेस्तव तो पाठवल्यावर तात्काळ म्हणजे पाच मिनिटांच्या आत त्यांच्याकडून त्याबाबत मंजुरी यायची अथवा त्या अनुषंगाने सूचना

मिळायच्या. मला तरी आठवत नाही की यासाठी त्यांना कधी फोन करून सांगावं लागलं की मी एखादा मसुदा पाठवला आहे आणि त्याला मान्यता पाहिजे आहे. एखाद्या वेळी त्यांना फोन करून विचारावं लागलं तर त्याबाबत ते कधी रागावत नसत व कधी म्हणत नसत की एवढी काय घाई आहे. मी तुम्हाला कळवलं असतं ना. रागाच्या बाबतीत म्हणाल तर मी त्यांना कधीही, कुणावरही रागावलेलं बघितलं नाही अथवा फोनवर सुद्धा कोणाला ते रागावलेले मी पाहिले नाही. त्यामुळे त्यांच्या हाताखाली काम करताना कधीही तणाव जाणवला नाही.



श्री तिरमनवार साहेब यांना ३० वर्षापेक्षा जास्त वर्षाच्या कालावधीमधील विविध सकारात्मक विकास कामे करताना येत गेलेल्या आव्हानात्मक अनुभावातून कामे करण्यासाठी त्यांना त्यांच्या कुटुंबाकडून, त्यांच्या सुविद्य पत्नीकडून कायम साथ मिळत गेलेली आहे. त्यांचा असा गौरवपूर्ण सेवाकाळ मला जवळून पहाण्याची संधी मिळत गेलेली आहे. त्यांना त्यांच्या भावी वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा व आरोग्यदायी आयुष्यासाठी सदिच्छा !



मा. इंजि. अजय दाभाडे
अधीक्षक अभियंता
नांदेड पाटबंधारे मंडळ, नांदेड

मा.संतोष तिरमनवार साहेबांचा आणि माझा संपर्क प्रथम सन २००५ मध्ये आला. त्यावेळी मी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ छत्रपती संभाजीनगर येथे कार्यकारी अभियंता म्हणून कार्यरत होतो. श्री तिरमनवार साहेब त्यावेळी महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळात होते. त्यावेळी माझी बदली त्यांच्या जागेवर पुणे येथे डिझाईन विभागात झाली आणि ते संभाजीनगरला माझ्या जागेवर आले. त्यावेळी आमचा परिचय झाला. तत्पूर्वी फारसा संपर्क नव्हता. केवळ आम्ही एकमेकांना नावाने ओळखत होतो. परंतु पुढे मी जेव्हा रत्नागिरी येथे अधीक्षक अभियंता म्हणून गेल्यानंतर ते मंत्रालयात उपसचिव होते. त्यावेळी देखील कामाचे निमित्ताने भेटीगाठी होत राहिल्या. परंतु आमची खरी ओळख झाली ती मी नांदेड पाटबंधारे मंडळात अधीक्षक अभियंता म्हणून आल्यानंतरच! प्रत्यक्ष कामाच्या निमित्ताने वारंवार भेटी होऊ लागल्या आणि त्यातून त्यांचे अंतरंग उलगडत

गेले. त्यांची खूपच सहकार्याची भावना आणि सहकारी अधिकाऱ्यांना समजून घेण्याची वृत्ती अतिशय वाखाणण्यासारखी आहे. साहेब मराठवाड्याचेच भूमिपुत्र आहेत आणि या प्रदेशात त्यांनी भरपूर काम केलेले असल्यामुळे या भागातील रखडलेल्या प्रकल्पांची त्यांना चांगली जाण आहे. त्याचबरोबर हे रखडलेले प्रकल्प कोणत्याही परिस्थितीत पूर्ण झाले पाहिजेत ही त्यांची आंतरिक मनापासूनची तळमळ आहे. मी जेव्हा नांदेड येथे रुजू झालो, तेव्हा साहेबांनी लेंडी या अनेक वर्षापासून रखडलेल्या प्रकल्पाला पूर्ण करण्याचा ध्यास घेतला होता. योग्य त्या सूचना आम्हाला देऊन तो प्रकल्प वाटेल ते झाले तरी आपल्याला पूर्ण करायचाच आहे असा आत्मविश्वास व्यक्त केला होता. ते तेवढ्यावरच थांबले नाहीत तर प्रत्यक्ष कामाला देखील युद्ध पातळीवर सुरुवात केली.

वास्तविक पाहता लेंडी हा प्रकल्प गेल्या चाळीस वर्षापासून रखडलेला होता. प्रकल्पग्रस्त पुनर्वसन आणि नव्या दराने मावेजा मिळावा यासाठी अडून बसले होते. लोक वाढीव मावेजा दिल्याशिवाय कामच करू देत नव्हते. श्री तिरमनवार साहेबांनी यापूर्वी अशा अनेक रखडलेल्या प्रकल्पांची कामे लोकांशी, लोकप्रतिनिधींशी आणि शासकीय पातळीवर समन्वय साधून पूर्ण केली होती. यातला दांडगा अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. त्यांचा स्वभावच असा आहे की एखादे काम हाती घेतले की प्रयत्नांची पराकाष्ठा करून ते पूर्ण केल्याशिवाय ते स्वस्थ बसत नाहीत. लेंडी प्रकल्पाच्या बाबतीत त्यांनी स्वतः जातीने पुढाकार घेऊन तात्कालिन मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, तेव्हाचे जलसंपदा मंत्री देखील तेच होते, यांच्यासोबत बैठका घेऊन या

प्रकल्पासाठी १६५ कोटीचे सानुग्रह अनुदान पॅकेज मिळवले. त्यातून तातडीने पुनर्वसनाची कामे हाती घेतली. पूर्वी पुनर्वसनाची कामे झाली होती पण ती अर्धवट होती. परंतु प्रकल्प अनेक वर्षे रखडल्यामुळे त्या कामाची अवस्था दयनीय झाली होती. त्याच्या दुरुस्तीची कामे नव्याने सुरू केल्यानंतर लोकांचा विश्वास वाढला आणि लोकांचा रोष देखील कमी झाला. लेंडी प्रकल्पाच्या घळभरणीस सुरुवात पावसाच्या अगदी तोंडावर झाली. खरे तर ते धाडसच होते. परंतु साहेबांचा आत्मविश्वास आणि पाठिंबा यामुळे ऐन पावसाळ्याच्या तोंडावर घळभरणी झाली. इच्छा असली की मार्ग निघतो हे साहेबांनी कृतीतून दाखवून दिले. थोडी फार किरकोळ कामे बाकी आहेत. परंतु साहेबांची तीव्र इच्छा आहे की त्यांच्या सेवानिवृत्तीपूर्वी सगळी उरली सुरली कामे पूर्ण झाली पाहिजेत.

श्री तिरमनवार साहेबांचा कामाचा आवाकाच मोठा आहे. एकावेळी अनेक गोष्टींवर काम करत असतात. लेंडीच्या कामासोबतच उनकेश्वर बंधाऱ्याबाबत त्यांचा खूप आग्रह आहे. हा प्रकल्प पूर्वी कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा होता. त्याचे उच्च पातळी बंधाऱ्यांमध्ये रूपांतर करायचे आहे. त्याची सुप्रमा निकषात बसत नव्हती. त्याचप्रमाणे तेथील काही जमीन वन खात्याच्या अखत्यारीत होती. परंतु साहेबांनी सातत्यपूर्ण रीतीने पाठपुरावा करून, वैयक्तिक पातळीवर लक्ष घालून त्याला मान्यता मिळवली.

मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरमध्ये झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यांनी अगदी अक्षरश: संधीचे सोने केले. रखडलेल्या अनेक

प्रकल्पांना सुप्रमा घेतल्या. काही नव्या प्रकल्पांना मान्यता घेतल्या आणि कामाचा वेग दुप्पट केला. उनकेश्वरचा बॅरेज निकषात बसवून त्याला प्रशासकीय मान्यता घेऊन सतत पाठपुरावा करुन त्याचे कामही मार्गी लावले आहे. साहेबांच्या सततच्या प्रयत्नाने मार्गी लागलेले आणखी एक महत्त्वाचे काम म्हणजे विष्णुपुरी योजनेच्या पंप हाऊसचे काम! गेल्या अनेक दिवसापासून पंप हाऊस खराब झाले होते. त्याच्या दुरुस्तीसाठी त्यांनी स्वतः लक्ष घालून जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्याचे काम सध्या सुरू असून ते लवकरच पूर्ण होत आहे. त्याचप्रमाणे पूर्णा नदीवरचे चार बॅरेजची प्रशासकी मान्यता देखील त्यांनी मिळवून तेही काम मार्गी लावले आहे. श्री तिरमनवार साहेब एक उत्तम प्रशासक, एक अनुभव संपन्न अभियंता, उत्तम तांत्रिक ज्ञान आणि तळमळीने काम करणारा अधिकारी आहेत. त्यामुळे त्यांच्या कार्यकाळात वर्षानुवर्षी रखडलेले प्रकल्प मार्गी लागले आहेत. ते गोदावरी महामंडळाचे उत्तम कुटुंब प्रमुख असल्यामुळे महामंडळाचा कारभार त्यांच्या कार्यकाळात उत्तम सुरू आहे. काम करीत असताना प्रत्येकांशी अगदी बंधू भावाने वागतात. त्यामुळे सर्वांना काम करताना हुरुप येतो. वैयक्तिक माझ्या बाबतीत सांगायचे म्हणजे ते मला मोठ्या भावासारखे आहेत. अतिशय समजूतदारपणे वागतात, रागावणे किंवा अपमानास्पद वागणूक देणे हे त्यांच्या स्वभावातच बसत नाही. त्यामुळे कोणतेही काम वेगाने पूर्ण करण्यासाठी त्यांनी हाक दिली की सहकारी सदैव सज्ज असतात. त्यांच्या अशा कार्यशैलीमुळे त्यांनी जिथे जिथे काम केले तिथे तिथे त्यांनी आपल्या कार्यशैलीची विशिष्ट छाप सोडली आहे. आता ते प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त होत आहेत. त्यांना पुढील आयुष्य सुख समृद्धीचे आरोग्यदायी जावो या सदिच्छा.



मा.इंजि.इ.म. चिश्ती
अधीक्षक अभियंता
बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ
परळी वैजनाथ

कर्मयोगी व निष्ठावंत अधिकारी

मा.श्री संतोष तिरमनवार साहेब यांच्या सेवानिवृत्ती प्रित्यर्थ लेख लिहीत असताना मनात अनेक भावना दाटून आल्या आहेत. एकीकडे भावुकता आहे, तर दुसरीकडे एक समाधानाची भावना आहे. गेल्या जवळपास तीन वर्षाच्या कालावधीत साहेबांसोबत एकत्र काम केले ते केवळ एक प्रशासक म्हणून नव्हे तर एका मोठ्या कुटुंबाप्रमाणे सर्वांच्या टीम प्रोत्साहनामुळे, अथक परिश्रमामुळे आणि सहकार्यामुळे विविध क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवता आले. साहेबांसोबत काम करतानाच्या प्रवासात केवळ कामच झालं नाही तर नकळत आमच्यामध्ये एक जिव्हाळ्याचं नातंही निर्माण झालं. दिवसेंदिवस एकमेकास केवळ अधिकारी म्हणून नाही तर एक माणूस समजून घेत गेलो आणि म्हणूनच आज सेवानिवृत्तीचे निरोप देताना मन थोडं अधिकच हळवं होत आहे.

साहेबांकडून मिळालेलं सहकार्य हे फक्त प्रशासकीय नव्हतं, तर

यामध्ये एक आपुलकी, एक विश्वास आणि नात्याची ऊब होती. तसेच साहेबांनी माझ्यावर केवळ एक अधिकारी म्हणून नाही, तर परिवारातील सदस्य म्हणून ज्या प्रेमाने आणि विश्वासाने साथ दिली त्यासाठी मी साहेबाचे सदैव ऋणात राहीन. तसेच कार्यकारी संचालक आणि अधीक्षक अभियंता म्हणून काम करताना साहेबांनी मला केलेले सहकार्य, संवेदनशीलता आणि समजून घेण्याची वृत्ती माझ्यासाठी अत्यंत महत्वाची ठरली. या सगळ्या आठवणी मी आयुष्यभर जपून ठेवेन. साहेबांसोबत काम करताना आपण एकटे नाही आहोत ही जाणीव प्रत्येक क्षणी दृढ होत गेली आणि कदाचित म्हणूनच, ही जागा केवळ कार्यक्षेत्र न राहता मनाच्या खूप जवळची झाली. साहेबांसोबत एकत्र केलेलं काम, जोडलेली नाती, आणि अनुभवलेला हा प्रवास माझ्यासाठी अत्यंत मौल्यवान आहे. साहेबांसोबत काम करताना लातूर आणि बीड, जिल्ह्यात खालील प्रमाणे कामे करण्याचा योग आला. कामाची यादी खूप मोठी आहे. तथापि काही ठराविक कामे जी साहेबांमुळे पुर्णत्वास नेता आली.

१.निम्न तेरणा प्रकल्प जिल्हा धाराशिव या मोठ्या प्रकल्पाचे मागील २० वर्षापासून प्रलंबित प्रस्ताव फेरसादर करून केंद्रीय जलआयोग, नवी दिल्ली यांचे कडून वारंवार पाठपुरावा करून निम्न तेरणा प्रकल्पास सुधारित मान्यता प्राप्त करून घेतली.

२.अधीक्षक अभियंता पदी कार्यरत असताना मांजरा नदीवरील शिवणी उच्च पातळी बंधारा, होसूर बॅरेज, लासरा बॅरेज, टाकळगाव (देवळा) बॅरेज, धनेगांव बॅरेज, तसेच तेरणा नदीवरील किल्लारी (कवठा) बॅरेज, राजेगाव बॅरेज, मदनसुरी बॅरेज, गुंजरगा बॅरेज, औराद (शहाजाने) बॅरेज ही कामे अथक परिश्रम करून पूर्ण केली आहेत. वरील कामामुळे लातूर जिल्ह्यात साधारणपणे ३५.०० दलघमी पाणीसाठा करून ८७५० हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण झाले.

३.मांजरा प्रकल्प दोन्ही मुख्य कालव्याचे अस्तरीकरण, निम्न तेरणा प्रकल्पाच्या कालव्याचे अस्तरीकरण पूर्ण केल्यामुळे प्रकल्पीय सिंचन क्षमता निर्माण झाली आहे.

४.रेणापूर मध्यम प्रकल्पांतर्गत खरोळा, रेणापूर, घनसरगाव, येथील बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर कामे पूर्ण करून प्रकल्पीय सिंचन क्षमता निर्माण केली आहे.

५.लातूर जिल्ह्यातील मांजरा नदीवरील १५ बॅरेज व तेरणा नदीवरील ९ बॅरेजची कार्यभार कालावधीत आवश्यक देखभाल दुरुस्ती करून सलगपणे बॅरेजमध्ये १०० टक्के पाणीसाठा व प्रकल्पीय सिंचन क्षेत्र निर्माण झाले. लातूर जिल्ह्यातील ही कामे अल्पावधीत पुर्ण करून सिंचन क्षेत्रात आमुलाग्र बदल झालेला आहे.

६.लातूर जिल्ह्यातील जळकोट या डोंगरी व अवर्षण प्रवण तालुक्यात सिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देण्यासाठी तिरू नदीवरील बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रूपांतरण करण्यासाठी सर्वेक्षण कामे पूर्ण करून शासनाकडून विशेष बाब म्हणून प्रशासकीय मान्यता घेणे, रूपांतरण कामाचे संकल्पने आराखडे, नकाशे तयार करणे, तांत्रिक मान्यता अंदाजपत्रके, निविदा प्रक्रिया



उर्ध्व कुंडलिका प्रकल्प

पूर्ण करणे, नियामक मंडळाकडून सदर कामाचा प्राधान्यक्रम, निधीची तरतूद यांस मान्यता घेऊन प्रत्यक्ष कामे सुरू करून एका हंगामात सदर कामे पूर्ण केली आहेत. सद्यस्थितीत पाणीसाठा होऊन या परिसरातील शेतकरी यांना मोठा फायदा झाला आहे.

७.मानार नदीवरील अहमदपूर व चाकूर या अवर्षण प्रवण तालुक्यात एकूण ८ को.प. बंधाऱ्याचे बॅरेजमध्ये रूपांतरण कामात शासनाकडून प्रशासकीय मान्यता प्राप्त करून संकल्पने, आराखडे नकाशे तयार करणे तांत्रिक मान्यता, अंदाजपत्रके, निविदा प्रक्रिया पूर्ण करणे, निधीची तरतूद या बाबी पूर्ण करून सदर कामे प्रगतीपथावर आहेत.

८.तावरजा नदीवरील ५ को.प.बंधाऱ्याचे विशेष दुरुस्ती अंतर्गत बॅरेजमध्ये रूपांतरण कामासाठी योजनेचे सर्वेक्षण व अन्वेषण, संकल्पने ,आराखडे, नकाशे तयार करून शासन स्तरावरून प्रशासकीय मान्यता प्राप्त करून घेणे नियामक मंडळाकडून प्राधान्यक्रम व निधीची तरतूद, निविदा प्रक्रिया पूर्ण करणे इत्यादी कामे केली.

९.केंद्र शासनाच्या बळीराजा जलसंजीवनी योजनेमधील बोरसुरी व चोंडी साठवण तलावाचे काम पूर्ण करून घेण्यासाठी वेळोवेळी पुढाकार घेऊन प्रकल्पामध्ये पाणीसाठा निर्माण केला.

१०.रेपेवाडी साठवण तलावाचे १०-१२ वर्षापासून बंद असलेले काम पूर्ण करण्यासाठी पुढाकार घेऊन शासन निर्णयानुसार काम पूर्ण केले आहे.

११. मा. तिरमनवार साहेबांच्या कालावधीत अहमदपूर- चाकूर आवर्षण प्रवण तालुक्यासाठी क्षेत्रातील व्यापक परिणाम करणारा प्रमुख प्रकल्प म्हणून अंतेश्वर झरी उपसा सिंचन योजनेसाठी ५० दलघमी पाणी उपलब्धता तसेच मा. मुख्यमंत्री यांची मान्यता प्राप्त करून प्रशासकीय मान्यता प्रस्ताव SLTAC यास सादर केलेला आहे.

१२. तारूगव्हाण ते भोपळा उपसा सिंचन योजना यासाठी साहेबांनी

मराठवाड्यासाठी प्राप्त १९.२९ टीएमसी पाणी यातून मान्यता देऊन लक्षणीय दुर्लक्षित अशा डोंगराळ भागासाठी योजना मंजूर करून दिलेली आहे.

१३. निम्न तेरणा प्रकल्पाचे सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्ताव साहेबांच्या कार्यकाळात मंजूर झाला तथापि सदरील प्रकल्पाचे पाणी वापर पूर्णपणे होत नसल्याचे त्यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी सदरील प्रकल्पाचे फेरनियोजन करून बेलकुंड उपसा सिंचन योजना ही भूकंपग्रस्त गावांसाठी ३००० हेक्टर क्षेत्रासाठी शासनाकडून मंजूर करून घेतली.

१४. रायगव्हाण मध्यम प्रकल्प ता. कळंब जि. धाराशिव या प्रकल्पास लासरा बॅरेज येथून पूरक उपसा सिंचन योजनेद्वारे ४.११ दलघमी पाणी उपलब्धता तसेच योजनेची सर्व आराखडे तयार करून धोरणात्मक बाबी मध्ये मुख्य भूमिका घेऊन या प्रदीर्घ कालावधीपासून प्रलंबित योजनेस न्याय दिलेला आहे.

जवळपास ३३ वर्षाचा सेवा प्रवास शासकीय सेवेत आज अधिकृतपणे पूर्णत्वास जात आहे. सेवानिवृत्ती हा शब्द जरी शेवट दर्शवतो, तरी तो खरं तर आयुष्यातील एका नव्या अध्यायाची सुरुवात असते आणि हा टप्पा प्रत्येकाच्या वाट्याला येतोच. आज मागे वळून पाहताना साहेबांच्या धाराशिव, नांदेड, परभणी, बीड, छत्रपती संभाजीनगर, पुणे व कोकण येथील प्रत्येक ठिकाण, प्रत्येक सहकारी, प्रत्येक अनुभव साहेबांच्या आयुष्याचा अविभाज्य भाग बनला आहे. साहेबांच्या सेवेत लाभलेले सहकार्य, आपुलकी, आणि विश्वास हे त्यांच्यासाठी केवळ आठवणी नाहीत, तर आयुष्याची श्रीमंती आहे.

साहेबांच्या स्वभावामुळे सुरुवातीपासूनच एक गोष्ट कायम राहिली की अडचणीत असलेल्या माणसाला मदतीचा हात देणे आणि समाजासाठी काहीतरी करण्याची ओढ! आपण समाजासाठी काहीतरी करतोय ही

भावनाच साहेबांच्या मनाला अतूट समाधान देणारी आहे.

अशाप्रकारे वरील सर्व योजना साकार करताना त्यांनी आपल्या जीवनातील आपल्या अस्मितेशी प्रतारणा होऊ दिली नाही. अशा प्रकारे सर्व अधिकारी, पदाधिकारी व जनसामान्यांचे मित्र म्हणून खेळीमेळीने आपले कर्तव्य व सेवा परिपूर्ण केली. त्यांनी या कामाकरिता आपले जीवन व सेवा अर्पित करून आपल्या सर्वांकरता एक आदर्श निर्माण केला. मी व माझ्या कुटुंबीयांकडून मा.संतोष तिरमनवार साहेबांना या निमित्ताने अनेक शुभकामना देऊन परमेश्वर आपणास व आपल्या कुटुंबीयांस दीर्घ आयुरारोग्य लाभावे व मानसिक समाधान लाभावे या अनेक सदिच्छा. सेवा संपली, पण नातं नाही, जबाबदारी संपली, पण माणुसकी नाही, आपल्या सर्वांच्या प्रेमाने आणि आशिर्वादाने साहेबांचे पुढचं आयुष्य अधिक अर्थपुर्ण व्हावं, हीच नम्र अपेक्षा!




मा.इंजि. विजयकुमार थोरात
अधीक्षक अभियंता, जलसंपदा
धाराशिव पाटबंधारे मंडळ, धाराशिव

दूरदृष्टी असलेला अभियंता

मराठवाड्यातील अनेक प्रकल्पापैकी रखडलेला प्रकल्प असलेल्या दुधना प्रकल्पाच्या उभारणीच्या काळात श्री तिरमनवार साहेब आणि माझी पहिल्यांदा ओळख झाली. मराठवाड्यातील या प्रकल्पाच्या ठिकाणी अनेक अडचणी होत्या. प्रकल्पग्रस्तांच्या २२ गावांच्या पुनर्वसनाचा प्रश्न असल्याने लोक काम करू देत नव्हते. परंतु माननीय तिरमनवार साहेबांनी त्या सर्व समस्यांचे निराकरण करून प्रकल्पग्रस्तांची मने जिंकून हा रखडलेला प्रकल्प मार्गी लावला. प्रकल्पग्रस्तांच्या २२ गावांचे पुनर्वसन करून प्रकल्पाची घरभरणी देखील केली. तेव्हा त्यावेळी माझी नेमणूक ही या ठिकाणी सहायक कार्यकारी अभियंता म्हणून झाली होती. साहेबांचे योग्य नियोजन, दांडगा जनसंपर्क आणि कुठल्याही अडचणींपुढे हार न मानता सतत प्रयत्न करीत राहण्याचा त्यांचा स्वभाव यामुळे दुधनाच्या अनंत अडचणीवर मात करून

त्यांनी घळभरणी यशस्वीपणे पूर्ण केली.



त्यानंतर श्री तिरमनवार साहेब यांच्यासोबत काम करण्याचा योग आला तो सन २०२१ मध्ये! त्यावेळी साहेब कोकण प्रदेश मुख्य अभियंता होते आणि मी सिंधुदुर्ग जिल्ह्यात अधीक्षक अभियंता होतो. त्यावेळी साहेबांच्या मार्गदर्शनाखाली तिलारी, अरुणा, नरडवे प्रकल्प पीएमकेएस वायच्या अंतर्गत मार्गी लावण्यासाठी खूप मदत आणि मार्गदर्शन झाले. या ठिकाणी कार्यरत असताना तिलारी या आंतरराज्यीय प्रकल्पात काही अडचणी होत्या. याबाबत श्री तिरमनवार साहेबांनी जातीने लक्ष घालून व त्यांचे गोवा राज्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी असलेल्या सलोख्याच्या संबंधांचा उपयोग करुन त्या अडचणी सोडवून प्रकल्प मार्गी लावण्यासाठी खूप मदत झाली.

त्याचप्रमाणे नरडवे प्रकल्पातील निविदा प्रक्रिया आणि भूसंपादनाबाबत

काही न्यायालयीन अडचणी होत्या. त्याठिकाणी साहेबांनी अतिशय चांगल्या पध्दतीने आपली बाजू उच्च न्यायालयात मांडून प्रकल्प मार्गी लावण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच कोर्ले सातंडी ल.पा. प्रकल्पाची सुप्रमा घेण्याबाबत साहेबांचे मार्गदर्शन मिळाले.

त्यानंतर पुन्हा आम्ही सोबत काम करण्यासाठी आलो ते ऑक्टोबर २०२४ मध्ये! पुन्हा एकत्र काम करण्याची संधी मला मिळाली. त्यावेळी साहेब गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक म्हणून आले तर माझी धाराशिव पाटबंधारे मंडळात अधीक्षक अभियंता



म्हणून नेमणूक झाली.

मराठवाडा ही साहेबांची मातृभूमी आणि कर्मभूमीही असल्याने त्यांनी या भागातील रखडलेले अनेक प्रकल्प मार्गी लावण्यासाठी अतिशय मनापासून प्रयत्न केले. त्यातल्या त्यात मराठवाड्याच्या हिताचा असणारा कृष्णा मराठवाडा प्रकल्प हा अतिशय जिव्हाळ्याचा आणि महत्त्वाचा प्रकल्प आहे. त्यामुळे त्यांनी जाणीवपूर्वक या प्रकल्पाकडे विशेष लक्ष दिले. या प्रकल्पाच्या टप्पा पाचच्या चाचणीचे काम साहेबांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही पूर्ण केले. त्याचप्रमाणे टप्पा क्रमांक दोन आणि तीनची देखील चाचणी एप्रिल २०२६ मध्ये अंतिम टप्प्यात आली. मराठवाड्याच्या दृष्टीने ही फार मोठी गोष्ट आहे. हा प्रकल्प साहेबांच्या कारकिर्दीतच पुर्णत्वाकडे गेला याचा आनंद आहे. त्याचप्रमाणे टनेलच्या कामासाठी देखील साहेब खूपच आग्रही होते.

हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी ज्या ज्या समस्या निर्माण झाल्या होत्या, त्या सर्वांचे निराकरण करण्याचे काम साहेबांनी केल्यामुळे हा अतिशय महत्त्वकांक्षी असा प्रकल्प मार्गी लागला आहे. अशा रीतीने त्यांनी मराठवाड्यातील अनेक रखडलेल्या प्रकल्पाच्या अडचणी सोडवून प्रकल्प मार्गी लावले आहेत. त्यामुळे साहेबांचे आपल्या मातृभूमी वरचे प्रेम दिसून येते.

वास्तविक पाहता साहेबांच्या वैयक्तिक स्वभावाबद्दल आणि कार्यपद्धती बद्दल सांगायचे झाल्यास ते अतिशय शांत, संयमी आणि समजून घेणारे नेतृत्व आहे. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळातील सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांच्या प्रश्नांकडे त्यांचे अतिशय सौजन्यपूर्ण रीतीने लक्ष असते. कोणतेही काम हाती घेतले की ते तडीस नेण्याचा त्यांचा स्वभाव आहे. मग त्यामध्ये किती जरी अडचणी आल्या तरी ते मागे हटत

नाहीत आणि हीच आमच्या सर्व अधिकाऱ्यांसाठी प्रेरणा असते. त्यांनी केलेल्या कामाचा मोठा प्रभाव अधीनस्त अधिकाऱ्यावर असतो. त्यांची निर्णयक्षमता आणि धाडस हे देखील वाखाणण्याजोगे आहे. मराठवाड्यात तर त्यांनी अनेक प्रकल्पग्रस्तांच्या प्रखर विरोधामुळे रखडलेले प्रकल्प मोठ्या धाडसाने पोलिस संरक्षण घेऊन पूर्ण केले असल्याचे दिसून येते. असे हे प्रेरणादायी नेतृत्व येत्या ३० एप्रिल २०२६ रोजी आपल्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होत आहे. त्यानिमित्त त्यांना खूप खूप शुभेच्छा! साहेबांचे पुढील आयुष्य सुखाचे, समृद्धीचे आणि आरोग्यदायी जावो या शुभेच्छा!



मा.इंजि.सुधाकर कचकलवार
अधीक्षक अभियंता
उर्ध्व पैनगंगा प्रकल्प
नांदेड

शिस्तप्रिय आणि कर्तव्यनिष्ठ अभियंता

मा. इंजि.श्री संतोष तिरमनवार साहेब, नांदेड जिल्ह्यातील किनवट येथील भूमिपुत्र असून मराठवाड्याच्या मातीतून घडलेले एक कर्तृत्ववान अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे. याचा आम्हाला अभिमान आहे. खरोखरच अभिमान वाटावा असे आपल्या कार्यकाळात त्यांनी जलसंपदा विभागाच्या प्रगतीसाठी सातत्याने मोलाचे योगदान दिले आहे. तसेच त्यांच्या प्रदीर्घ व उल्लेखनीय शासकीय सेवेत विविध महत्त्वपूर्ण पदांवर कार्य करताना त्यांनी उत्कृष्ट प्रशासकीय व तांत्रिक नेतृत्वाची छाप उमटविली आहे.

माझी कार्यकारी अभियंता म्हणून लातूर येथे प्रथम नेमणूक झाली त्यावेळी मा. संतोष तिरमनवार साहेब हे बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ परळी येथे अधीक्षक अभियंता म्हणून कार्यरत होते. त्या काळात त्यांच्या मार्गदर्शनाखाली क्षेत्रिय कार्य करण्याची संधी मला लाभलेली आहे.

त्यानंतर पुढे मा. तिरमनवार साहेब यांनी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर येथे कार्यकारी संचालक म्हणून पदभार स्वीकारला व माझी नेमणूक अधीक्षक अभियंता म्हणून उर्ध्व पैनगंगा

प्रकल्प, नांदेड येथे झाली. या कालावधीतही त्यांच्या धडाडीच्या नेतृत्वामुळे व मार्गदर्शनामुळे मला उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाच्या पुर्णत्वाच्या कामास व प्रगतीस मोठ्या प्रमाणात लाभ झाला.

उर्ध्व पैनगंगा प्रकल्पाची सहावी सुधारित प्रशासकीय मान्यता (Revised Administratitive Approval), नवीन उच्च पातळी बंधा-यांची कामे तसेच कालव्यांची दुरुस्ती व अस्तरीकरण ही महत्त्वाची कामे, त्यांनी अत्यंत वेगाने व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करून प्रकल्पाच्या प्रगतीस लक्षणीय गती दिली आहे. कामकाजातील त्यांची नियोजनबद्धता, निर्णयक्षमता व कार्यक्षम अंमलबजावणी, ही कौशल्ये विशेष उल्लेखनीय आहेत.

त्यांच्या तांत्रिक प्राविण्यामुळे व कार्यतत्परते मुळे प्रकल्पाअंतर्गत विविध कामे प्रभावीपणे व वेळेत पूर्ण करण्यात आली. त्यांनी आपल्या कार्यकाळात अधीनस्थ अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य दिशा देत उत्कृष्ट कार्यप्रणाली विकसित केली आहे. त्यांची प्रामाणिकता, शिस्तप्रियता व कर्तव्यनिष्ठा ही सर्व अधिका-यांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी आपल्या संपुर्ण कारकिर्दीत केलेले कार्य अधिकाऱ्यांसाठी अतिशय प्रेरणादायी असे आहे. त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त त्यांना उत्तम आरोग्य, सुख-समृद्धी व उज्ज्वल भविष्याच्या माझ्याकडून मनःपूर्वक शुभेच्छा.



मा.इंजि. सायली पाटील
कार्यकारी अभियंता,
मुळा पाटबंधारे विभाग
अहिल्यानगर

प्रशासनातील प्रेरणादायी व्यक्तिमत्व

शासकीय सेवेत कार्य करताना काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांच्या कार्यशैलीमुळे आणि स्वभावामुळे ते सर्वांच्या मनात कायमचे स्थान निर्माण करतात. गोदावरी मराठवाडा विकास मंडळ, छत्रपती संभाजी नगर येथील कार्यकारी संचालक श्री तिरमनवार सर हे असेच एक संयमी, कर्तव्यदक्ष आणि मृदू स्वभावाचे अधिकारी म्हणून ओळखले जातात.

सर, तुमच्यासोबत गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळात काम करताना तुमच्या संयमी वृत्तीचा आणि कामाप्रती असलेल्या तत्परतेचा अनुभव प्रत्येकास आला आहे. कोणतेही काम असो, आपण नेहमी शांतपणे, विचारपूर्वक आणि नियोजनबद्ध पद्धतीने ते पूर्ण केले आहे. आपल्या बोलण्यात नेहमीच सौम्यता आणि समजूतदारपणा दिसून येत असतो, कठीण प्रसंगातही तुम्ही संयम राखून आणि कधीही घाईघाईने निर्णय न घेता सर्वांना सोबत घेऊन मार्ग काढत असता याचे आम्ही सारे जण साक्षीदार आहोत.

तुमच्या कार्य पद्धतीतील एक विशेष गुण म्हणजे प्रत्येकाशी अतिशय सौम्यपणे बोलून आणि समजावून काम करून घेण्याची शैली होय! त्यामुळे कार्यालयातील वातावरण नेहमी सकारात्मक आणि सहकार्यपूर्ण राहिले आहे. कनिष्ठ कर्मचारी असो किंवा वरिष्ठ अधिकारी, सर्वांना आपण समान आदर दिला असून योग्य मार्गदर्शन केले. आपल्या नेतृत्वामुळे अनेक कामे वेळेत आणि योग्य गुणवत्तेने पूर्ण झालीत.

सर,आपल्या सेवाकाळात कामे विहित वेळेत पूर्ण करण्यास सर्वो च्च प्राधान्य दिले गेले आहे, आपण केवळ अधिकारी म्हणून नव्हे तर एक मार्गदर्शक, सहकारी आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वांच्या मनात स्थान निर्माण केले आहे. आपल्या शांत स्वभावामुळे आणि कामावरील निष्ठेमुळे आपण कार्यालयीन कार्यसंस्कृती अधिक मजबूत केली आहे.

आज आपल्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने आपल्या कार्याचा गौरव करताना आम्हाला अभिमान वाटतो. आपण दिलेले मार्गदर्शन, सहकार्य आणि माणुसकीची वागणूक आम्हाला नेहमी प्रेरणा देत राहील. आपली उणीव कार्यालयात नक्कीच जाणवेल, आपण दिलेले कामाप्रतीचे संस्कार आणि कार्यपद्धती आमच्यासाठी नेहमी मार्गदर्शक ठरेल.

सर, आपला सेवानिवृत्तीनंतरच्या आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद, समाधान आणि दीर्घायुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.



मा.इंजि. निलेश प्रकाश पाटील
कार्यकारी अभियंता
नाशिक लघुपाटबंधारे विभाग

प्रेरणा, मार्गदर्शन आणि कर्तृत्वाची कहाणी

आजचा दिवस हा आपल्या सर्वांसाठी अत्यंत भावनिक आणि अभिमानाचा आहे. अनेक वर्षे जलसंपदा विभागात सिव्हिल इंजिनिअर म्हणून प्रामाणिकपणे सेवा देत, आपल्या कार्याने समाजाच्या जीवनात बदल घडवणारे आणि जलसंपदा विभागाला विशिष्ट उंचीवर नेणारे आपले गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक मा. श्री. तिरमनवार साहेब आज निवृत्त होत आहेत.

संतोष म्हणजे समाधान, स्थैर्य आणि अंतर्मनातील आनंद!

या आपल्या सरांनी या नावाचा अर्थ आपल्या कार्यातून जपला.

शांत स्वभाव

स्थिर विचार

संयमी निर्णय

जलसंपदा विभाग म्हणजे राज्याची जीवनरेषा. पाणी म्हणजे जीवन आणि त्या जीवनाचे व्यवस्थापन करणारे खरे शिल्पकार म्हणजे आपले कुटूंब

प्रमुख मा. श्री. तिरमनवार साहेब व आपण सर्व अधिकारी, कर्मचारी. तिरमनवार साहेबांशी माझा गेल्या तीन वर्षांपासून संबंध येत आहे. सरांकडे काही कामे मंजूर करण्यासाठी गेलो असता त्यांनी मला वळण योजना संबंधी प्रेझेंटेशन तयार करण्यासाठी सांगितले. सदर प्रेजेंटेशन नंतर सरांनी मला वळण योजनांसंबंधीत बरेच तांत्रिक बारकावे समजावून सांगितले, जसे वळण योजनांमुळे उर्जेची बचत कशी होते, लेव्हलींगचे महत्व व दूरवर पाणी पोहोचण्याचे महत्त्व विशद करून वळण योजनांबद्दल मनामध्ये कुतूहल निर्माण करुन प्रोत्साहन दिले. गुरुत्वाकर्षणाद्वारे पाणी वळविण्याच्या योजनांमध्ये साहेबांनी महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे.



बहते पानी को दिशा देना हुनर की बात है,

हर बूंद को सही जगह पहुँचाना कमाल की बात है।

मा. तिरमनवार सरांच्या मार्गदर्शनाखाली दुसरे महत्त्वाचे योजनेचे काम करण्याचे भाग्य लाभले ते म्हणजे नदीजोड प्रकल्प. नद्यांना जोडण्याचे काम

म्हणजे केवळ अभियांत्रिकी नव्हे, तर समाजाचा भविष्यातील विचार आहे.

दुष्काळग्रस्त भागांना पाणी पुरविणे

पूर नियंत्रण करणे

शेतीला शाश्वत आधार देणे

दमनगंगा-एकदरे नदी जोड योजनेचे काम लघु पाटबंधारे विभाग नाशिक या विभागांतर्गत येते. सदर योजनेसाठी माननीय मुख्य अभियंता श्री मिसाळ साहेब व माननीय कार्यकारी संचालक तिरमनवार साहेब यांचे मार्गदर्शन व त्यांच्या वैयक्तिक रित्या पाठपुरावा केल्याने सदर योजनेच्या अगदी कमी कालावधीत विविध प्रकारच्या मान्यता प्राप्त झाल्या. योजनेचा डीपीआर हा एन. डब्ल्यू. डी. ए. मार्फत दिनांक ०८/०१/२०२४ रोजी प्राप्त झाल्यानंतर छाननी अहवाल व त्रुटी पुर्तता अहवाल पुर्ण करून तो महामंडळाने दिनांक ०२/०८/२०२४ रोजी SLTAC नाशिक यांच्याकडे सादर केला. तर प्रस्तावास सरांनी व माननीय मुख्य अभियंता यांनी वैयक्तिकरित्या उपस्थित राहून विशेष योगदान दिले. तसेच MWRRA ची देखिल मान्यता प्राप्त करुन घेतली.

बहते पानी को राह दिखाना आसान नहीं होता,

क्रीडा क्षेत्रातील मार्गदर्शन

मा. श्री. तिरमनवार सर केवळ उत्तम इंजिनिअरच नव्हेत, तर एक उत्तम मार्गदर्शक आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत याची प्रचिती आम्हाला राज्यस्तरीय पंचम क्रीडा स्पर्धा दरम्यान लोणी व शिर्डी येथे आली. क्रीडा स्पर्धांमध्ये त्यांच्या मार्गदर्शनामुळे अनेकांनी आत्मविश्वास मिळवला, मैदानावर प्रेरणा, जिंकण्याची शिकवण, हरलो तरी उभे कसे राहायचे याची जिद्द दिली. त्यापासून प्रेरीत होऊन गोदावरी पाटबंधारे महामंडळाने क्रीडा

स्पर्धामध्ये सर्वात जास्त गुण मिळवून मानाची ट्रॉफी पटकावली. तसेच स्पधचे आयोजन देखिल सरांचे मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या करण्यात आले. या क्रीडा स्पर्धा सुरू असताना साहेबांकडून बरेच काही शिकायला मिळाले. नेतृत्व कसे करायचे व ते कसे नसावे तेही सांगितले. स्पर्धेसाठी विभागाचे सर्व स्तरावरून म्हणजे चतुर्थ श्रेणीपासून ते सचिव पदापर्यंतचे अधिकारी सहभागी होते. या सर्व स्पर्धकांना त्यांनी एका कुटुंबाप्रमाणे जपले. जिथे गरज असेल तिथे योग्य मार्गदर्शन केले. जबाबदारी दिली त्याचबरोबर अधिकारही दिले. आयोजकांनाही आपल्याला सिद्ध करण्यासाठी संधी दिली. या एकत्र चालण्यामुळे यशाची शिखरे गाठता आली.

हार से घबराना नहीं सिखाया उन्होंने, ।
हर बार उठकर जीतना सिखाया उन्होंने।
मंजिल उन्हीं को मिलती है,
जिनके हौसले बुलंद होते हैं।

मा. श्री. तिरमनवार सर, आपण आमच्यासाठी:

गुरु
मार्गदर्शक
प्रेरणास्थान

आपकी सीख हमें राह दिखाती रहेगी, आपकी याद हमें मुस्कुराती रहेगी। आणि आमच्या मनात त्यांचा आदर कायम राहील.

आज निरोप देताना मन भरून आले आहे. पण त्याचवेळी अभिमान आहे की आम्हाला तुमच्यासोबत काम करण्याची संधी मिळाली.

निवृत्ती म्हणजे नवीन अध्याय, नव्या जीवनाची सुरुवात, सेवेचा अध्याय पूर्ण झाला.

जीवनाची नवी कहाणी सुरू झाली. आपल्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य, आनंद आणि समाधान लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!.



मा.डॉ.प्रदीप चव्हाण
माजी सदस्य, संभाजीनगर
विभागीय पुनर्वसन समिती

पुनर्वसन कामात अत्यंत कठीण काळात मार्ग काढणारे अधिकारी : संतोष तिरमनवार

लोअर दूधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात गेलेल्या २२ गावांचे पुनर्वसन म्हणजे प्रशासना पुढील एक जटील प्रश्न बनला होता. त्याकाळात गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाकडे पुरेसा निधी उपलब्ध नव्हता. त्यातच हा लोअर दुधना प्रकल्प लवकर पूर्ण करा असा दबाव पण वाढत होता. तथापि बाधित २२ गावांचे पुनर्वसन झाल्याशिवाय त्या गावातील लोकांना दुसऱ्या ठिकाणी शिफ्ट करणे शक्य नव्हते. कारण नवीन शिफ्टींगच्या ठिकाणी काही सोयी सुविधा देण्यासाठी आमच्या पुनर्वसन समितीकडे निधी नव्हता. अशा कठीण काळात अनेक अडचणी समोर असलेल्या काळात लोअर दुधना प्रकल्पावर कार्यकारी अभियंता म्हणून एकदम तरुण तडफदार अधिकारी श्री संतोष तिरमंनवार साहेब रुजू झाले. मी पुनर्वसन समिती सदस्य म्हणून त्यांना भेटायला गेलो. कार्यकारी अभियंत्याची भेट घेऊन त्यांचे स्वागत सत्कार झाला. मग पुनर्वसानाच्या कामातील अडचणीवर ओघा ओघाने चर्चा तर होणारच.

मग लोअर दुधना प्रकल्पांच्या बाधित लोकांना नवीन ठिकाणी शिफ्ट करायचे तर तिथे सर्वात अगोदर तिथे पाण्याची व्यवस्था करणे महत्वाचे होते. कारण नागरी सुविधांची कामे करण्यासाठी आणि लोकांना घरे बांधण्यासाठी पाण्याशिवाय काहीच शक्य नव्हते. मी जिल्हा पुनर्वसन समितीचा चेअरमन सुद्धा होतो. पण आम्हाला आर्थिक बाबतीत खूप मर्यादित अधिकार होते. प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या १० टक्के खर्चात २२ गावांचं पुनर्वसन करणे अभिप्रेत होते. तेवढ्यात अतिरिक्त कामांसाठी निधी उपलब्ध करणे शक्य नव्हते. आम्ही एका गावासाठी एक पाणीपुरवठा योजना देऊ शकत होतो. परंतु त्या कामाला वेळ लागणार होता. पुनर्वसित गावांसाठी पाण्याची वेगळी व्यवस्था करण्यासाठी आमच्याकडे निधी उपलब्ध नव्हता आणि केवळ या पाण्याच्या प्रश्नामुळे सगळे काम ठप्प झाले होते.

अशात श्री तिरमनवार साहेबांनी प्रकल्पाचे कार्यकारी अभियंता म्हणून एक मार्ग सुचवला आणि तात्कालिन विभागीय आयुक्त साहेबाच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या विभागीय पुनर्वसन समितीच्या बैठकीत पाण्यासाठी वेगळ्या निधीची तरतूद करण्याबाबत मी प्रश्न उपस्थित करावा अशी सूचना त्यांनी केली. मी त्याप्रमाणे विभागीय आयुक्तांच्या बैठकीत प्रश्न मांडला. त्यावर बरीच चर्चा घडून आली. बऱ्याच चर्चेनंतर विभागीय आयुक्तांनी आम्हाला निधी न देता एकाच वेळी ८० बोअर वेल करण्याचे काम मंजूर केले. (एका एका गावात ४ बोअरवेल) आणि मग तिरमनवार साहेबांनी अत्यंत धाडस करून निधी मिळेपर्यंत १५ दिवसात टेंडर, अग्रीमेंट, वर्क ऑर्डर इ. सर्व प्रक्रिया पूर्ण केली आणि बोअर वेल पण घेतल्या. त्यानंतर मग आमच्या कामाला गती मिळाली. पुनर्वसनावरील नागरी सुविधांना व त्या ठिकाणी घरे बांधणारांना पाणी उपलब्ध झाले. लोक हळू हळू जुनी गावं सोडून नवीन ठिकाणी जायला सुरुवात झाली. मग आम्ही प्रकल्पाच्या

कामाला गती दिली. निधी कसा मिळवायचा आणि प्रश्न कुठे मांडायचे याबद्दल मला श्री तिरमनवार साहेब यांच्या कडून खूप काही शिकायला मिळालं. हा प्रसंग सांगायचं कारण असे की आज तिरमनवार साहेब सेवानिवृत्त होत आहेत. कठीण प्रसंगात, आर्थिक अडचणीत काम बंद न राहू देता आणि जनतेला नाराज न होऊ देता मार्ग काढणारा एक सक्षम आणि अत्यंत अभ्यासू व प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन काम करणारा अधिकारी आज सेवेतून निवृत्त होत असल्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनाला आपण मुकणार आहोत. पण माझी शासनाला या लेखाद्वारे विनंती असेल की असे सक्षम अधिकारी कधी निवृत्त होत नसतात. आपणही त्यांना सेवानिवृत्त हा शब्द न लावता त्यांच्या अभ्यासाचा, अनुभवाचा धाडसाचा लाभ जनतेला कसा होत राहील याची काळजी घ्यावी. मा.तिरमनवारसाहेब आपण तांत्रिक दृष्टीने निवृत्त झालात तरी आम्ही तुमचे मार्गदर्शन मिळण्यासाठी तुम्हाला यापुढेही सल्ला घेण्यासाठी तुमच्याकडे येत राहू...... आपल्या भावी आयुष्यासाठी आपणास व आपल्या सर्व कुटुंबास सुयश, आरोग्य आणि उत्तम आरोग्य चिंतून थांबतो...



समारोपीय मनोगत

इंजि. संतोष तिरमनवार



आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष आदरणीय व्यंकटरावजी गायकवाड साहेब, सेवानिवृत्त कार्यकारी संचालक श्री घोटेसाहेब, सेवानिवृत्त कार्यकारी संचालक श्री कंदरफळे साहेब, उपस्थित प्रमुख अतिथी आणि माझ्यावरील प्रेमापोटी येथे उपस्थित असलेले माझे सहकारी अधिकारी, कर्मचारी आणि मान्यवर !

खरं तर आजचा हा कार्यक्रम पाहून मला गहिवरुन येत आहे. एक अभियंता जो सतत दगड, विटा, माती, सिमेंट आणि पाण्याच्या सानिध्यात राहून काम करत आला आहे, त्याच्याबद्दल आपल्या सर्वांच्या मनात इतका जिव्हाळा, इतके प्रेम असावे हे पाहून मन उंचबळून आले आहे! खरे तर आम्हा अभियंत्यांना कौतुक सवय नसते. सतत टीका, आरोप आणि कामाच्या जंजाळात प्रेमाच्या दोन शब्दांना आम्ही पारखे झालेले असतो. परंतु आज तर इथे गोदावरीला कौतुकाचा पूर आला आहे असे

वाटत आहे. त्याबद्दल सर्वप्रथम मी आपणा सर्वांचा आभारी आहे. आपण माझ्याप्रति व्यक्त केलेल्या प्रेमाबद्दल व सद्भावनांबद्दल मी आपला सदैव ऋणी राहीन.

मी दि०३.०१.१९९४ रोजी सहाय्यक अभियंता श्रेणी -२ म्हणून पाटबंधारे विभागात जायकवाडी पाटबंधारे उपविभाग क्र १५, तीर्थपुरी,जालना या कार्यालयात सर्वप्रथम रूजू झालो. आजपर्यंतचा सेवाकाळ विचारात घेता माझी ३२ वर्षांहून अधिक सेवा पूर्ण झालेली आहे. तसे पाहीले तर हा ३२ वर्षांचा प्रवास मोठाच होता...या प्रवासाला एक लंबा सफर म्हणावे लागेल. परंतु माझ्यासमोर सततचे काम, जबाबदाऱ्या व पूर्ण करावयाची धेय्य एवढे होते की, ते पूर्ण करण्याच्या कामामध्ये हा एवढा मोठा प्रवास कसा पूर्ण झाला हे कळलेच नाही.

माणूस जेव्हा जन्म घेतो तेव्हाच त्याच्या डोक्यावर तीन प्रकारचे ऋण असतात. पहिले ऋण असते आई-वडिलांचे ज्यांनी आपल्याला हे जग दाखवले. दुसरे ऋण असते मातृभूमीचे. जी मातृभूमी आपले भरण पोषण करत असते, आपल्याला सबळ बनवत असते, आणि तिसरे ऋण असते देशाचे, ज्या देशात आपण राहतो. जीवनाच्या प्रवासात आपली वेगवेगळ्या स्तरावरील कर्तव्ये पार पाडताना या तिन्ही ऋणातून मुक्त होण्यासाठी आपण प्रयत्न करित असतो. जीवनाला योग्य दिशा दिली त्याला शहाणपणाची किनार असली तर जीवन हे नितांत सुंदर व आनंददायी होऊ शकते. परंतु आपले कर्तव्य निष्ठेने पार पाडणे त्यासाठी कष्ट घेण्याची तयारी ठेवणे आवश्यक आहे. त्याशिवाय जीवनात समाधान मिळणे शक्य नाही.

जीवन सुंदर आहे, जीवन ग्रेट आहे, जीवन म्हणजे आनंद सारखी वाक्ये आपल्याला वारंवार ऐकायला मिळतात. पण खरंच असं आहे काय? जीवन काहीही न करता आपोआप सुंदर, ग्रेट किंवा आनंदी होऊ शकत

नाही. त्यासाठी काम करावं लागतं,कष्ट करावे लागतात. कष्टाशिवाय जीवन सुंदर,वा समाधानी होऊ शकत नाही. रविंद्रनाथ टागोर यांचे जीवनाबाबत व कर्तव्याबाबत फार सुंदर वाक्य आहे की– I slept and dreamt that life was joy; I awoke and saw that life was service; I acted and behold, service was joy याचा प्रत्यय माझ्यासारखाच आपल्यापैकी बऱ्याच लोकांना आला असेल.

जीवनासाठी समानार्थी शब्द आहे पाणी. माणसाचे जीवन पाण्यासारखे प्रवाही असावे असे म्हटले जाते. परंतु जीवनासाठी आता पाणी अडविणे अपरिहार्य झाले आहे. पाण्याचे महत्व अनन्य साधारण आहे. मनुष्य तसेच इतर प्राणी, वनस्ती वा सर्व सजीव सृष्टीसाठी तसेच कुठल्याही प्रगतीसाठी किंवा प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या इन्फ्रास्ट्रक्चर साठी पाणी हा सर्वात महत्त्वाचा घटक ठरतो. तुम्ही पाण्याशिवाय कुठल्याही प्रगतीची, इंडस्ट्री वा उद्योगाची कल्पनाही करणे शक्य नाही. जसे की जायकवाडीच्या पाण्याशिवाय छ. संभाजीनगर शहराची कल्पना करणे शक्य नाही.

त्यामुळे आपण अभियंते पाण्याचा प्रवाह अडवून धरणे बांधत असतो याचा अर्थ आपण जीवन थांबवतो असा होत नाही. आपण या धरणात पाणी साठवून देशातील शेतकरी, उद्योजक, गोरगरीब जनता, कष्टकरी,, मजूर, या सर्वांचे जीवन फुलवीत असतो. दुसऱ्यांचे जीवन फुलावे म्हणून तर आपण धरणे बांधून पाणी प्रत्येक सजीवांपर्यंत पोहोचवत असतो. तेच आपले कर्तव्य आहे. आज पर्यंत मी फक्त तेच करत आलो आहे आणि मी त्याबाबत निश्चितपणे समाधानी आहे.

या गेल्या ३२ वर्षाचा माझा अनुभव मला हेच सांगतो की तुमचा हेतू स्वच्छ असेल तर आपले कर्तव्य बजावताना तुम्हाला कोणालाही घाबरायचे अजिबात कारण नाही. लोक आपोआप तुमच्या सोबत उभे राहतील. तुम्हाला मदत करतील. लोकप्रतिनिधींचे देखील तीच परिस्थिती. कर्तव्याबद्दलचा

हेतू शुद्ध असेल तर राजकीय लोक देखील तुमच्या पाठीशी उभे राहतात हा माझा वैयक्तिक पातळीवरचा अनुभव आहे. काम करीत असताना अनेकदा अडचणी आल्या, संकटे आली, कठीण प्रसंग आले परंतु या सर्वप्रसंगी बळ दिलं ते मनाच्या शुद्ध हेतूने. बाकी काम करताना काही फारसे लागत नाही. शुद्ध हेतू, अपार कष्ट करण्याची तयारी, संयम आणि आत्मविश्वास एवढी शिदोरी आपले ध्येय साध्य करण्यासाठी पुरेशी आहे असे मला वाटते. अनेक लोक सक्सेसच्या मागे धावत असतात. त्यासाठी वाटेल त्या तडजोडी करतात. परंतु यशाची व्याख्या अत्यंत सोपी आहे, जोपर्यंत ध्येय साध्य होत नाही तोपर्यंत प्रयत्न करीत राहणे म्हणजे यश हे प्रयत्न करत असताना मात्र ते मनापासून केले पाहिजेत. आपण जे काही काम हाती घेतो त्यात आनंद ओतून काम करता आले पाहिजे तरच ते काय चांगले होते.



सेवानिवृत्तीनिमित्त श्री व सौ. तिरमनवार यांचा सत्कार कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री व्यंकटराव गायकवाड यांच्याहस्ते करण्यात आला. त्यावेळी इंजि. राम घोटे, इंजि. दीपक कंदी, इंजि. बी.एन.कंदरफळे, इंजि. सौ.जगताप,इंजि. विजय घोगरे, इंजि. श्री नाईक, इंजि.श्री धोडपकर आणि इंजि.श्री धोत्रे

काम करित असताना मी चॅलेंजस स्विकरली. निम्न मानार प्रकल्पाचे काम असो की निम्न दुधना प्रकल्पाचे काम असूद्या तेथील परिस्थिती काय आहे याची जाणीव असतानाही मी तिथे गेलो. तिथल्या लोकांच्या भावना आणि अडचणी लक्षात घेतल्या. मला तिथे प्रकल्पबाधित जनता आणि सरकार यामधील दुवा म्हणून काम करायचे होते. त्यामुळे डोळ्यातलं काजळ तर निघाले पाहिजे आणि डोळ्याला जखम पण नाही झाली पाहिजे अशा पद्धतीने काम करावे लागले. पण शेवटपर्यंत हेतू प्रामाणिक होता. त्यामुळे लोकांनी विश्वास ठेवला आणि ही वर्षानुवर्षी रखडलेली कामे पूर्ण करून लोकांना पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. यातून मला मातृभूमीच्या ऋणातून मुक्त झाल्याचा आत्मिक आनंद उपभोगता आला.

शासकीय सेवेत जी काही कामे माझ्याकडून झाली त्यापैकी काही कामाबाबत मनाला समाधान वाटले अशी काही कामे मला आठवतात. त्यामध्ये कार्यकारी अभियंता पदावर नांदेड येथे असताना मांडवी व तळणी या दोन मध्यम प्रकल्पांची, पलाईगुडा व जामखेड या दोन बृ.ल.पा. प्रकल्पांची तसेच चांडोळ व शिरपूर या दोन ल.पा. प्रकल्पांची अशा एकुण सहा प्रकल्पांची घळभरणी एका वर्षांत पूर्ण केली. गुरू दा गद्दी या कार्यक्रमांतर्गत गोदावरी नदीवर सर्वप्रथम घाट बांधले, त्याप्रमाणे नंतर इतरत्र घाटाची कामे करण्यात आली.

निम्न मानार प्रकल्पाची १.० मीटरने उंची वाढविण्याचे काम व यांत्रिकीद्वारे कालवा स्वच्छता मोहिम राबविणे तसेच निम्न दुधना या ३४४.८० दलघमी पाणी साठा असलेल्या मोठ्या प्रकल्पाची घळभरणी इ. कामे मी कार्यकारी अभियंता असताना पूर्ण केली.

मी अधीक्षक अभियंता असताना ऊर्ध्व कुंडलिका मध्यम प्रकल्पाची

घळभरणी, तेरणा व मांजरा वरील उर्वरित बॅरेजची कामे तीन वर्षात पूर्ण केली. तेरणा आणि मांजरा नदीत आता पूर्ण पाणी असल्याचे दिसून येत आहे.

मंत्रालयात उपसचिव असताना धोरणात्मक निर्णय घेणेबाबतची कार्यवाही, सर्व तांत्रिक बाबी विचारात घेऊन सुयोग्य शब्दांकन करून विविध शासन निर्णय काढणे इ. कामे केली. मंत्रालयात काम केलेले असल्याने व शासन कार्यप्रणालीची चांगल्या प्रकारे माहिती असल्याने महामंडळामार्फत शासनाकडे सादर करावयाची माहिती, प्रस्ताव तसेच पत्रव्यवहार याबाबत कोणतीही अडचण आली नाही.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळात कार्यकारी संचालक म्हणून काम पाहताना बराच काळ रखडलेल्या आंतरराज्यीय लेंडी प्रकल्पाची घळभरणी पूर्ण केली. ऊर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचे पुनर्नियोजनांतर्गत पेनगंगा नदीवरील ७ बॅरेजेची कामे व प्रशासकीय मान्यता घेऊन पुर्णा नदीवरील चार बॅरेजची कामे सुरू केली आहेत. एका बंधाऱ्यात यावर्षी पाणीसाठा होईल. सहस्त्रकुंड प्रकल्पास वाढीव पाणी उपलब्धता प्रमाणपत्र घेऊन आता एकुण २०५ दलघमी पाणीवापराच्या, ३१६०४ हेक्टर सिंचन असलेल्या व रू ७६३४ कोटी किंमतीच्या या प्रकल्पाचा सु.प्र.मा. मान्यतेच्या अंतिम टप्प्यात आहे. उनकेश्वर या १४ वर्षांपासून रखडलेल्या प्रकल्पाचे काम पुन:श्च सुरू करण्यात आलेले आहे. तसेच समन्यायी पाणी वाटपाचा सन २०२३ मध्ये निर्णय घेतला. त्याला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले गेले तरी तेथे आपण लढून पाणी जायकवाडीत आणले. दुसरे महत्वाचे काम म्हणजे उर्ध्व प्रवरा निळवंडे २ कालवा प्रकल्पाचे लोकार्पण सोहळा पार पडला. यावेळी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते झाले. त्यावेळी पंतप्रधानांचे स्वागत करण्याचे भाग्य मला लाभले.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे मला माझ्या या सेवाकालामध्ये लोक

देखील चांगले लाभत गेले. माझे आपल्या खात्यातील पहिले गुरू म्हणजे आदरणीय घोटे साहेब. शासकीय सेवेत दाखल झाल्यानंतर माझी पहिली पोस्टिंग झाली ती जायकवाडी प्रकल्प उपविभाग १५ तीर्थपुरी जिल्हा जालना या ठिकाणी. त्यावेळी घोटे साहेब आमचे कार्यकारी अभियंता होते. काम करीत असताना कामाच्याप्रती प्रामाणिक असायला पाहिजे आणि एकदा एखादे काम स्वीकारले की मग त्यात कितीही अडचणी आल्या तरी त्या सोडवून काम मार्गी लावल्याशिवाय त्याचा पिच्छा सोडायचा नाही हा गुण मी घोटे साहेबांकडून घेतला. माननीय गायकवाड साहेब यांच्यासारखे खंबीर पाठिंबा देणारे सचिव त्यावेळी मला लाभले. त्यामुळे काम करायला बळ मिळाले. तसेच कंदीसाहेब, पानसेसाहेब, कंदरफळेसाहेब, कोहिरकरसाहेब यांचे मार्गदर्शन लाभले. आई-वडिलांचा आशीर्वाद, आणि माझी सहचारिणी सौ. लीना हिची खंबीर साथ यामुळे मी इतकी कामे करू शकलो. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या मागे एका स्त्रीचा हात असतो असे म्हणतात. अर्थात मी यशस्वी ठरलो की नाही मला माहित नाही. परंतु आयुष्यातील प्रत्येक सुखदुःखाच्या वेळी, कठीण प्रसंगी माझी पत्नी लीना माझ्या पाठीमागे नव्हे तर खांद्याला खांदा लावून सोबत उभी राहिली. त्यामुळे मुलांची आयुष्ये घडली आणि मला माझी शासकीय कर्तव्ये पार पडायला वेळ मिळाला.

आणखी एक बाब म्हणजे माझा मित्र परिवार दांडगा आहे. निखळ प्रेम करणारे मित्र, संजय टाटू, आशिष देवगडे, डॉ संजय बेलसरे, जयंत बोरगावकर. अशी मोठी यादी आहे. हे मित्र म्हणजे वाळवंटातल्या ओॲशिस सारखे असतात. प्लॅटो या तत्वज्ञाने म्हटले आहे की, “Good friends are like Stars, you don’t always see them but you know they are always there.मित्रांमुळे माझ्या जीवनात आल्हाददायक प्रसंग आले, त्या सर्व मित्रांचा मी ऋणी आहे.

यावेळी आवर्जून उल्लेख करावा लागेल ते माझे शासकीय सेवेतील सहकारी

अधिकारी आणि कर्मचारी वर्ग यांचा. कारण आपण जे काही काम करतो ते टीम वर्क असते. आपली टीम एकजीव झाल्याशिवाय कार्य सिद्धीस जात नाही. याबाबतीत मी खूप लकी आहे की मला जवळपास सर्वच ठिकाणी सहकारी अधिकारी चांगले लाभले, ऑफिस स्टाफ चांगला मिळाला. एवढेच नाही तर माझ्या वाहनाचे सारथ्य करणारे चालक ही चांगले मिळाले. अगदी जीवापाड जपणारे. या सर्वांचे आभार शब्दात व्यक्त करणे शक्य नाही.

आज माझ्या सेवापूर्तीच्या कार्यक्रमासाठी सर्व अधिकारी, सर्व मुख्य अभियंता, सर्व अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, उपअभियंता



संतोष जल योगदानाचा या सेवापूर्ती गौरव ग्रंथाच्या प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. (छत्रपती संभाजीनगर)

कर्मचारी वर्ग यांनी खूप मेहनत घेतली. त्यासाठी मी त्यांचा कायम ऋणी राहीन. या सर्वांचेच मला सेवा काळाच्या उत्तरार्धात खूप चांगले सहकार्य मिळाले. केवळ आपल्या सगळ्यांच्या सहकार्यामुळेच काही चांगले काम करू शकलो.

आता जलसंपदा खात्यात किंवा एकंदरीत सिस्टम मध्ये बरेच बदल होत आहे. सिस्टम वेगवान होऊ पाहतेय व त्यानुषंगाने आपल्या कडून जास्तीच्या अपेक्षा आहेत. त्याला सामोरे जाऊन त्याला स्वीकारणे भाग आहे. त्यासाठी स्वत:मध्ये आपल्या कार्यपद्धतीत बदल करण्यास तुम्ही तयार असावं, कालानुरूप नवी आव्हानं स्वीकारण्यासाठी सज्ज असावं असा सल्ला मी देऊ इच्छीतो व मला खात्री आहे की आपण अभियंते व इतर सर्व स्टाफ ती आव्हाने पेलण्यास पूर्णपणे सक्षम आहे.

काही महत्वाचे व Structural बदल खात्यात होऊ पहात आहेत. त्याचाही स्वीकार सक्षमपणे कराल अशी अपेक्षा करतो. आपल्या मातृभूमीच्या उत्कर्षासाठी आणि तिच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध राहून अखंडपणे कार्य करावे आणि ही मातृभूमी सुजलम सुफलम करावी! अशी विनंती आपणा सर्वांना शेवटी जाताजाता करतो आणि थांबतो.

धन्यवाद

मैत्र:

माणूस अन्न पाण्याविना
अनेक दिवस जीवंत राहू शकतो
परंतु जिवलग मित्रांवाचून
एक दिवसी नाही...



फोटो कॅप्शन:
अतुल कपोले, जयंत बोरकर, अभय पाठक,
डॉ प्रकाश पवार, राजेश सोनेटक्के, संजीव टाटू ,
डॉ. संजय बेलसरे, संतोष तिरमनवार,
आशिष देवगडे, प्रमोद मांदपडे, आणि जिब्राईल शेख

Mpsc batch 1994

